महिलांविषयी योजना व कायदे ■ सुरक्षा ॲप्स ■ यशकथा

# लोकराज्य

मार्च २०१८/पाने ६०/किंमत ₹१०



## अस्मिता

माझा गौरव, माझा हक्क

महाराष्ट्र शासन



# शेतकऱ्यांना कवच विम्याचे...

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

**शेती करताना वा इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या अपघातामुळे शेतकऱ्यांना अपंगत्व आल्यास किंवा मृत्यू ओढावल्यास विमा संरक्षण**

- सर्व १ कोटी ३७ लाख खातेदार शेतकऱ्यांचा १०० % विमा हप्ता शासन भरते
- आपला अन्य कोणताही विमा उतरविला असला तरी या योजनेअंतर्गत १० ते ७५ वयोगटातील ७/१२ धारक शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र लाभ

**विमा संरक्षणामध्ये समावेश -**

- रस्ता/रेल्वे अपघात
- विषबाधावीज पडून मृत्यू
- सर्पदंश व विंचूदंश
- विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात
- अन्य कोणतेही अपघात
- पाण्यात बुडून मृत्यू, जंतूनाशके हाताळताना अथवा अन्य कारणामुळे
- हत्या
- उंचावरुन पडून झालेला अपघात
- दंगल
- जनावरांच्या हल्ल्यामुळे/ चावण्यामुळे जखमी/ मृत्यू

**अपघात विमा योजनेंतर्गत मिळणारे अर्थसहाय्य :**

| | |
|---|---|
| १) अपघाती मृत्यू | २ लाख रुपये |
| २) अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे | २ लाख रुपये |
| ३) अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे | २ लाख रुपये |
| ४) अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी होणे | १ लाख रुपये |



- थेट कृषी विभागाचे स्थानिक कार्यालय व विमा सल्लागार कंपनी जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा. लि. नागपूर यांच्याशी संपर्क साधावा. (टोल फ्री नंबर १८०० २३३ ३५३३).
- योजनेकरिता ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे यांची निवड. (टोल फ्री नंबर १८०० ११८ ४८५ / दुरध्वनी क्र. ०२० २६४५ ०३८२)
- योजनेचा कालावधी -८ डिसेंबर २०१७ ते ७ डिसेंबर २०१८.





श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

अधिक माहितीसाठी संपर्क : जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

कृषी विभाग - महाराष्ट्र शासन

# अंतरंग


| | |
|---|---|
| आत्मसन्मानाची अस्मिता | ६ |
| विकासाची समान संधी | १० |
| कौटुंबिक हिंसाचार | ११ |
| 'ती' समर्थ व्हावी म्हणून... | १२ |
| कुपोषणमुक्ती | २१ |
| उमेद आत्मसन्मानाची | २२ |
| मार्ग यशाचा | २३ |
| स्वावलंबी 'महालक्ष्मी' | २४ |
| कसोटीचे क्षण | २९ |
| सलाम कर्तृत्वाला | ३० |
| सायबर पाठलागापासून सावधान | ३२ |
| उत्तुंग भरारी | ३४-३८ |
| सुरक्षा आणि सक्षमीकरण | ३९ |
| माटुंग्यात 'ती'चे राज्य... | ४० |
| सावध व्हा, अन्यथा.. | ४२ |
| पोलिसांकडून मदत... | ४७ |
| तिहेरी तलाक: आता उजाडेल | ४८ |
| 'स्मार्ट' सुरक्षा | ५० |
| संकोचाचा पडदा दूर करा.. | ५२ |
| मॅग्नेटिक आणि महत्त्वाकांक्षी महाराष्ट्र | ५४ |
| येथे कर माझे जुळती... | ५८ |


**आत्मसन्मानाची अस्मिता ६**



राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ५० टक्के इतके मोठे प्रमाण असलेल्यांच्या जीवनाला थेट स्पर्श करणारे विभाग म्हणजे महिला व बालविकास तसेच ग्रामविकास. या विभागांनी महिलांना आत्मसन्मान आणि आर्थिक निर्भयता देणारे अनेक निर्णय घेतले आहेत.

**'ती' समर्थ व्हावी म्हणून... १२**



आरोग्य, शिक्षण-उच्च आणि तंत्रशिक्षण, आदिवासी तसेच सामाजिक न्याय विभाग, महिला व बाल विकास, गृह विभाग, कामगार, अल्पसंख्याक, ग्रामविकास-नगरविकास, परिवहन, उद्योग आणि विधी व न्याय विभागाने मुली आणि महिलांच्या विकासासाठी अनेक निर्णय घेतले आहेत.

**स्वावलंबी 'महालक्ष्मी' २४**



बचतगटांमुळे ग्रामीण व नागरी भागातील महिलांना खऱ्या अर्थाने 'महालक्ष्मी'चा आशीर्वाद प्राप्त होत आहे.

**सायबर पाठलागापासून सावधान ३२**



नवनवीन डिजिटल आणि इंटरनेट माध्यमातील तंत्रज्ञान वापरून नेटवर्किंग, व्यावसायिक कामकाज, मतप्रदर्शन यांसारख्या अनेक गोष्टींचा स्त्रिया लाभ घेताना दिसत असल्या तरी, त्यांच्या या उत्साही सायबर सहभागामुळे त्या सायबर पीडित होण्याचे प्रमाण वाढले आहे.

**उत्तुंग भरारी ३४-३८**


सध्याच्या काळात महिला सर्वच क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावत आहेत. त्यांना योग्य संधी व प्रोत्साहन मिळाले तर त्या आत्मविश्वासाने पुढे जातात आणि यशस्वी होतात. महाराष्ट्रातील अशाच काही वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी महिलांचा परिचय..

**माटुंग्यात 'ती'चे राज्य... ४०**





मुंबईतील माटुंगा उपनगरी रेल्वे स्थानकावरील सर्व कारभार महिला अधिकारी आणि कर्मचारी चालवतात. केवळ महिला कर्मचारी चालवत असलेले हे देशातील पहिलेच स्थानक ठरले आहे.

**सावध व्हा, अन्यथा.. ४२**



कामांच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळामुळे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होते. ते रोखण्यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळांविरुद्ध महिलांना संरक्षण देण्यासाठी, प्रतिबंध करण्यासाठी आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी कायदा करण्यात आला आहे.

**'स्मार्ट' सुरक्षा ५०**




मोबाइलमधील महिला सुरक्षा संदर्भातील ॲप्लिकेशनमुळे आपत्कालीन परिस्थितीमध्ये महिलांना स्वतःचा बचाव करता येऊ शकतो. सुरक्षेचा उपाय म्हणून महिलांकरिता असे अनेक ॲप्स गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत.

**मॅग्नेटिक आणि महत्त्वाकांक्षी महाराष्ट्र ५४**

'मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स २०१८' या परिषदेमुळे राज्यात एका नव्या उद्योगपर्वाला सुरुवात झाली. अनेक करार या परिषदेच्या माध्यमातून झाले असून, लाखो रोजगार येत्या काही काळात युवकांना उपलब्ध होतील.

वर्ष ६९ वे | अंक ९ | मार्च २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

■ मुख्य संपादक ब्रिजेश सिंह
■ संपादक मंडळ अजय अंबेकर
शिवाजी मानकर
■ संपादक सुरेश वांदिले
■ उपसंपादक गजानन पाटील
राजाराम देवकर
■ प्रशासन अधिकारी मीनल जोगळेकर
■ वितरण अधिकारी मंगेश वरकड
■ वितरण सहायक अश्विनी पुजारी
■ साहाय्य स्वप्नाली जाधव
भारती वाघ
■ मुखपृष्ठ सीमा रनाळकर
धनश्री पाठारे
■ मांडणी, सजावट शैलेश कदम
■ मुद्रितशोधन उमा नाबर
■ मुद्रण प्री मीडिया
सर्व्हिसेस प्रा. लि.
महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# महिला उद्योग शक्ती

**स्त्रियांची** उद्योजकतेची वाट सोपी व्हावी यासाठी महिला उद्योग धोरण जाहीर. ■ यामध्ये महिला उद्योजकांच्या प्रशिक्षणापासून भांडवल उभारणीपर्यंतचा आणि भांडवल उभारणीपासून बाजारपेठ व्यवस्थापनापर्यंतचा सर्वंकष विचार. ■ महिला उद्योग धोरणात बाजारपेठाधारित व्यवस्थापनाचा अंतर्भाव. ■ महिला उद्योजक कुणाला म्हणायचे याची व्याख्या धोरणात स्पष्ट. ■ एकल म्हणजे उद्योग-व्यवसाय करणारी एकटी महिला, भागीदारी स्वरूपात उद्योगात कार्यरत महिला, सहकार क्षेत्र तसेच खासगी किंवा सार्वजनिक स्वरूपाच्या उद्योग क्षेत्रात काम करणारी महिला जिथे महिला उद्योजकांचे भागभांडवल १०० टक्के आहे, अशी कंपनी किंवा व्यवसाय. ■ धोरणातील निकषांची पूर्तता करणाऱ्या नोंदणीकृत बचतगटांचा समावेश. ■ सर्व प्रकारच्या उद्योगात ज्यात ५० टक्के महिला कामगार आहेत, ते सर्व उपक्रम योजनेतील प्रोत्साहनासाठी पात्र.



## धोरणातील तरतुदी

■ नवीन आणि विस्तारित पात्र सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना तालुका वर्गीकरणानुसार स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १५ ते ३५ टक्के दराने २० लाख ते १०० लाख रुपयांच्या मर्यादेत भांडवली अनुदान.. हे अनुदान उत्पादन सुरू झाल्यापासून ५ समान वार्षिक हप्त्यांमध्ये मिळेल. ■ विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील उद्योगांना प्रत्येक युनिट वीजेमागे दोन रुपयांची तर इतर जिल्ह्यातील उद्योगांना प्रत्येक युनिट वीजेमागे एक रुपयाची सवलत, प्रत्यक्ष उत्पादन सुरू झाल्यानंतर ५ वर्षे कालावधीसाठी.■ नवीन आणि विस्तारित पात्र सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग व्याज दर अनुदानासाठी पात्र. वित्तीय संस्थेचा प्रत्यक्ष व्याज दर किंवा ५ टक्के यापैकी जो दर कमी असेल त्या दराने व्याज अनुदान. ■ पात्र उद्योगातील महिला कामगारांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी/ राज्य कामगार कल्याण योजनेतील कंपनीच्या योगदानाच्या ५० टक्के पर्यंतची रक्कम ५ वर्षांच्या कालावधीसाठी अनुदानास पात्र. ■ सूक्ष्म आणि लघू उद्योगातील महिला उद्योजकांना त्याच्या उत्पादनांचे मुद्राचिन्ह विकसित करण्यासाठी केलेल्या खर्चाच्या रकमेच्या ५० टक्के व जास्तीत जास्त १ कोटी रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य. ■ देशांतर्गत राज्यस्तरीय प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी ५० हजार रुपये किंवा प्रदर्शनातील गाळ्याच्या भाड्यात ७५ टक्के रक्कम व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी ३ लाख रुपयांच्या मर्यादेत सवलत. ■ महिला उद्योजकांसाठी आयोजित विभागीय तसेच राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी केलेल्या खर्चाच्या ५० टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त १० लाख रुपयांपर्यंत साहाय्य. ■ मॉल, व्यावसायिक केंद्रे, बाजारपेठेच्या जागी महिला उद्योजकांसाठी तसेच रेल्वे स्थानक, बस स्थानक, विमानतळ, चित्रपटगृहे, मंड्या, इ. ठिकाणी जागांचे आरक्षण. ■ २५ टक्के अधिमूल्य घेऊन १० ते १५ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक राखीव. ■ पाच वर्षांच्या कालावधीत एकूण १० समूह विकास केंद्र विकसित करणार. यासाठी प्रकल्प खर्चाच्या ९० टक्के रक्कम अनुदान. ■ महिला उद्योजकांच्या गरजा, अभ्यासक्रम, प्रशिक्षण नियोजन, व्यवसायिक, तांत्रिक कौशल्यांसाठी कार्यशाळांचे आयोजन, सल्ला यासाठी समर्पितपणे काम करणारी महिला एमएसएमई ही संस्था स्थापन करण्यात येणार.

# शक्ती आणि सर्जनशीलता



मंत्री, महिला व बालविकास, ग्रामविकास

राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर या श्रेष्ठ महिलांच्या जन्मभूमीत आपलाही जन्म झाला याचा मला नेहमीच अभिमान आणि आनंद वाटत असतो. महिलांमध्ये अंगभूत शक्ती, सर्जनशीलता आणि असामान्य कर्तृत्व गाजवण्याची क्षमता अपार आहे. महिलांना कोणत्याही क्षेत्रात कर्तृत्व गाजवण्याची संधी मिळाली की, त्या संधीचे सोनेच करतात. हे नव्याने सांगण्याची गरज नाही. काही दिवसांपूर्वीच भारतीय हवाई दलातील मिग २१ बायसन या लढाऊ विमानाच्या वैमानिक बनण्याचा मान अवनी चतुर्वेदी या पराक्रमी मुलीस मिळाला आणि माझे मन अभिमानाने भरून आले. महिलांच्या पराक्रमाची अशी कितीतरी उदाहरणे आपल्या अवतीभवती आहेत. आपल्या देशातील निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. तरीसुद्धा आज महिलांची स्थिती म्हणावी तेवढी समाधानकारक नाही. याचा मला विषाद वाटत असतो. महिलांना दुय्यम स्थान देण्याकडेच अधिक कल दिसून येतो. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यातही असे घडताना दिसले की, मन विषण्ण होते. मी माझ्या संपूर्ण सामाजिक जीवनात महिलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अथक प्रयत्नशील आहे. मला तीन वर्षांपूर्वी राज्याच्या मंत्रिमंडळात महिला व बालविकास आणि ग्रामविकास विभागाच्या मंत्री म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली. या माध्यमातून राज्यातील महिलांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्याच्या दृष्टीने सक्षम आणि समर्थ कसे करता येईल, यावर मी लक्ष केंद्रित केले. त्यासाठी अनेक योजना आखल्या आाणि त्याची अंमलबजावणी प्रभावीरीत्या सुरू केली. बचतगटांच्या माध्यमातून ग्रामीण व नागरी भागातील महिलांना एकत्रित करून त्यांच्यातील औद्योगिक क्षमता वाढवण्यावर मी सातत्याने भर दिला. त्यामुळे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात हजारो बचतगट वेगवेगळ्या उत्पादनांची निर्मिती करण्यात यशस्वी झाले आहेत. या उत्पादनांची विक्री करण्यासाठी वेगवेगळी व्यासपीठं उपलब्ध करून दिली आहेत. नुकतेच मुंबई येथे सरस महालक्ष्मी बचतगटांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. अशा प्रदर्शनांमधून लाखो रुपयांची विक्री होते. तळागाळातील महिलांनी मोठ्या श्रमाने आणि प्रेमाने निर्माण केलेल्या दर्जेदार वस्तू ग्राहकांपर्यंत सहजतेने व सुलभतने जातात. बचतगटांमुळे महिलांना खरोखरच लक्ष्मी प्रसन्न होत असून, त्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि आत्मनिर्भर होत आहेत. मुली व महिलांना सवलतीच्या दरात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्याचा मोठा निर्णय आम्ही घेतला. मासिकपाळी दरम्यानच्या स्वच्छतेसाठी हे सुलभ, स्वस्त आणि सहजरीत्या मिळणारे नॅपकीन उपयुक्त ठरतील. माझ्याकडे असलेल्या ग्रामविकास विभागाच्या वतीने जिल्हा परिषदांच्या मार्फत ग्रामीण भागातील मुली, महिला यांच्यासाठी विविध योजना राबवून त्यांना अधिकाधिक सशक्त करण्यात येत आहे. शासनाच्या इतर विभागांकडूनही महिलांसाठी अशाच अनेक योजना राबवण्यात येत आहेत. या योजना, अनेक निर्णय, धोरणे यामुळे महिलांचे सामर्थ्य आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी व्यापक प्रयत्न केले जात आहेत.



आठ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने यंदा लोकराज्यचा विशेषांक प्रकाशित करण्यात येत आहे. या अंकात महिला व बालविकास, ग्रामविकास आणि शासनाच्या इतर विभागांच्या विविध योजनांची माहिती विस्तृतपणे दिली आहे. शिवाय वेगळ्या क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या गाथा, लैंगिक अत्याचाराच्या अनुषंगांने जाणीवजागृती करणारी माहिती, सुरक्षा ॲप्स, बचतगटांच्या यशकथा आदी साहित्याचा समावेश आहे. हा अंक आपणास आवडेल अशी आशा आहे.

महिला दिन हा केवळ एकच दिवस न साजरा करता तो दररोज साजरा करून, महिलांना दररोज आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि आत्मशक्ती देण्याची गरज आहे. तसे झाले तर आपला समाज एका वेगळ्या उंचीवर जाईल आणि देश खऱ्या अर्थाने सुपर पॉवर बनेल. त्यासाठी या दिनानिमित्त वचनबद्ध होऊ या आणि हे वचन कायमस्वरूपी प्रामाणिकपणे पाळू या.

**पंकजा मुंडे**
**(अतिथी संपादक)**




अस्मिता लोगोचे अनावरण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे आणि मुख्य सचिव सुमित मल्लिक

# आत्मसन्मानाची अस्मिता

**महिला व बालके कोणत्याही देशाच्या, राज्याच्या लोकसंख्येचा एक मोठा आणि महत्त्वपूर्ण घटक असतो. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ५० टक्के इतके मोठे प्रमाण असलेल्यांच्या जीवनाला थेट स्पर्श करणारे विभाग म्हणजे महिला व बालविकास तसेच ग्रामविकास विभाग. या दोन्ही खात्यांच्या मंत्री म्हणून श्रीमती पंकजा मुंडे यांनी महिलांना आत्मसन्मान, आर्थिक निर्भयता देणारे अनेक निर्णय घेतले आहेत. बालकांच्या विकासाकडेही त्यांनी विशेष लक्ष पुरवले आहे.**

**मीनल जोगळेकर**

### महिला सक्षमीकरणासाठी कोणते प्राधान्यक्रम राहिले आहेत?

आज आपल्या राज्यातल्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास निम्मी लोकसंख्या ही महिलांची आहे. महिलांनी सर्वच क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. महिला सकारात्मक ऊर्जेचा प्रचंड मोठा स्रोत आहेत. महिलांच्या या ऊर्जेला एक विकासात्मक व विधायक वळण देण्याचा महिला व बालविकास तसेच ग्रामविकास या विभागांची मंत्री म्हणून माझा प्राधान्यक्रम राहिला आहे. महिलेला समाजात स्वत:ची ओळख निर्माण करता यावी, तिच्या आर्थिक, सामाजिक स्थानास बळकटी मिळावी तसेच आपत्तीप्रसंगी तिला मदतीचा हात देता यावा यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही गेल्या ३ वर्षात घेतले आहेत.

### अस्मिता या योजनेबद्दल काय सांगाल?

महिलांच्या अस्मितेच्या रक्षणासाठी घेण्यात आलेला महत्त्वपूर्ण निर्णय असे मी या निर्णयाबद्दल सांगेन. राज्याच्या ग्रामीण भागातील किशोरवयीन मुली आणि महिलांमध्ये, मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेच्या पारंपरिक सवयी, समज-गैरसमज आणि अंधश्रद्धा यामुळे त्यांचे आरोग्य, शिक्षण व रोजगार यावर विपरीत परिणाम होत असल्याचे तसेच ग्रामीण भागात स्वच्छतेसाठी सॅनिटरी नॅपकीनचा उपयोग केवळ १७ टक्के मुली व महिला करीत आहेत, असे विविध सर्वेक्षणांतून निदर्शनास आले आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या सॅनिटरी नॅपकीनची न परवडणारी किंमत, सहज उपलब्धता नसणे तसेच लोकलज्जेस्तव दुकानदाराकडे सॅनिटरी नॅपकीन मागण्यासाठी जाण्याचा संकोच या कारणांमुळे या मुली व महिला सॅनिटरी नॅपकीनचा वापर करू शकत नाहीत. या संवेदनशील बाबीचा विचार करून ग्रामीण भागातील मुली व महिलांच्या आरोग्य, शिक्षण व रोजगाराचे चित्र बदलण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत अस्मिता योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अलीकडेच मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते या योजनेच्या लोगोचे व ॲपचे अनावरण करण्यात आले. योजनेंतर्गत जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलींना २४० मिमीच्या ८ पॅडचे एक पाकिट ५ रु. दराने आणि ग्रामीण भागातील महिलांना २४० मिमीच्या ८ पॅडचे एक पाकीट रु.२४ व २८० मिमीच्या ८ पॅडचे एक पाकीट रु.२९ या सवलतीच्या किंमतीत उत्कृष्ट दर्जाचे नॅपकीन पुरवण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यातील सुमारे ७ लाख लाभार्थी मुलींना अस्मिता कार्ड देण्यात येणार आहे व वर्षभरात १३ पाकिटे उपलब्ध करून देण्यात येतील. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान 'उमेद' अंतर्गत सहभागी असलेले महिला बचतगट आणि त्यांच्या संघटनांमार्फत सॅनिटरी नॅपकीनच्या विक्री आणि समुपदेशनाचे कार्य करण्यात येणार आहे. तसेच वापर झाल्यानंतर सॅनिटरी नॅपकीनची योग्यप्रकारे विल्हेवाट लावणे सोपे जाईल.

उमेद अभियानातील बचतगट अस्मिता या मोबाइल ॲपवर नोंदणी करून पुरवठादारांकडून सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून घेतील व गावातील महिला व मुलींना गरजेनुसार व मागणीनुसार विक्री करतील. पाकिटांच्या संख्येच्या प्रमाणात प्रती पाकीट १५.२० रुपयांप्रमाणे अनुदान शासन बचतगटांना देणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील मुली व महिलांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल, मुलींची शाळेतील उपस्थिती वाढून त्यांना शिक्षण पूर्ण करता येईल तसेच महिलांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध होऊन त्यांचे एकूण जीवनमान उंचावण्यास मदत होईल, असा मला विश्वास वाटतो.

### मुख्यमंत्र्यांनी स्वीकारली ५० मुलींची अस्मिता स्पॉन्सरशीप

अस्मिता योजनेच्या मोबाइल ॲप, लोगोचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले असून यावेळी अस्मिता कार्ड, अस्मिता फंडाचाही शुभारंभ करण्यात आला. ग्रामीण भागातील मुली व महिलांना लोकसहभागातून सॅनिटरी नॅपकीन मिळण्यासाठी https://mahaasmita.mahaonline.gov.in या वेबपोर्टलद्वारे कोणालाही अस्मिता स्पॉन्सर (अस्मिता प्रायोजक) होता येईल. मुख्यमंत्र्यांनी अस्मिता फंडाचा शुभारंभ करताना ५० मुलींना १२ महिने सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्यासाठी ऑनलाइन रक्कम वर्ग करून अस्मिता स्पॉन्सरशीप स्वीकारून एक उत्तम पायंडा पाडला. मीसुद्धा या वेळी १५१ मुलींना १२ महिने सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करण्यासाठी ऑनलाइन रक्कम वर्ग करून अस्मिता स्पॉन्सरशिप स्वीकारली असून लोकांनी अस्मिता फंडाला सहयोग करून अस्मिता स्पॉन्सर व्हावे, असे आवाहन मी करते. मोबाइल ॲप, डिजिटल अस्मिता कार्ड यांच्या माध्यमातून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.

### सुमतीबाई सुकळीकर महिला उद्योगिनी योजनेबद्दल काय सांगाल?

उमेद अभियान आणि महिला आर्थिक विकास महामंडळ-माविममार्फत महिला सक्षमीकरणासाठी महिला बचतगटांची उभारणी व बळकटीकरणावर भर देण्यात येत आहे. बचतगटांना विविध उद्योग-व्यवसायांसाठी बिनव्याजी बँक कर्ज उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय आम्ही अलीकडेच घेतला. राज्यातील २.५० लाख बचतगट या योजनेचे लाभार्थी असून सुमारे २५ लाख कुटुंबांना याचा लाभ होणार आहे. राज्यात २०१९ पर्यंत ५ लाख बचतगटांना म्हणजेच साधारणपणे ५० लाख कुटुंबांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचणार आहे.

### माझी कन्या भाग्यश्री योजनेस सध्या कसा प्रतिसाद आहे?

राज्यातील मुलींचा जन्मदर वाढवणे, त्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे, त्यांना शिक्षण देणे, त्यांच्या उज्ज्वल भविष्याकरिता आर्थिक तरतूद करणे, बालविवाहास प्रतिबंध करणे व मुलगी वारसदार होऊ शकते ही भूमिका समाजामध्ये रुजवणे, या उद्देशाने राज्य शासनाने 'माझी कन्या भाग्यश्री' ही योजना सुरू केली आहे. जात, धर्म, पंथ,

**सरस महालक्ष्मी प्रदर्शन दरवर्षी अधिकाधिक यशस्वी होत आहे. याबद्दल काय सांगाल?**



**महालक्ष्मी सरस २०१८ प्रदर्शनीमध्ये एका बचतगटातील वस्तूंची पाहणी करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव, महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे, राज्यमंत्री दादाजी भुसे.**

कोणत्याही परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याची तसेच अडचणीच्या काळात स्वत:बरोबर संपूर्ण कुटुंबाला सावरण्याची महिलांच्यातली आंतरिक शक्ती समाजाला नेहमीच बळ देत आली आहे. सरस महालक्ष्मी प्रदर्शनाच्या निमित्ताने हे मला जवळून बघायला मिळाले.मागच्या वर्षी दुष्काळग्रस्त भागातील बचतगटांच्या महिला आपली उत्पादने घेऊन मुंबईत सरस प्रदर्शनात सहभागी झाल्या होत्या. या प्रदर्शनात आपल्या उत्पादनांची विक्री करून, या महिलांनी चांगला व्यवसाय केला व दुष्काळात सापडलेल्या आपल्या कुटुंबाला फार मोठा आर्थिक आधार दिला. सरस महालक्ष्मी प्रदर्शनात कॅशलेस व्यवहाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. गावाकडून आलेल्या महिला मोठ्या आत्मविश्वासाने स्वाइप मशीन, पीओएस मशीन, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, मोबाईल बँकींग, ई–वॉलेट, पेटीएम यांचा वापर करून व्यवहार करीत होत्या. महिलांमधील आत्मविश्वास व आर्थिक स्वावलंबन वाढीला लागले आहे, हेच या प्रदर्शनाचे मोठे यश आहे असे मला वाटते.

ग्रामीण, शहरी असा कुठलाही निकष न ठेवता समाजातील सर्व घटकांसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे, हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ७.५० लाख रुपयांच्या मर्यादेत आहे, अशा सर्व कुटुंबांमधील पहिल्या दोन मुली अपत्यांपर्यंत ही योजना लागू करण्यात आली आहे. एकुलती एक मुलगी व तिच्या आईच्या संयुक्त बँक खात्यात ५० हजार रुपये तर दोन मुलींसाठी प्रत्येकी २५ हजार रुपये एवढी रक्कम फिक्स्ड डिपॉझिटमध्ये जमा करण्यात येतील. लाभार्थीच्या वयाच्या ६ व्या व १२ व्या वर्षी या रकमेवरील व्याजाची रक्कम काढून लाभार्थीच्या आरोग्य, शिक्षण व आनुषंगिक खर्चासाठी उपयोगात आणता येते. लाभार्थीला वयाच्या १८व्या वर्षी मुद्दलासह व्याजाची संपूर्ण रक्कम मिळते. त्यामधून लाभार्थी मुलगी तिच्या पायावर उभी राहावी, यासाठी खर्च करणे अपेक्षित आहे.

**मनोधैर्य योजनेत कशाप्रकारे सुधारणा घडवून आणल्या?**

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला, बालके व त्यांच्या वारसदारांना मदत व पुर्नवसन तसेच अर्थसाहाय्य देऊन त्यांच्यामध्ये जगण्याची नवी उमेद निर्माण करण्यासाठी मनोधैर्य योजना ऑक्टोबर २०१३ पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. १ ऑगस्ट २०१७ पासून आम्ही या योजनेत बदल करून नवीन निकषानुसार अर्थसाहाय्य २ ते ३ लाखांवरून गंभीर व तीव्र स्वरूपाच्या प्रकरणामध्ये १० लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला. तसेच ३१ डिसेंबर २००९ पासूनच्या प्रकरणांना २१ ऑक्टोबर २०१३ च्या शासन निर्णयातील निकषांप्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने अर्थसाहाय्य देण्यात येणार असून ॲसिड हल्ल्यात चेहरा विद्रूप झाल्यास प्लास्टिक सर्जरी करण्यासाठी, शासनाने निश्चित केलेल्या रुग्णालयात येणारा पूर्ण खर्च करण्यात येणार आहे. ऑक्टोबर २०१४ ते जून २०१७ पर्यंत ४६८१ प्रकरणांवर १५८.७६२ कोटी रुपये इतके अर्थसाहाय्य देण्यात आले आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत ही मदत केली जाते. पीडितांना फक्त आर्थिक मदत न करता त्यांचे पुनर्वसन करणे, त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी प्रयत्न करणे व गुन्हेगारांना जरब बसावी अशी शिक्षा करणे हे शासनाचे लक्ष्य आहे

**बचतगट उत्पादनांच्या ऑनलाइन विक्री संदर्भात काय सांगाल?**

बचतगटांद्वारे अनेक चांगली उत्पादने केली जातात. अशी उत्पादने लोकांना वर्षभर उपलब्ध व्हावीत यासाठी ती ऑनलाइन विक्री पोर्टलवर उपलब्ध करून दिली जातील. निवडक १२ उत्पादनांची निवड करून त्यांची ऑनलाइन विक्री व होम डिलिव्हरी देण्यासाठी ॲप विकसित करण्यात येईल. ऑनलाइन विक्री प्रक्रिया 'आपले सरकार' वेब पोर्टलला जोडून बचतगटाच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बचतगटांच्या उत्पादन विक्रीसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी

महानगरांमध्ये मॉल सुरू करण्याचेही शासनाने निश्चित केले आहे.

### अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढवण्याचा निर्णय आपण घेतला आहे. याबद्दल काय सांगाल?

कुपोषणमुक्तीच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविकांच्या मानधनात सेवाज्येष्ठतेनुसार ५ टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. अंगणवाडी सेविकांचे मानधन आता किमान ६,५०० रुपये, मदतनीसांचे किमान मानधन ३,५०० रुपये व मिनी अंगणवाडी सेविकांचे किमान मानधन ४,५०० रुपये करण्यात आले आहे. वाढीव मानधनासाठी प्रतिवर्ष सुमारे १७६ कोटी रुपये अतिरिक्त खर्च होणार असून राज्य शासनाने त्यासाठी आवश्यक तरतूद केली आहे. यासोबतच शासनामार्फत त्यांना देण्यात येणारी भाऊबीजेची रक्कम दुप्पट करण्यात आली असून आता २ हजार रुपये देण्यात येणार आहेत. राज्यातील १ लाख ९७ हजार २६२ अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधनवाढीचा लाभ मिळणार आहे. पूर्वी प्रकल्प व जिल्हास्तरावर देण्यात येत असल्यामुळे मानधन मिळण्यास २ ते ३ महिन्यांचा विलंब होत होता. तो दूर करण्यासाठी मानधन थेट त्यांच्या बँकखात्यात जमा करण्यासाठी राज्यस्तरावर पीएफएमएस सन्मान प्रणाली सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आली असून त्यामुळे मानधन वेळेत अदा होत आहे.



### स्वच्छता अभियानातून महिलांना कशा प्रकारे लाभ होत आहे ?



हागणदारीमुक्त गाव मोहीम ही महिलांच्या दृष्टीने फार महत्त्वाची मोहीम आहे. महिलांचे आरोग्य रक्षण आणि त्यांच्या लज्जा रक्षणाच्या दृष्टीने शौचालय फार महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागामार्फत स्वच्छ भारत मिशन यशस्वीपणे राबवण्यात येत आहे. आतापर्यंत राज्यातील २२ हजार ७९३ ग्रामपंचायती आणि २१२ पंचायत समित्या पूर्णत: हागणदारीमुक्त झाल्या आहेत. अनेक गावे हागणदारीमुक्त करण्यात महिलांनी पुढाकार घेतला आहे. काही जणींनी बचत करून तर काही जणींनी प्रसंगी डोरलं गहाण ठेवून शौचालये बांधली आहेत. महिला, मुलींच्या आरोग्य रक्षणासाठी अनेक गावांमध्ये महिलाच पुढे आल्या आहेत. या स्वच्छता मोहीमेचा सर्वांनाच आरोग्य रक्षणाच्या दृष्टीने मोठा लाभ होत आहे.

### अनाथ बालकांना आरक्षण देण्याच्या निर्णयाबद्दल काय सांगाल?

राज्यातील अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गात एक टक्का समांतर आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकताच घेण्यात आला आहे. यामुळे अनाथ मुलांना शिक्षण, तसेच नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळणार आहे. अनाथ मुलांचे पुनर्वसन करणे, तसेच त्यांचे भवितव्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने सरकारने घेतलेला हा निर्णय आहे. अनाथ मुलांना बालगृह, त्यानंतर अनुरक्षणगृहात असताना अन्न, वस्त्र, निवाऱ्यासह अन्य गरजा कशा पूर्ण करणार, हा प्रश्न नसतो. वयाच्या १८व्या वर्षांनंतर त्यांना संस्थेबाहेर पडावे लागते. अनाथ असल्याने त्यांना अनेक प्रश्नांचा सामना करावा लागतो. अनाथ मुलांची जात नक्की माहीत नसल्याने त्यांना कोणत्या एका विशिष्ट प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. त्यामुळे त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सवलतींपासून वंचित राहावे लागते व त्यांच्या भावी आयुष्यात अडचणी निर्माण होतात. हे होऊ नये, यासाठी अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गात एक टक्का समांतर आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे, अनाथ प्रमाणपत्र असणाऱ्या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहणार असून; शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून पुढे होणाऱ्या सरळसेवा भरतीसाठी लागू राहील. मात्र जी भरती प्रक्रिया याआधी सुरू झाली आहे त्यास हे आरक्षण लागू होणार नाही. सद्य:स्थितीत बालगृहातील १८ वर्षापर्यंत वय असलेल्या अनाथ मुलांची संख्या ३ हजार इतकी आहे. त्यामुळे ही मुले शासनाकडून मिळणारे विविध लाभ मिळण्यास पात्र होतील.

### महिलांसाठी आणखी काय करण्याचा आपला मानस आहे?

सामाजिक दायित्व (सीएसआर) निधीतून महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध कॉर्पोरेट कंपन्यांचे योगदान घेण्यात येत आहे. याशिवाय शासनाच्या विविध योजना आणि त्यासाठी करण्यात येणारी आर्थिक तरतूद यामध्ये महिलांना समान न्याय मिळेल, याची खात्री करणे या प्रमुख उद्देशाने महिला आणि बालविकास विभागामध्ये जेंडर बजेट कक्ष प्रस्थापित केला आहे. नजीकच्या काळात सातवी ते दहावी इयत्तेतील मुलींना स्वसंरक्षणाचे धडे शालेय अभ्यासक्रमात अनिवार्य करण्याचा माझा मानस आहे. त्यासाठी मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली असून, महिलांच्या आत्मसंरक्षणासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरू शकेल.

**संपादक, महाराष्ट्र अहेड**



अनाथ मुलांसोबत महिला व बालविकास राज्यमंत्री विद्या ठाकूर.

**राज्याचा विकास होत असताना महिलांचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकास हासुद्धा तितकाच महत्त्वाचा आहे. लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची असून महिलांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सक्षमीकरण वेगाने होत असल्याचे दिसून येत आहे. महिलांना समान संधी आणि त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत.**

# विकासाची समान संधी

**विद्या ठाकूर** (राज्यमंत्री, महिला व बालविकास)

देशाला विकसित करावयाचे असेल तर मातृशक्ती सक्षम करण्याची गरज आहे असे मला वाटते. महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता आणि आरोग्य संवर्धनासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. केंद्र शासनाची बेटी बचाओ, बेटी पढाओ आणि राज्य शासनाची माझी कन्या भाग्यश्री या योजनांमुळे मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढते आहे.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी शासनामार्फत व्यापक धोरणे राबवली जात आहेत. शासनामार्फत राबवण्यात येत असलेल्या मनोधैर्य योजनेच्या नावातच त्याचा उद्देश सामावला आहे. बलात्कारपीडित, ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या, अन्यायग्रस्त महिलांचे मनोधैर्य वाढवून त्यांना पुन्हा नव्याने उभारी देण्याची गरज असते. घडलेली घटना हा अपघात आहे. इतर अपघातातून सावरून आपण आपले जीवन पुन्हा नव्याने सुरू करतो. तशाच पद्धतीने बलात्कारपीडित, अन्यायग्रस्त महिलांनीही मनाने न खचता आपले जीवन नव्याने सुरू केले पाहिजे, असे मला वाटते.

शेतीत काम करणाऱ्या महिला, स्वत:चा बचटगट चालवून कुटुंब चालवणाऱ्या महिला या खऱ्या अर्थाने 'करिअर वुमन' आहेत. घर, मुले–बाळे सांभाळून त्या दिवसभर राबतात. देशाच्या आर्थिक प्रगतीत त्यांच्या कष्टाचा मोलाचा वाटा आहे. कुटुंब आणि करिअर या दोन्ही बाबी एकाच वेळी सांभाळण्याची शक्ती स्त्रियांमध्ये आहे. त्यामुळे महिलांच्या कार्यशक्तीचा आपल्याला नेहमीच अभिमान वाटतो.

महिला बचतगटांना वर्षभर वस्तू विकण्यासाठी जिल्हास्तरावर मॉल उभारण्याच्या कामांना प्राधान्य देण्यात येईल. त्यामुळे वैविध्यपूर्ण व दर्जेदार साहित्य निर्माण होईल. राज्यातील महिला बचतगटांना बिनव्याजी कर्ज देण्यासाठी राज्य शासन पुढाकार घेत आहे. कर्जाच्या व्याजाची रक्कम राज्य शासन भरणार आहे. महिला बचतगट घेत असलेल्या कर्जाची १०० टक्के परतफेड करतात. म्हणूनच देश व राज्याच्या प्रगतीत महिलांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. त्यांचा प्रामाणिकपणा व स्वाभिमान इतर कर्ज परत न करणाऱ्या उद्योगपतींच्या तुलनेत कितीतरी मोठा आहे.

समाजात स्त्री म्हणून काम करत असताना तिने स्त्रीत्व जपून आत्मशक्ती वाढवली पाहिजे. त्यामुळे स्त्रीशक्तीला जास्तीतजास्त प्राधान्य देण्याची गरज आहे. स्वयंसाहाय्यता बचतगटांच्या माध्यमातून राज्य शासन महिलांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.

कुपोषण निर्मूलन हा महिला आणि बालविकास विभागाचा प्रमुख कार्यक्रम आहे. ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करीत आहेत. कुपोषण निर्मूलन, लसीकरण, गरोदर माता तसेच स्तनदा मातांचे संगोपन, बालकांचे पोषण अशा विविध पातळ्यांवर महिला कर्मचारी आपले योगदान देत आहेत. महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही यासाठी या विभागामार्फत व्यापक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत.

जसे मुख्यमंत्री लोकशाही दिनाच्या माध्यमातून सामान्य जनतेच्या तक्रारी, समस्या सोडवण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याच धर्तीवर सध्या राज्यभरात महिला लोकशाही दिनाचे आयोजन

करण्यात येते. यामध्ये मंत्री अथवा राज्यमंत्री या महिला लोकशाही दिनी त्यांच्यापुढे आलेल्या तक्रारींचे/समस्यांचे निवारण करत असतात.

### महिला सक्षमीकरण

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गाने त्यांना मदत करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या जोमाने विकासकामांत सहभागी व्हाव्यात यासाठी शासन अनेक योजना राबवत आहे. याशिवाय सर्वसमावेश असे महिला धोरणही राबवण्यात येत आहे.

### बचतगटांचे जाळे

बचतगटाची चळवळ व्यापक करण्यात आली असून सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेतून महिला बचतगटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे.

### मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी

मुलींचा जन्मदर वाढवणे व स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी १ एप्रिल २०१६ पासून माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू करण्यात आली आहे. एक किंवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या दांम्पत्याच्या मुलीचे पोषण, शिक्षण इत्यादीसाठी या योजनेंतर्गत विविध लाभ देण्यात येत आहेत.

### कुपोषणमुक्तीवर भर

महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही यासाठी या विभागामार्फत व्यापक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. एकात्मिक बालविकास सेवा योजनेमार्फत राज्यात कुपोषणमुक्तीसाठी विशेष कार्यक्रम राबवला जात आहे.

### बालगृहांचे कामकाज अधिक पारदर्शक

राज्यातील बालगृहांचे कामकाज अधिक पारदर्शक आणि दर्जेदार बनविण्यासाठी त्यांची अ, ब आणि क अशी वर्गवारी करण्यात आली आहे. सध्या राज्यातील सर्व बालगृहांचे थर्ड पार्टी ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार १००० हून अधिक बालगृहांचे ऑडिट अंतिम टप्प्यात आहे. सक्षम महिला आणि सुदृढ बालक घडवणे याचसाठी महिला व बालविकास विभाग काम करीत आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणाचे विविध कार्यक्रम हाती घेण्यासाठी खाजगी कंपन्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके**, विभागीय संपर्क अधिकारी

## कौटुंबिक हिंसाचार




कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ – हा कायदा हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करतो. तसेच हा पुरुषांच्या विरोधात नसून मानवतावाद, कायदा, नैतिकता आणि न्याय यांच्याशी विसंगत वर्तन करणाऱ्या व्यक्तींविरोधात आहे. या कायद्याचे स्वरूप धर्मनिरपेक्ष आहे.

### कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय?

**शारीरिक छळ** – मारणे, चावणे, लाथाडणे, ठोसे मारणे, ढकलणे, शारीरिक अत्याचार इत्यादी. **शाब्दिक किंवा भावनिक छळ** – अपमानास्पद उपहासात्मक बोलणे, नावे ठेवणे, नोकरीस प्रतिबंध इत्यादी



**आर्थिक छळ** – घरगुती गरजांसाठी पैसे, भाडे हातखर्च इत्यादी न देणे, पगार, उत्पन्न जबरदस्तीने घेणे इत्यादी
**लैंगिक छळ** – जबरदस्ती करणे, अश्लील चित्रफीत दाखवणे, बाल लैंगिक शोषण करणे इत्यादी.

### कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत तरतुदी

**कलम १४** – अन्वये संयुक्त समुपदेशन/समझोते या कायद्याच्या अंतर्गत उपलब्ध आहेत. **कलम १८** – अन्वये संरक्षण : कोणत्याही प्रकारची घरगुती हिंसा न करणे, कामाच्या ठिकाणी प्रवेश न करणे, संपत्ती न विकणे. **कलम १९** – अन्वये निवासाचे संरक्षण : स्त्रियांना घराबाहेर काढणे किंवा त्यांना घरात राहण्यास अडथळा आणणे. **कलम २०** – अन्वये पोटगीचे आर्थिक संरक्षण : राहणीमानाच्या दृष्टीने पुरेशी उचित, योग्य व वाजवी आर्थिक लाभाची रक्कम. **कलम २१** – मुलांच्या ताब्याचे संरक्षण. **कलम २२** – अन्वये नुकसानभरपाई : पीडित व्यक्तीला झालेली इजा, मानसिक छळ व भावनिक क्लेश यासाठी नुकसानभरपाई. (साभार : 'साद' जानेवारी २०१८ (राज्य महिला आयोगाचे मुखपत्र))

# ‘ती’ समर्थ व्हावी म्हणून...



**शासनाच्या सर्वच विभागांचा महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणाशी संबंध येत असला तरी प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण-उच्च आणि तंत्रशिक्षण, आदिवासी तसेच सामाजिक न्याय विभाग, महिला व बाल विकास, गृह विभाग, कामगार, अल्पसंख्यांक, ग्रामविकास-नगरविकास, परिवहन, उद्योग आणि विधी व न्याय विभागाने मुली आणि महिलांच्या विकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.**

**डॉ. सुरेखा मधुकर मुळे**

### परिवहन विभाग

■ एस.टी स्थानकातील उपहारगृहे प्राधान्याने महिला बचतगटांना. संपर्क- संबंधित आगार व्यवस्थापक ■ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा किंवा मुलास ऑटो रिक्षा परवाना. (परिवहन विभाग) हिंदुहृद्रयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना नावाने योजनेची अंमलबजावणी. रिक्षांच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेले २५ हजार रुपयांचे नोंदणी शूल्क माफ. योजनेची अंमलबजावणी पूर्णत: संबंधित आरटीओवर. (परिवहन अधिकारी) ■ हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कन्यादान योजना - १ एप्रिल २०१६ नंतर जन्म झालेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या मुलींच्या नावे मुदत ठेवीत रक्कम ठेवली जाते. मुलगी २१ वर्षांची झाल्यानंतर तिला १ लाख रुपयांची रक्कम मिळणार आहे.

■ शिवनेरी बस मध्ये ३ ते १२ क्रमांकाची आसने महिलांसाठी राखीव. ■ एस.टी महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांना एकूण नऊ महिन्यांची प्रसूती आणि बालसंगोपन रजा. ■ आदिवासी महिलांना एस.टी चालवण्याचे (वाहन चालक) प्रशिक्षण. यवतमाळ जिल्ह्यातील ३० आदिवासी महिलांची एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी निवड. देशातील एकमेव घटना. ■ शेअर टॅक्सीतील वाहकाजवळील समोरची जागा महिलांसाठी राखीव. ■ या मुद्रा बँक योजनेतून २ फेब्रुवारी २०१८ पर्यंत २५.५८ लाख खातेदारांना १३,९३५.९३ कोटी रुपयांचे कर्ज वितरण. या योजनेतील तरुण गटात सलग तीन वर्षांपासून महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर. देशात १० कोटी लोकांना स्वयंरोजगारासाठी मुद्रा योजनेतून कर्ज वितरित. यामध्ये ७ कोटी महिला. **संपर्क:-** संबंधित राष्ट्रीयकृत/सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील बँक.

■ ऑटोरिक्षा परवान्यांच्या वाटपात महिलांना ५ टक्के आरक्षण.

■ **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (जिल्हा परिषद/ पंचायत समित्या व ग्रामपंचायती) स्व उत्पन्नातील १० टक्के निधी स्त्रिया आणि बालकल्याणासाठी राखून ठेवण्याची तरतूद.**

■ **जिल्हा परिषदेच्या योजना-** व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण ■ स्व संरक्षण व शारीरिक विकास प्रशिक्षण- ■ समपुदेशन केंद्र, संगणक प्रशिक्षण, तालुकास्तरावर शिकणाऱ्या मुलींसाठी वसतिगृहे. ■ आरोग्य आणि कायदेविषयक प्रशिक्षण, अंगणवाड्यांसाठी स्वतंत्र इमारत, दुरुस्ती-भाडे ■ बालवाडी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांना पुरस्कार, पंचायत महिला शक्ती अभियानांतर्गत महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण, महिला मेळावे व मार्गदर्शन केंद्र, बालवाडी आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण, विशेष प्रावीण्य मिळवलेल्या मुलींचा सत्कार, कुपोषित मुलामुलींसाठी, किशोरवयीन मुलींसाठी तसेच गरोदर आणि स्तनदा

मातांसाठी अतिरिक्त आहार. ■ दुर्धर आजारी मुलांच्या शस्त्रक्रियेसाठी अर्थसाहाय्य, स्त्रियांना विविध साहित्य. पाचवी ते दहावीपर्यंत शिकणाऱ्या मुलींना सायकल पुरवणे, घरकूल योजना ■ एकात्मिक फलोत्पादन अभियानांतर्गत ३० टक्के लाभ महिलांना **संपर्क** – संबंधित जिल्ह्याचे तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी.

### महाराष्ट्र मानव विकास मिशनच्या योजना

**सायकल वाटप:** राज्यातील १२५ अति मागास तालुक्यांमध्ये इयत्ता ८ वीते १२ पर्यंत शिक्षण घेत असलेल्या आणि शाळेपासून ५ कि.मीअंतरापर्यंत राहणाऱ्या गरजू मुलींना सायकल वाटप.

**गाव ते शाळा वाहतुकीची सुविधा:** मुलींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यांचे शाळा गळतीचे प्रमाण रोखणे, मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण कमी करणे यासारख्या उद्देशाने सर्व मुलींना मोफत प्रवासासाठी एस.टी बसेसची सोय.

अस्मिता

**आरोग्य तपासणी:** गरोदरपणात व नवजात अर्भकाबाबत घ्यावयाच्या काळजीचे योग्य मार्गदर्शन, संस्थात्मक प्रसूतीमध्ये वाढ, गंभीरस्वरूपाच्या आजारांचे वेळीच निदान, अर्भक आणि मातामृत्यूच्या प्रमाणात घट, कुपोषित बालकांच्या प्रमाणात घट. या उद्देशातून

## माझी कन्या भाग्यश्री

महिला व बाल विकास विभागाच्या 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेची अंमलबजावणी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्याद्वारे. हे लाभ दारिद्र्य रेषेवरील ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांनाही लागू.

सुकन्या योजनेत राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबात जन्माला येणाऱ्या पहिल्या दोन मुलींच्या नावे २१,२०० रुपयांची रक्कम (मुलींच्या जन्माच्या एका वर्षाच्या आत) आयुर्विमा महामंडळात गुंतवून लाभार्थी मुलगी पूर्ण १८ वर्षांची झाल्यानंतर तिला १ लाख रुपये देण्याची तरतूद होती. सुकन्या योजनेतील दारिद्र्य रेषेखालील गटासाठी देण्यात येणारे सर्व लाभ माझी कन्या भाग्यश्री योजनेत कायम ठेवण्यात आले आहेत. त्यापुढे जाऊन आता हे लाभ दारिद्र्य रेषेवरील ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांनाही लागू करण्यात आले आहेत.



माझी कन्या भाग्यश्री योजनेचे प्रमाणपत्र एका बालिकेस देताना महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे. सोबत पशुसंवर्धन मंत्री महादेव जानकर, महिला व बाल विकास राज्यमंत्री विद्या ठाकूर व जलसंधारण राज्यमंत्री विजय शिवतारे

### योजनेतून मिळणारे मुख्य लाभ

**आयुर्विमा:** मुलीच्या नावावर शासनामार्फत आयुर्विमा महामंडळाकडे २१,२०० रुपयांचा विमा उतरवण्यात येईल. मुलगी १८ वर्षांची पूर्ण झाल्यानंतर तिला १ लाख रुपये विम्याची रक्कम देण्यात येईल. या रकमेपैकी १० हजार रुपयांची रक्कम मुलीच्या कौशल्य विकासासाठी किंवा उच्च शिक्षण अथवा स्वंयरोजगार मिळवण्यासाठी खर्च करणे आवश्यक.

**आम आदमी विमा योजना:** लाभार्थी मुलीचे पालक १८ ते ५९ वयोगटातील रोजगार करणारे कुटुंबप्रमुख किंवा कुटुंबातील एक मिळवती व्यक्ती असल्यास – आयुर्विमा महामंडळात (मुलीच्या नावे गुंतवलेल्या रकमेतून) प्रतिवर्षी १०० रुपये इतका हप्ता भरून कर्त्या पालकाचा आम आदमी विमा उतरवला जाईल. कर्त्या पालकांचा अपघात, मृत्यू झाल्यास या योजनेून त्यांना खालीलप्रमाणे लाभ मिळतील.

नैसर्गिक मृत्यू ३० हजार, अपघातामुळे मृत्यू ७५ हजार, दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी झाल्यास ३७५०० रुपये.

**संपर्क** – विमा प्राधिकरण

शिक्षा सहयोग कार्यक्रमातून मुलीला ९ वी, १० वी व ११ वी पर्यंत प्रत्येक सहा महिन्याला ६०० रुपये शिष्यवृत्ती. **संपर्क**– (ग्रामीण भाग)– उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालकल्याण, जिल्हा परिषद, (नागरी भाग)– बालविकास प्रकल्प अधिकारी

**प्रधानमंत्री जनधन योजना:** लाभार्थी मुलगी व तिची आई यांच्या संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेत बचतखाते उघडले जाईल. त्यामुळे १ लाख रुपयांचा अपघात विमा व ५००० रुपयांचा अधिकर्ष (ओव्हर ड्राफ्ट) याचा लाभ त्यांना मिळेल. माझी कन्या भाग्यश्री योजनेतील लाभ मुलीला प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत असलेल्या बँक खात्यात देण्यात येईल.

**विशेष लाभ:** दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात जन्माला येणाऱ्या पहिल्या आणि दुसऱ्या मुलीला तिच्या वयाच्या प्रत्येक टप्प्यानुसार मिळत राहतील. (एकुलती एक मुलगी म्हणजे एका मुलीनंतर तिच्या आईने कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केलेली असणे आवश्यक)

गरोदर आणि स्तनदा माता आणि बालकांच्या आरोग्यतपासणीची योजना. प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या ठिकाणी दरमहा दोन वेळा व ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी एकदा आरोग्य तपासणी. यासाठी आरोग्यशिबिरांचे आयोजन. महिला आरोग्य अधिकारी व बालरोगतज्ज्ञांकडून तपासणी व औषधोपचार. योजनेची अंमलबजावणी जिल्हा आरोग्य अधिकारी (जिल्हा परिषद)

**बुडीत मजुरी:** अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील आणि दारिद्र्यरेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजुरी देण्याची अभिनव योजना. गर्भवती आणि बाळंत महिलांना विश्रांती मिळावी, किमान आहार मिळण्यासाठी साहाय्य मिळावे, मातेची आणि बाळाची प्रकृती चांगली राहावी, अर्भक आणि माता मृत्यूदर कमी व्हावा, माता आणि बालकांमधील कुपोषण दूर व्हावे, संस्थात्मक प्रसूतीची संख्या वाढावी या उद्देशाने योजनेची अंमलबजावणी. प्रसूतीपूर्व २ हजार आणि प्रसूतीनंतर २ हजार अशी ४ हजार रुपयांची रक्कम संबंधित महिलेच्या राष्ट्रीयकृत बँकेतील खात्यात किंवा पोस्टाच्या खात्यात थेट जमा. **संपर्क –** जिल्हा आरोग्य अधिकारी, (जिल्हा परिषद)

### उच्चशिक्षण




■ सर्व पारंपरिक विद्यापीठे, त्यांना संलग्नित महाविद्यालये, नुदानित, विनाअनुदानित महाविद्यालये, इतर शैक्षणिक संस्था यामध्ये मुलींना ३० टक्के आरक्षण ■ मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढावे, विशेषत: ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षणासाठी अडचणी उद्‌भवू नयेत यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ५० ते १०० मुलींची सोय असलेली प्रियदर्शिनी वसतिगृह योजना.
■ मुंबईमधील विविध महाविद्यालयांमधून शिक्षण घेणाऱ्या मुलींची राहण्याची सोय व्हावी यासाठी चर्चगेट, येथे न्या. तेलंग स्मारक वसतिगृह आणि चर्नीरोड, मुंबई येथे सावित्रीदेवी महिला वसतिगृह कार्यरत. ■ उच्च शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली सहसंचालक (उच्च शिक्षण) यांच्या मुख्यालयी मुलींची ९ नवीन वसतिगृहे बांधण्यास तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या ५ वसतिगृहांचा विस्तार करणार.

### तंत्रशिक्षण

■ तंत्रशिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील संस्थांमध्ये मुली आणि मुले या सर्वांना प्रवेश दिला जातो. पुढील योजनांमध्ये १०० टक्के मुली लाभार्थी असून, या योजनांचा १०० टक्के खर्च त्यांच्याचसाठी होत आहे. ■ शासकीय तंत्रनिकेतनामधील मुलींसाठी वसतिगृह, अभियांत्रिकी महाविद्यालयातील मुलींसाठी वसतिगृह

### महिला व बालविकास विभागाच्या योजना

#### जन्माचे स्वागत व संगोपन

**एकुलती एक मुलगी:** मुलीच्या पालकांच्या खात्यात पाच हजार रुपये जमा होणार. **दुसरी मुलगी:** एक मुलगी असतांना दुसरी मुलगी जन्मल्यास पालकांच्या खात्यात २५०० रुपये जमा होणार. एकुलत्या एक मुलीच्या आजीआजोबांना प्रोत्साहनात्मक कमाल ५ हजार रुपयांपर्यंत सोन्याचे नाणे भेट मिळेल

#### वयाच्या पाच वर्षांपर्यंत पोषण

एकुलत्या एक मुलीस रोज एक अंडे किंवा २०० मि.ली. दूध देण्यासाठी प्रतिवर्षी २ हजार याप्रमाणे पाच वर्षांसाठी १० हजार रुपये, दोन मुलींसाठी प्रतिदिन एक अंडे किंवा २०० मि.ली. दूध यासाठी प्रत्येकी १ हजार रुपये प्रतिवर्ष याप्रमाणे पाच वर्षांसाठी १० हजार रुपये

#### प्राथमिक शाळा

एकुलत्या एक मुलीचा पहिली ते पाचवी पर्यंतचा शैक्षणिक खर्च व पोषण यासाठी २५०० प्रतिवर्ष याप्रमाणे पाच वर्षांसाठी १२५०० रुपये, दोन मुलींच्या पहिली ते पाचवी पर्यंतच्या शालेय खर्च व पोषणासाठी प्रत्येक मुलीस १५०० प्रतिवर्ष याप्रमाणे पाच वर्षांसाठी १५ हजार रुपये

#### माध्यमिक शाळा

एकुलत्या एक मुलीच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेचा खर्च व पोषण यासाठी प्रतिवर्ष ३ हजार रुपये याप्रमाणे ७ वर्षांसाठी २१ हजार रुपये.दोन मुलींच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचा खर्च व पोषण यासाठी २ हजार रुपये प्रतिमुलगी याप्रमाणे ७ वर्षांसाठी २८ हजार रुपये. **संपर्क –** ग्रामीण व नागर भागातील अंगणवाडी सेविका. कुटुंबातील पहिले अपत्य मुलगा व दुसरी अपत्य मुलगी जन्मल्यास तिला हे लाभ मिळणार नाहीत. दत्तक, अनाथ व दुसऱ्या

## मनोधैर्य योजना

बलात्कार, ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या स्त्रिया व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांचे पुनर्वसन व त्यांना अर्थसाहाय्य. घटनेचा परिणाम म्हणून स्त्रिया किंवा बालकास कायमचे मतिमंदत्व अथवा अपंगत्व आल्यास तसेच सामूहिक बलात्कारांच्या प्रकरणात गंभीर इजा झाल्यास किंवा ॲसिड हल्ल्यामध्ये चेहरा विद्रूप झाल्यास १० लाख रुपयांचे अर्थसाहाय्य. यापैकी ७५ टक्के रक्कम १० वर्षासाठी पीडितांच्या नावाने बँकेत मुदत ठेव म्हणून तर २५ टक्के रकमेचा धनादेश पीडितांना तत्काळ देण्याचा निर्णय. ३१ डिसेंबर २००९ पासूनच्या पात्र प्रकरणांना पूर्वलक्षी प्रभावाने योजनेतील अर्थसाहाय्य मिळू शकते.

■ महिला व बालविकास विभाग ■ अल्पमुदती निवास गृहे ■ नोकरी करणाऱ्या महिलांची वसतिगृहे ■ महिलांसाठी प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम ■ स्वाधार ■ उज्ज्वला.

प्रसूतीच्यावेळी जुळ्या मुलींचा जन्म झाल्यास त्यांना हे विशेष लाभ मिळतील. दारिद्र्यरेषेवरील कुटुंबात (पांढऱ्या रेशनकार्डधारक कुटुंबासह) जन्माला येणाऱ्या एकुलत्या एक मुलीनंतर आईने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली तर मुलीच्या जन्मानंतर तिच्या आजीआजोबांना पाच हजार कमाल मर्यादेपर्यंत सोन्याचे नाणे भेट मिळेल.

### गावांचा गौरव

मुलींचे दर हजारी प्रमाण मुलांपेक्षा जास्त असलेल्या ग्रामपंचायतीस ५ लाख रुपयांचे बक्षीस. योजनेची अंमलबजावणी सचिव महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समितीमार्फत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीची स्थापना. आरोग्य विभागाच्या सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेतून दारिद्र्यरेषेखालील मुलींच्या पालकांना कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेनंतर २ हजार रुपये रोख दिला जाणार. मुलीच्या नावे ८ हजार रुपयांचे बचतप्रमाणपत्र देण्याऐवजी माझी कन्या भाग्यश्री योजनेचा लाभ मिळणार.

### बाल विकास विभाग


■ शासकीय महिला वसतिगृहे (राज्यगृहे) ■ महिला संरक्षणगृहे– ■ आधारगृहे ■ महिला प्रशिक्षण केंद्रांना साहाय्यक अनुदान ■ व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन ■ निराश्रित मुलींच्या विवाहासाठी अनुदान– ■ देवदासींकरिता कल्याणकारी योजना– ४० वर्षांवरील देवदासींना उदरनिर्वाहाकरिता दरमहा ६०० रुपयांचे निर्वाह अनुदान. देवदासींचे प्राबल्य असलेल्या ११ जिल्ह्यात ही योजना कार्यान्वित.■ देवदासी व तिच्या मुलींच्या विवाहासाठी अनुदान. ■ मुला–मुलींना गणवेश तसेच शालेय साहित्यासाठी अनुदान, ही अनिष्ट प्रथा नाहीशी व्हावी, या उद्देशाने तसेच त्यांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या व्यक्तीला दिवंगत लताताई सकट यांच्या नावाने राज्यस्तरावर १ लाखाचा पुरस्कार. या क्षेत्रात उत्तम काम करणाऱ्या दोन संस्थांना ५० हजार रुपयांचा पुरस्कार. ■ मुलामुलींसाठी वसतिगृह ■ बहुउद्देशीय महिला केंद्र – विविध क्षेत्रातील माहिती उपलब्ध करून देणे, त्यांच्यासाठीच्या योजनांची माहिती देऊन त्याचा लाभ कसा घ्यायाचा हे समजून सांगणे. संकटग्रस्त स्त्रियांना कायदेविषयक सल्ला आणि मार्गदर्शनासाठी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि औरंगाबाद येथे प्रत्येकी एक याप्रमाणे ५ बहुउद्देशीय महिला केंद्र कार्यरत.

भुकंपग्रस्त लातूर जिल्ह्यात २७ तर उस्मानाबाद जिल्ह्यात २५ अशी ५२ बहुउद्देशीय महिला केंद्रे कार्यरत. या केंद्रामार्फत स्त्रियांना मानसिक आधार, कायदेविषयक सहाय्य व सल्ला, व्यवसाय प्रशिक्षण, तात्पुरते आधारगृह यासारख्या सुविधांची उपलब्धता. केंद्रास दरवर्षी ४६४०० रुपयांचे अनुदान. ■ **समुपदेशन केंद्रे–** स्त्रियांवर होणाऱ्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी अपर मुख्य सचिव गृह (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली कृती दलाची स्थापना. महिलांना कायदेविषयक सहाय्य, सल्ला आणि मार्गदर्शन करण्यासाठी १०५ समुपदेशन केंद्रे कार्यरत.




### शुभमंगल सामूहिक/ नोंदणीकृत विवाहासाठी अनुदान


शेतकरी आणि शेतमजुरांच्या मुलींचे सामूहिक विवाह, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग वगळता अन्य वर्गातील एक लाख रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार, परित्यक्ता, विधवा स्त्रियांच्या दोन मुलींच्या विवाहाकरिता योजना लागू. **संपर्क –** जिल्हा नियोजन समिती. सामूहिक विवाहात सहभागी न होता विवाह नोंदणी कार्यालयात जाऊन नोंदणीकृत विवाह करू इच्छिणाऱ्यांना योजनेचा लाभ मिळतो.



या योजनेत सहभागी होऊन विवाह करू इच्छिणाऱ्या कुटुंबातील मुलीच्या विवाहासाठी प्रतिजोडपे १० हजार रुपयांचे अनुदान वधूच्या आईच्या नावाने, आई हयात नसल्यास वडिलांच्या नावाने आणि दोघे हयात नसल्यास मुलीच्या नावाने देण्यात येते. या योजनेत काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे २ हजार रुपयांचे प्रोत्साहनात्मक अनुदान मिळते. शासकीय, निमशासकीय शासन अनुदानित संस्थांमधील सेवा भरतीमध्ये स्त्रियांसाठी ३० टक्के जागा राखीव.

### महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत योजना

माविम अर्थात महिला आर्थिक विकास महामंडळ ३३ जिल्ह्याच्या ३१५ तालुक्यातील १४१७९ गाव व शहरांमधील ११ लाख स्त्रियांपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले आहे. माविमचे स्वत: चे ९२ हजार बचतगट आहेत. या माध्यमातून जवळपास ११ लाख महिला संघटित झाल्या आहेत. बचतगटांना ४ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध होते.माविम स्थापित बचतगटातील स्त्रियांनी आतापर्यत ४३२ कोटी रुपयांची बचत जमा केली असून, राष्ट्रीयकृत बँकांकडून १३४६ कोटी रकमेचे कर्ज मिळवले आहे. स्वत:ची बचत आणि बँकाकडील कर्ज असे मिळून १७२४ कोटी रुपयांची रक्कम स्त्रियांनी अंतर्गत कर्ज म्हणून वाटली आहेत. या कर्जाच्या मदतीने गटातील स्त्रियांनी कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, भाजीपाला लागवड यासारख्या उद्योगांची सुरुवात केली आहे. सध्या असे ३६०९ सूक्ष्म व्यवसायाचे प्लॅन. ८९०४३ स्त्रियांचा सहभाग. पाण्याची कमतरता असलेल्या ठिकाणी दुग्धव्यवसाय व बकरीपालनासारखे व्यवसाय यशस्वी व्हावेत याकरिता हायड्रोफनिक व आजोला



सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन, चारा उत्पादनाचे विशेष प्रयत्न. उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पॅकेजिंग आणि लेबलिंगची प्रशिक्षणे. रेल्वेमध्ये ई कॅटरिंग प्रकल्पांतर्गत बचतगटांनी तयार केलेले खाद्यपदार्थ विकण्याचा प्रयोग सिंधुदुर्ग जिल्ह्यात. स्त्रियांनी ग्रामसभेत सहभाग, ग्रामसभेत स्त्रियांच्या विकासासाठी असलेल्या निधीचा योग्य वापर, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहभागी असलेल्या स्त्रियांना प्रशिक्षण, बचतगटातील २८०९९ स्त्रिया, जिल्हा परिषद अध्यक्ष, सभापती, सरपंच आणि सदस्य अशा विविध स्वरूपात कार्यरत. घर आणि कुटुंबाच्या मालमत्तेवर महिलेचाही समान अधिकार असावा यासाठी जागृती. गेल्या दोन वर्षात ९७,४५२ कुटुंबांनी सातबाराच्या उताऱ्यावर महिलांचे नाव लावण्यासाठी अर्ज. त्यापैकी २५ ४३१ अर्जावर कार्यवाही पूर्ण. या सर्व विभागांच्या समन्वयातून १ लाख ९५ हजार स्त्रियांना विविध लाभ. बचतगटांच्या बळकटीकरणाकडे जाणीवपूर्वक लक्ष. ३१५ बचतगटांचे महासंघ. या महासंघावर स्त्रियांची मालकी असावी यासाठी विशेष प्रयत्न. महामंडळ शासनाच्या विविध विभागासोबत इतर बिगरशासकीय संस्था आणि कंपन्यांसोबतही काम करत आहे. यामध्ये टाटा ट्रस्ट, गुगल इंडिया यांच्या मदतीने इंटरनेट साथीसारखा प्रायोगिक तत्वातील कार्यक्रम २७ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. इतर संस्थांच्या मदतीने अमरावती जिल्ह्यातील ४ तालुक्यात कापूस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसोबत प्रायोगिक प्रकल्प राबवला जात आहे.

### तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम

विविध योजनांतर्गत स्थापन झालेल्या बचतगटाची चळवळ निरंतर राहावी यासाठी तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमातून प्रयत्न केला जातो. १५० ते २०० गटांचे मिळून एक लोकसंचलित स्वयंसहाय्यता बचतगटाचे साधन केंद्र निर्माण केले जाते. आजमितीस ३१५ लोकसंचलित साधन केंद्रामार्फत साधारणत: ७ लाख ८४ हजार ७६३ व्यक्तिंना लाभ.

### अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम

अल्पसंख्याक समूहातील स्त्रियांचा सामाजिक आणि आर्थिक विकास करून त्यांना सक्षम करण्याचे काम या योजनेतून केले जाते. १० जिल्ह्यातील १३ अल्पसंख्याकबहूल कार्यक्षेत्रात हा कार्यक्रम राबविला जातो. आतापर्यंत ४० हजार २३४ व्यक्तिंना या कार्यक्रमाचा लाभ.

### दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय राष्ट्रीय नागरीउपजीविका अभियान

महाराष्ट्रातील २५ महानगरपालिका आणि २७ नगरपालिका अशा एकूण ५२ शहरी कार्यक्षेत्रात बचतगटांची निर्मिती, प्रशिक्षण, सुक्ष्म पतपुरवठा करणे व बँकांशी जोडण्याचे काम या अभियानांतर्गत केले जाते. आतापर्यंत ७१ ४४४ व्यक्तिंना याचा लाभ.

### कृषी समृद्धी समन्वयीत कृषी विकास प्रकल्प

विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वर्धा, वाशिम, यवतमाळ, या सहा जिल्ह्यात हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. याचा मुख्य उद्देश या भागातील कृषीक्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांमध्ये समन्वय साधत शाश्वत शेती विकासाद्वारे शेतकऱ्यांच्या कौटुंबिक उत्पन्नामध्ये भर घालणे हा आहे. आतापर्यंत ५७ हजार २२२ व्यक्तिंना लाभ.

### महिला प्रांगण

या योजनेतून माविमस्थापित बचतगटातील स्त्रियांना क्षमतावृद्धीचे प्रशिक्षण दिले जाते. गडचिरोली, भंडारा, वाशिम आणि हिंगोलीत ही केंद्रे कार्यरत आहेत. सपंर्क – कार्यक्रम व्यवस्थापक, माविम.

### पशुसंवर्धन विभाग

पशूसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाने विविध पशूपालनाच्या योजनांमध्ये स्त्री लाभार्थींना ३० टक्के प्राधान्य दिले आहे.

**वैयक्तिक लाभाच्या योजना**

■ दुधाळ जनावरांचे गट वाटप ■ शेळीपालन ■ कोंबडीपालन

### शिक्षण विभाग



**शिष्यवृत्ती योजना (मुले-मुली) :-** ■पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती ■ ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना (केंद्र सरकार) ■ ग्रामीण भागातील हुशार आणि पात्र विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती ■ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय (खुली) गुणवत्ता शिष्यवृत्त्या ■ संस्कृत शिक्षण-माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना भारत सरकारची शिष्यवृत्ती ■ राष्ट्रीय भारतीय सैनिक महाविद्यालय, डेहरादून येथील सरकारी शिष्यवृत्ती ■ आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती ■ राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (केंद्र सरकार) ■ अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती.

**विद्यार्थ्यांसाठी (मुले/मुली) योजना :-**

■ स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती ■ आजी माजी सैनिकांच्या मुले -मुलीं-पत्नी आणि विधवांना शैक्षणिक सवलती ■एक लाखापेक्षा जास्त उत्पन्न नसलेल्या पालकांच्या विद्यार्थ्यांना शुल्क माफी- ■१० वी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण ■ आदिवासी विद्यावेतन.

## इतर योजना

■ राज्यात टंचाई जाहीर झाल्यानंतर टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफ. ■ प्राथमिक शिक्षकांच्या, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा तसेच अध्यापक महाविद्यालयातील सर्वस्तरावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मुला-मुलींना पदव्युत्तरस्तरापर्यंत मोफत शिक्षण योजना. अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम आणि वर्धा या सहा जिल्ह्यात अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सर्व विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सवलती. यात परीक्षा शुल्क माफ करणे, संपूर्ण प्रवेश व शैक्षणिक शुल्काचा परतावा, वह्या, पुस्तके व इतर किरकोळ खर्चासाठी किरकोळ वार्षिक अनुदान यांचा समावेश. (**संपर्क** - विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद.

## मुलींसाठी योजना

■ अध्यापक विद्यालय स्त्रियांसाठी ३० टक्के आरक्षण व मोफत शिक्षण ■ माध्यमिक शाळेतील मुलींना राष्ट्रीय योजनेतून ३ हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता ■ केंद्र शासनाची ही योजना खासगी विनाअनुदानित शाळांमधील आणि कस्तूरबा गांधी बालिका विद्यालयातून इयत्ता ८ वी उत्तीर्ण झालेल्या आणि ९ वीत शिकत असलेल्या अनुसूचित जाती-जमातीच्या मुलींना लागू. (वयाची १६ वर्षे पूर्ण न झालेल्या अविवाहित मुलींसाठीच ही योजना लागू)

## राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना



ग्रामीण भाग व 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रातील मुलींचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील इयत्ता ८ वी च्या मुलींसाठी ही योजना सुरू. यासाठी इयत्ता ७ वी मध्ये ४५ टक्के गुण प्राप्त केलेले असणे तसेच शासन मान्यताप्राप्त अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असलेली असणे आवश्यक. योजनेत लाभार्थ्यांची निवड करतांना दुर्गम, अतिदुर्गम भाग तसेच शहरी भागात झोपडपट्टी तसेच गलिच्छवस्तीतील मुलींना प्राधान्य. (**संपर्क**- शिक्षणाधिकारी- माध्यमिक जिल्हा परिषद)

## मॉडेल स्कूल व मुलींचे वसतिगृह

केंद्र शासनाने प्राथमिक, माध्यमिक शाळेमध्ये मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी दहा जिल्ह्यातील अक्कलकुवा, धडगाव, तळोदा, शहादा, नंदूरबार, नवापूर, गेवराई, वडवणी, धारूर, हिंगोली, परभणी, गंगाखेड, जिंतूर, पूर्णा, पाथरी, सेलू, मानवत, भोकरदन, परतूर, मंठा, घनसांगवी, अंबड, जालना, बदनापूर, डहाणू, तलासरी, विक्रमगड, मोखाडा, जव्हार, गगनबावडा, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा, मुखेर, उमरी, धर्माबाद, बिलोली, धानोरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी, सिरोंचा या ४३ ठिकाणी मॉडेल स्कूल व मुलींचे वसतिगृह सुरू करण्याची योजना.( संपर्क - शिक्षणाधिकारी, माध्यमिक जिल्हा परिषद)




## मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण

या योजनेचा लाभ ११ वी १२ मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना मिळतो. अनुदानित तसेच विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलींना ही योजना लागू आहे. योजनेच्या लाभासाठी कोणत्याही प्रकारच्या उत्पन्नाची अट नाही. सर्व आर्थिकस्तरातील विद्यार्थिनी आपोआपच या योजनेस पात्र ठरतात.

## अहिल्याबाई होळकर: मुलींना मोफत पास योजना

ग्रामीण भागातील ज्या मुली गावात शाळा नसल्यामुळे शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यांच्याकरिता इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत च्या मुलींना शाळेत जाण्यासाठी एस.टीने मोफत प्रवास करण्याची सवलत.

## स्वंयसिद्धा स्त्रियांकरिता स्वसंरक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम

महाराष्ट्रातील प्रत्येक स्त्री ही स्वंयसिद्धा व्हावी, निर्भयपणे वावरावी यासाठी क्रीडा विभागातर्फे मुली आणि स्त्रियांसाठी ही योजना राबविण्यात येते. योजनेत स्त्री मास्टर्सकडून विविध शाळांमध्ये, महाविद्यालयातील मुलींना तसेच इतर घटकातील स्त्रियांना स्व संरक्षणाचे पाठ तसेच कायदेशीर मार्गदर्शन दिले जाते. (**संपर्क** - सहाय्यक संचालक क्रीडा व युवक सेवा) याशिवाय शालेय पोषण आहार योजना, सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजना, आणि मोफत गणवेश योजनांचा लाभ मुलींना मिळतो.

## आरोग्य विभाग

**प्रसूतीपूर्व सुविधा**- गरोदर स्त्रियांची नोंदणी करण्याचे काम आरोग्य विभागामार्फत केले जाते. गरोदर स्त्रियांची किमान ४ वेळा तपासणी केली जाते. प्रसूतीपूर्व काळात आवश्यक त्या प्रयोगशाळा तपासण्या, गरजेनुसार प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक लोहयुक्त गोळ्या, कॅलशियमच्या गोळ्या देण्यात येतात. आवश्यकता भासल्यास रक्तक्षय कमी करण्यासाठी शिरेद्वारे लोहयुक्त इंजेक्शन दिले जाते.

**मातृत्व दिवस**- ज्या स्त्रियांचे बाळंतपण जोखमीचे वाटते अशा मातांची तपासणी करण्याकरिता उपकेंद्र वगळता सर्व संस्थांमध्ये बुधवार हा दिवस मातृत्व दिवस म्हणून पाळला जातो.

अपेक्षित प्रसूती दिनांक आणि ठिकाणांची यादी- सर्व आरोग्य संस्थांमध्ये गरोदर स्त्रियांचा अपेक्षित प्रसूती दिनांक, प्रसूतीसाठी निवडलेल्या दवाखान्याचे नाव दर्शविणाऱ्या याद्या व त्याचे संनियंत्रण करण्याची कार्यवाही केली जाते. ज्यामुळे गरोदर स्त्रियांची प्रसूती योग्य त्या आरोग्यसंस्थांमध्ये करता येऊ शकते. अतिजोखमीच्या मातांची स्त्रीरोग तज्ज्ञांकडून पुर्नतपासणी. औषोधोपचार आणि संदर्भ सेवा देण्यात येतात. आरोग्य संस्थांमध्ये अशा जोखमीच्या आणि तीव्र

रक्तक्षय म्हणजे रक्ताची कमी असणाऱ्या मातांची यादी तयार केली जाते. याप्रमाणे सर्व गरोदर स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येते.

## प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान

दर महिन्याच्या ९ तारखेला दुसऱ्या आणि तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांची तपासणी, प्रयोगशाळा चाचण्या, जोखमीच्या मातांची तज्ज्ञांकडून तपासणी करून उपचार करण्याचे काम या अंतर्गत केले जाते.

## प्रसूतीअंतर्गत सुविधा

बाळंतपणानंतर बाळाला जन्म देणाऱ्या मातेला किमान ३ दिवस आरोग्य संस्थांमध्ये वास्तव्यास ठेवले जाते. ज्यामुळे प्रसूती पश्चात गुंतागुंत टाळता येते, बाळाचे आरोग्य, लसीकरण याबाबींची काळजी घेण्यात येते. या काळात स्तनपान, मातेचा आहार, कुटुंब नियोजनाच्या साधनांबाबत तसेच इतर आरोग्यविष्यक माहिती या स्त्रियांना देण्यात येते.

## प्रसूती पश्चात सुविधा

घरी प्रसूती झालेल्या माता आणि बालकांचा १ ल्या, ७ व्या, १४ व्या, २१ व्या, २८ व्या आणि ४२ व्या दिवसापर्यंत आशा कार्यकर्तीमार्फत आणि आरोग्य सेविकांमार्फत पाठपुरावा केला जातो. या दरम्यान स्तनपान, मातेचे आरोग्य तसेच धोक्याची लक्षणं याबद्दल खात्री केली जाते. संस्थांमध्ये प्रसूती झालेल्या माता आणि बाळांचा ३ ऱ्या, ७ व्या, २१ व्या, २८ व्या आणि ४२ व्या दिवसापर्यंत आशा कार्यकर्ती आणि एएनएमकडून पाठपुरावा केला जातो. संस्थात्मक प्रसूतीची टक्केवारी वाढावी यासाठी प्रयत्न केला जातो.

## गरोदर आणि प्रसूत स्त्रियांसाठीच्या इतर सेवा




केंद्रशासनामार्फत राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागात, महानगरपालिका क्षेत्रात जननी सुरक्षा योजना राबवण्यात येत आहे. या योजनेचा लाभ शासकीय आरोग्य संस्थेत अथवा जननी सुरक्षा योजनेकरिता मानांकित करण्यात आलेल्या खाजगी आरोग्य संस्थेत प्रसूती झाल्यास देण्यात येतो.

## जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम सर्व जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत सर्व मातांना तसेच प्रसूतीसाठीच्या कोणत्याही खेपेच्या गरोदर स्त्रियांना तसेच १ वर्षापर्यंतच्या आजारी बालकांना सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये मोफत पुरवण्यात येतात. एक वर्षापर्यंतच्या आजारी बालकास मोफत उपचार **सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना –** ■ एका मुलीवर शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तीस २ हजार रुपये रोख व मुलीच्या नावे ८ हजार रुपयांची रक्कम राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात ■ दोन मुलींवर शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तीस २ हजार रुपये रोख व प्रत्येक मुलीस ४ हजार या प्रमाणे ८ हजार रुपयांची रक्कम राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात.

## महिला ई-हाट

महाराष्ट्रात उमेद (ग्रामविकास्), माविम (महिला व बाल विकास), आदिवासी आणि अल्पसंख्याक विभाग अशा विविध विभागांच्या माध्यमातून लाखो स्त्रियांनी संघटित होत बचतगटांच्या माध्यामातून उद्योग- व्यवसाय सुरू केले आहेत. अशा स्त्रियांच्या उत्पादन आणि सेवांच्या विक्रीसाठी ई हाट हे ऑनलाईन विक्रीचे दालन आहे.

उद्योजकीय स्त्रियांना, स्त्री स्वंयसहाय्यता गटांना आणि स्त्री स्वयंसेवी संस्थांना त्यांचे प्रस्ताव rmkosh@gmail.com या ई-मेलवर किंवा राष्ट्रीय महिला कोष, बी-१२, चौथा मजला, कुतुब इंस्टिट्युशनल एरिया, नवी दिल्ली, ११००१६ या पत्त्यावर पाठवता येतात. महिला ई हाट च्या माध्यमातून उत्पादने संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी असलेल्या समितीला प्रदर्शित करावयाच्या वस्तूंच्या निवडीचे अंतिम अधिकार समितीकडे असतो.

## सामाजिक न्याय विभाग

■ अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती ■ पुस्तकपेढी ■ पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना ■ निर्वाह भत्ता ■ शिष्यवृत्ती ■ माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ■ भारत सरकारची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना

## इतर योजना

■ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन ■ गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल ■ अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसाहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा ■ वृद्धाश्रम/ मातोश्री वृद्धाश्रम ■ विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती ■ विजाभज/ इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रदान ■ इयत्ता दहावीच्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज/ विमाप्र प्रवर्गाच्या मुला-मुलींना राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती ■ व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न वसतिगृहातील व शासकीय वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या परंतु वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र असलेल्या विजाभज/विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना ■ इयत्ता ८ वी ते १० मध्ये शिकणाऱ्या विजाभज/ विमाप्र प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ■ माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विजाभज/ विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना



मॅट्रीकपूर्व गुणवत्ता शिष्यवृत्ती ■ माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विजाभज/विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा शुल्क प्रदान ■ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील विजाभज/ विमाप्र प्रवर्गाच्या प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन विमुक्त जाती भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी कनिष्ठ महाविद्यालय ■ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विजाभज आणि विमाप्र प्रवर्गाच्या उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण (मागेल त्याला प्रशिक्षण) ■ शालांत पूर्व शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ■ मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ■ स्वंयरोजगारासाठी दिव्यांग व्यक्तींना वित्तीय सहाय्यक (बीजभांडवल) ■ दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधनांचा पुरवठा ■ दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके.

## कौशल्य विकास

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळांच्या शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि वित्तीय सहाय्याच्या योजना. ■ नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी मुंबई, पुणे आणि नागपूर येथे वसितगृहे ■ मागासवर्गीय मुला-मुलींसाठी शासकीय

## प्रधानमंत्री मातृवंदना योजना

**आई कामावर गेल्याने बाळाला आईचं दूध मिळत नाही. बाळाचेही पोषण होत नाही आणि यातून कुपोषणाची समस्या जन्म घेते हीच बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने प्रधानमंत्री मातृवंदना योजना १ जानेवारी २०१७ पासून राबवण्यास सुरुवात केली.**

**महाराष्ट्रात अंमलबजावणी:** **महाराष्ट्र शासनाने ही योजना सर्व जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आरोग्य सेवेचे आयुक्त हे राज्य पातळीवरील समन्वय अधिकारी म्हणून काम करतील.**

**पहिल्याच अपत्यासाठी लागू:** **ही योजना केवळ पहिल्याच अपत्यासाठी व सरकारने अधिसूचित केलेल्या संस्थेत नोंदणी झालेल्या स्त्रियांना लागू आहे, या अंतर्गत पाच हजार रुपयांची रक्कम तीन टप्प्यांत संबंधित लाभार्थी स्त्रीच्या खात्यात थेट जमा करण्यात येईल. या योजनेचे लाभ वेतनासह मातृत्व रजा मिळणाऱ्या स्त्रियांना मिळणार नाही.**

**मातृवंदना या योजनेमधून आर्थिकसाहाय्याचा १ हजार रुपयांचा पहिला हप्ता गरोदर मातांनी शासकीय रुग्णालयात नोंद केल्यानंतर मिळेल. दुसरा दोन हजार रुपयांचा हप्ता बाळंतपूर्व तपासणी करतांना गर्भधारणेच्या सहाव्या महिन्यानंतर मिळेल. योजनेतील तिसरा दोन हजार रुपयांचा हप्ता स्त्री प्रसूत झाल्यानंतर बाळाला सर्व लसी दिल्याची खात्री केल्यानंतर मिळेल.**

अस्मिता

वसतिगृहे ■ विभागीयस्तरावर १ हजार विद्यार्थी क्षमता असलेली मागासवर्गीय मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे ■ अनुसूचित जाती आणि नवबौद्ध मुला-मुलींकरिता तालुकास्तरावर १०० शासकीय निवासी शाळा ■ सफाई कामगारांच्या मुला-मुलींसाठी पब्लिक स्कूल ■ अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींसाठी विभागीयस्तरावर उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था ■ १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती ■ सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ■ मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण ■ आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक साहाय्य ■ कन्यादान योजना.

याशिवाय मागासवर्गीय विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे - विभागीय स्तरावर ७ आणि जिल्हा आणि तालुकास्तरावर ४३ अशी एकूण ५० नवीन शासकीय वसतिगृहे. विभागीय वसतिगृहांची प्रवेशक्षमता २५० तर जिल्हा आणि तालुकास्तरीय वसतिगृहांची प्रवेशक्षमता १००.

## दिशा कार्यक्रम

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमासमवेत (यूएनडीपी) दिशा प्रकल्प राबवण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. स्त्री सक्षमीकरण, कौशल्य विकास, दारिद्र्यनिर्मूलन, स्वंयरोजगाराचा विकास

## बेटी बचाओ बेटी पढाओ

**राष्ट्रीयस्तर आणि राज्यस्तरावरील मुलींबाबतची असणारी अनास्था थांबवून लिंग निवडीस प्रतिबंधकरणे, मुलींच्या शिक्षणाबाबत आणि मुलीच्या जीवनमानाच्या सुरक्षेबद्दल खात्री देण्याच्या उद्देशाने केंद्रसरकारने बेटी बचाओ- बेटी पढाओ हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. महाराष्ट्रामध्ये बीड, जळगाव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली, जालना, हिंगोली, सोलापूर,पुणे,परभणी,नाशिक, लातूर या जिल्ह्यांमध्ये ही योजना राबण्यासाठी जिल्हा कृती आराखडा तयार करण्यात आला असून महिला व बालविकास विभागाच्या प्रधानसचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तर आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवायोजना यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीची स्थापना.**



असे कार्यक्रम या अंतर्गत राबवले जात आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळासोबत, ग्रामविकास विभागात उमेद अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासोबत तर कौशल्य विकास विभागासोबत सामंजस्य करार केले आहेत.

### आदिवासी विभागाच्या स्त्रिया आणि मुलींसाठी योजना

■ अतिदुर्गम आणि डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी मुला-मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून, त्यांना शैक्षणिकदृष्ट्या सुरक्षित करणे, त्यातून त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने शासकीय आश्रमशाळा योजना. यातील काही आश्रमशाळांचे रुपांतर कन्याशाळांमध्ये ■ आदिवासी मुलामुलींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने ज्या आश्रमशाळा इयत्ता १० वी पर्यंत पोहोचल्या आहेत त्या शाळांपैकी १२५ ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालये सुरू. ■ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेण्याची संधी. ■ ठाणे, नाशिक, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यात केंद्र पुरस्कृत पब्लिक स्कुल म्हणजे एकलव्य निवासी शाळा सुरू.

### आदिवासी मुलींना एअरहोस्टेसचे प्रशिक्षण

■ व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती, परदेशात शिकण्यासाठी शिष्यवृत्ती, शासकीय वसतिगृहे, आदिवासी महिला सशक्तीकरण योजना, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे, केंद्र सरकारच्या शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती, इयत्ता ८ वी ते १२ च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, सैनिक शाळांना जोडून जादा तुकडीची निर्मिती, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती, कौशल्य विकासाच्या योजना अशा विविध योजना. ■ आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजनेची अंमलबजावणी. यामध्ये वर किंवा वधू अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक.

■ अंगणवाडी आणि मिनी अंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना आहारातून उष्मांक व प्रथिनांची उपलब्धता होण्यासाठी आदिवासी जिल्ह्यात 'भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजने'ची अंमलबजावणी.

■ या योजनेंतर्गत गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीत व स्तनदा मातांना बाळंतपणांनंतर पहिल्या तिमाहीत याप्रमाणे सहा महिन्याच्या कालावधीत एक वेळ चौरस आहार. योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १६ जिल्ह्यातील ६९६२ गावातील अंगणवाड्यांमध्ये राबविण्यात येते.

### अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजना

मुस्लीम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, शीख, पारसी व ज्यू या अल्पसंख्यांक समाजातील होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थी-विद्यार्थिनींना उच्च व्यावसायिक शिक्षण घेण्यास प्रेरित करण्यात येते.

■ उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता (मुले-मुली) शिष्यवृत्ती योजना. (भाग-ख वैद्यकीय / तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रम) (भाग- खख १२ वी नंतरचे बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम) ■ अल्पसंख्याक मुलींसाठी राज्य योजनेंतर्गत वसतिगृहे. २३ वसतिगृहे बांधण्यास मान्यता व निधी. चंद्रपूर, कोल्हापूर, रायगड, जालना, अमरावती, औरंगाबाद या जिल्हयात तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अशा ठिकाणी वसतीगृहे सुरू. नंदुरबार, परभणी, भंडारा, अकोला, नांदेड,हिंगोली, मुंबई, पुणे, सोलापूर, सांगली, लातूर, नागपूर, रत्नागिरी, यवतमाळ, जळगांव. या १५ ठिकाणी कार्यवाही सुरू. ■ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दुसरी / तिसरी पाळी सुरू. अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारीत रोजगाराभिमुख व्यावसायिक प्रशिक्षण. कुशल मनुष्यबळाची निर्मिती. कौशल्य विकासातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना राबवण्यात येते. ■ अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांसाठी स्वयंसहाय्यता बचतगट

### वित्त विभागाचे विशेष निर्णय (शासकीय निमशासकीय आणि अनुदानित संस्थांमधील महिला कर्मचाऱ्यांसाठी)

■ दिव्यांग अपत्य असलेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास संपूर्ण शासकीय सेवेत ७३० दिवसांच्या कमाल मर्यादेपर्यंत विशेष बालसंगोपन रजा. ■ सेवेत असताना एकट्या शासकीय कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास(स्त्री/पुरुष) चरितार्थाचे कोणतेही साधन नसलेल्या आणि त्यांच्यावर पूर्णत: अवलंबून असलेल्या पालकांना कुटुंब निवृत्ती वेतन ■ ८० वर्षांवरील निवृत्ती/ कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना कुटुंब निवृत्तीवेतनात १० टक्के वाढ ■ स्व ग्राम योजनेतील कुटुंबाची व्याख्या वाढवून त्यात आई- वडील, अवलंबित अज्ञान भाऊ बहीण यांनाही लाभ ■ एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नीला मिळणारे निवृत्तीवेतन ही तिच्या पुनर्विवाहानंतरही मिळणार. तिच्या मृत्यूपर्यंत तिला पहिल्या पतीच्या निवृत्तीवेतनाचा लाभ ■ सेवा भरतीच्या माध्यमातून रुजू झालेल्या आणि दोन वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास पूर्णवेतनी प्रसूती रजा. रजा मंजूर करताना सेवा कालावधीची अट रद्द

■ महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवसांची प्रसूती रजा

■ कामगार आणि रोजगारहमीसह इतर विभागांनी असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांसाठी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यात सामाजिक सुरक्षितता, समान वेतन- समान मजुरी, प्रसूती रजा, आरोग्य सुविधा यांचा समावेश. केंद्र सरकारची सुकन्या समृद्धी योजना, महिला शक्ती केंद्र, किशोरी शक्ती योजना यासारख्या योजना राबवल्या जातात. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतून बालक, गरोदर आणि स्तनदा मातांच्या आहारावर लक्ष केंद्रित केले जाते.

**वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती)**

**राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण (आरजेएमसीएचएन) मिशनच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये तरुण, किशोरवयीन मुले आणि महिलांमधील पोषण सुधारण्यासाठी क्षेत्रीय दृष्टिकोन ठेवून पावले उचलण्यात आली आहेत. एक मजबूत, संवेदनशील आणि सक्षम मातृत्वाचे प्रतीक म्हणून राजमाता जिजाऊ यांना मानले जाते. त्याचप्रमाणे सध्याच्या असंख्य जिजाऊंच्या माध्यमातून निरोगी, सदृढ आणि तेजस्वी मुलांची पिढी घडवण्याचा राज्य शासनाचा निर्धार आहे.**

अस्मिता

# कुपोषणमुक्ती



**अमृत आहार योजनेंतर्गत सकस आहार घेताना आदिवासी महिला.**

**प्रा. गणेश तारे**

राज्य नेहमीच युवा मुले, पौगंडावस्थेतील मुले व स्त्रियांना पोषक आहार देण्याच्या बाबतीत आघाडीवर राहिले आहे. त्याचबरोबर आरोग्य व पोषण मिशनची स्थापना करणारे राज्य देशात पहिले आहे. २००५ मध्ये या मिशनची सुरुवात करण्यात आली.

## निर्धार

या मिशनच्या मागील दोन टप्प्यांत राज्याने कुपोषण दूर करण्याच्या दृष्टीने लक्षणीय सुधारणा केली आहे. लहान मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण ४६ वरून ३४ टक्क्यांवर आणण्यात यश आले. हे प्रमाण पुढील तीन वर्षांत ३४ टक्क्यांहून ५ ते २३ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचा शासनाचा निर्धार आहे.

राज्य २०२२ पर्यंत कुपोषणमुक्त करण्याचे लक्ष्य राज्य शासनाने ठेवले आहे. हे मिशन (जानेवारी २०१८ - डिसेंबर २०२२) कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठी शर्थीचे प्रयत्न करणार आहे. पौगंडावस्थेतील मुले आणि बालकांचे पहिले १,००० दिवस (गर्भधारणा, जन्म आणि २ वर्षांपर्यंत) तसेच दुर्गम भागातील सहा वर्षांखाली असुरक्षित बालकांना कुपोषणापासून दूर केले जाईल.

## लोकचळवळ

संशोधनानुसार (लॅन्सेट २०१७) मुलांचा मेंदू पहिल्या २-३ वर्षात जीवनभराच्या तुलनेत जलद विकसित होत असतो. शिवाय हा काळ त्याच्यासाठी संक्रमणाचादेखील असतो. त्यामुळे त्याला या वयात योग्य पोषण मिळणे आवश्यक असते. हे मिशन केवळ मिशन न राहता लोकचळवळ व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विविध सामाजिक संस्था, सोशल मीडिया, सामाजिक कार्यकर्ते, युवक-युवती आदींमार्फत जनजागृती केली जात आहे.

या मिशनअंतर्गत राज्यातील कुपोषणाने सर्वाधिक प्रभावित २२ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

## योजनांचे एकत्रीकरण

प्रधानमंत्री मातृवंदन योजना, महिला व बालविकास विभागाची 'सबला' योजना, इन्टिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिस, जननी सुरक्षा योजना, सार्वजनिक आरोग्य विभागाची राष्ट्रीय आरोग्य मिशन, स्वच्छ भारत मिशन, अन्न व नागरी पुरवठा / सार्वजनिक वितरण व्यवस्था, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्टेट रूरल लाईव्हलव्हलीहूड मिशन, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना आदी योजनांचा या मिशनमध्ये समावेश करून ते यशस्वी केले जाईल. कुपोषणमुक्तीसाठी कार्य करणाऱ्या विविध विभागांच्या योजनांच्या एकत्रित अंमलबजावणीच्या दृष्टीने माता-बाल आरोग्य व पोषण मिशन 'टेक्निकल युनिट' म्हणून कम करेल.

## कुपोषणमुक्तीसाठी मिशनचा कार्यक्रम:

■ तीव्र कुपोषित असणाऱ्या मुलांसाठी अंगणवाडी केंद्रामार्फत गाव बाल विकास केंद्रांची (व्हीसीडीसी) स्थापना करणे. ■ सामाजिक संस्था, आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहयोगाने नावीन्यपूर्ण उपक्रम आणि सोशल मार्केटिंगसाठी भागीदारी. ■ कुपोषणमुक्तीसाठी माध्यमांचा प्रभावी वापर. ■ कुपोषमुक्तीसाठी योजना, उपक्रम राबवणारे शासनाचे विविध विभाग आणि संस्था यांचे समन्वयन. ■ शहरी तसेच दुर्गम भागात कुपोषण मुक्तीच्या अंमलबजावणीसाठी तांत्रिक आणि क्षमता विकास साहाय्य देणे. ■ राज्य, जिल्हा पातळीवरील अंमलबजावणीची देखरेख. ■ शहरी भागातील कुपोषण, बालवयातील लठ्ठपणा दूर करण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा स्थापित.

■■

इर्शाद बागवान

# उमेद आत्मसन्मानाची

**महिलांच्या सक्षमीकरणासाठी ग्रामविकास विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. यात प्रामुख्याने उमेद अभियान, सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना, पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना या योजनांचा उल्लेख करावा लागेल.**

बचतगटांच्या चळवळीला चालना देण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात 'उमेद' अभियान राबवण्यात येत आहे. 'उमेद' या शब्दातच योजनेचा सगळे सार सामावले आहे. उमेदने लाखो स्त्रियांना स्वरोजगाराची वाट दाखवली. यामध्ये गरिबी निर्मूलनाचा समग्र विचार करण्यात आला असून, समुदाय विकासापासून शाश्वत उपजीविका निर्माण करण्यापर्यंतच्या सर्व बाबींचा यात समावेश आहे.

## गावपातळीपर्यंत 'उमेद'

राज्यात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समुदाय संसाधन व्यक्तींची एक भक्कम फळी गावपातळीपर्यंत उभी केली गेली आहे. समुदाय संसाधन व्यक्तीमार्फत गरीब कुटुंबांची नेमकी ओळख करून, त्यांना स्वयंसाहाय्यता गटात समाविष्ट करण्याचे मोलाचे काम या अभियानांतर्गत केले जाते. समुदाय संसाधन व्यक्ती या स्थानिक स्त्रिया असून, त्या समुदाय संस्थांचा एक भाग म्हणून काम करतात.

'उमेद' अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची राज्यात १५ जिल्ह्यात आणि १३४ तालुक्यात इन्टेन्सिव्ह पद्धतीने तर उर्वरित तालुक्यात सेमी व नॉन इन्टेन्सिव्ह पद्धतीने अंमलबजावणी होत आहे. सेमी आणि नॉन इन्टेंसिव्ह तालुक्यांचे रूपांतर टप्प्याटप्प्याने इन्टेन्सिव्ह तालुक्यात केले जाईल.

## कर्ज पुरवठा

राज्यात उमेद अंतर्गत एकूण १ लाख ८१ हजार बचतगट स्थापन झाले आहेत. बचतगटांना तीन महिने पूर्ण झाल्यानंतर १० ते १५ हजार रुपये एवढा फिरता निधी दिला जातो. याचा उपयोग गटातील स्त्रिया त्यांच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी तसेच व्यवसायासाठी करू शकतात. गट सहा महिन्यांचा झाल्यानंतर त्या गटातील प्रत्येक सदस्यांचा सूक्ष्म गुंतवणूक आराखडा तयार करून, त्या गटास ६० हजार रुपये एवढा समुदाय गुंतवणूक निधी दिला जातो. अतिगरीब व जोखीमप्रवण कुटुंबासाठी प्रति ग्रामसंघ ७५ हजार तर बँकांमार्फत प्रत्येक गटास १ लाख रुपये एवढ्या रकमेचे पहिले कर्ज दिले जाते. स्त्रियांना त्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी तसेच क्षमताबांधणीसाठी 'उमेद' अंतर्गत प्रशिक्षण दिले जाते. या अभियानाचा लाभ गावातील सर्व गरीब स्त्रिया घेऊ शकतात. त्यासाठी त्यांनी स्वंयसाहाय्यता गट किंवा बचतगटात सहभागी होणे आवश्यक आहे.

**संपर्क :** गावात इन्टेन्सिव्ह तालुका अभियान व्यवस्थापक, तालुक्यात तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष तर सेमी आणि नॉन इन्टेन्सिव्ह क्षेत्रात गट विकास अधिकारी, पंचायत समिती.

## दीनदयाळ उपाध्याय कौशल्य विकास योजना

'उमेद' अभियानांतर्गत ग्रामीण भागातील युवक युवतींना या योजनेतून प्रशिक्षण देऊन विविध कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून दिला जातो. या वर्षी जवळपास २३ हजार युवक-युवतींना प्रशिक्षण देऊन कंपनीमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार



## सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना

**राज्य शासनाने बचतगटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज देण्याची महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली असून, राज्यात आतापर्यंत ४ हजार ६६२ बचतगटांना याचा लाभ झाला आहे, या योजनेंतर्गत आतापर्यंत १ कोटी ५२ लाख रुपयांचे व्याज अनुदान वितरित करण्यात आले आहे. राज्यात १ लाख ८१ हजार स्वयंसाहाय्यता बचतगट आहेत तर ३ हजार ९५६ ग्रामसंघ काम करत आहेत. अभियानात सहभागी बचतगटांना आजर्यंत ३ हजार १८७ कोटी रुपये इतक्या रकमेचे कर्ज विविध बँकांमार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहे. जे गट नियमित कर्ज परतफेड करतात त्यांना केंद्र शासनाच्या व्याजावरील अनुदान व राज्य शासनाच्या सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत व्याजावरील अनुदान प्राप्त होते व त्या गटांना प्रभावी शून्य टक्के दराने कर्ज उपलब्ध होते. गटाच्या गरजेनुसार बँकेकडून गटांना कर्ज देण्याची सोय अभियानांतर्गत करण्यात आली आहे. http://www.umed.in या संकेतस्थळावर जाऊन या अभियानाची माहिती आपण घेऊ शकाल.**

आहेत. यासाठी प्रकल्प अंमलबजावणी संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्वरोजगार करण्याची इच्छा असणाऱ्या युवक-युवतींना जिल्हास्तरावर लीड बँकांच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाते. बँकांमार्फत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. यामध्ये या वर्षी प्रतिजिल्हा ७५० युवक-युवतींना प्रशिक्षण देऊन स्वरोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. अभियानात वर्धिनी, प्ररिका, पशुसखी, कृषी सखी, कृतिसंगम सखी अशा पद्धतीने समुदाय संसाधन व्यक्ती म्हणून काम करण्याची संधी दिली गेली आहे. जवळपास २१ हजार स्त्रियांनी याचा लाभ घेतला आहे. त्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले आहे. या माध्यमातून प्रशिक्षित आणि कौशल्य विकसित झालेली, समुदाय संसाधन व्यक्तींची फळी निर्माण झाली आहे.

### उत्पादनांना बाजारपेठ

अभियानात जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर प्रदर्शनांचे आयोजन करून, स्त्रियांच्या बचतगटातील उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. बचतगटातील स्त्रियांना पणन कौशल्ये उपलब्ध करून देण्यासाठी उस्मानाबाद, वर्धा, रत्नागिरी जिल्ह्यात, केरळ येथील कुटुंब श्री संस्थेच्या मदतीने लघू उद्योग सल्लागार तयार करण्यात आले आहेत. वर्धा जिल्ह्यात गटाच्या वस्तुंची विक्री व व प्रदर्शन करण्यासाठी वर्धिनी सेवा संघामार्फत जिल्हास्तरावर कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### बचतगटांना प्रशिक्षण

बजतगटांना फक्त पापड, लोणचे आणि चटण्या यांच्या उत्पादनात अडकवून चालणार नाही. बाजारपेठेची आवश्यकता लक्षात घेऊन बचतगटांनी आपल्या उत्पादनांचे नियोजन करणे गरजेचे आहे. त्यामुळे उमेद अभियानांतर्गत आता बचतगटांसाठी शेळीपालन, मत्स्यव्यवसाय, शेती तंत्रज्ञान, कुक्कुटपालन आदींच्या प्रशिक्षणावर भर देण्यात येत आहे. सुमारे १ लाख १२ हजार इतक्या बचतगटांना याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

अस्मिता

वासंती वर्तक

# मार्ग यशाचा

प्रत्येक स्त्रीलाच घर आणि नोकरी, नोकरी आणि मुलांचं संगोपन अशी दुहेरी-तिहेरी कसरत करावी लागत असते. पण ती करताना उपलब्ध वेळ आणि पैसा हा सतत स्वत:च्या क्षेत्रातल्या अधिक अभ्यासासाठी, सतत काहीतरी पुढचं शिकत रहाण्यासाठी प्रशिक्षणाचे नवे नवे मार्ग चोखाळण्यासाठी खर्च केला; तर यशाचा मार्ग सुकर होतो. यशाच्या मार्गावर अनेक संधी येतात, येतच असतात. महामार्गाच्या ट्रॅफिकमध्ये कशी... पण कुठली संधी ही आपल्या करिअरसाठी पकडायला हवी, उपयुक्त ठरेल तीच संधी पकडायला हवी.

यशाची एक कळी जेव्हा फुलू लागते त्या टप्प्यावर नेहमी क्षणभर थबकून, या फुलण्यासाठी मातीचे, पाण्याचे, झाडाचे, देठाचे, कळीवर सावली धरणाऱ्या पानांचे कष्ट होते हे जाणवायला हवे. म्हणजे आधुनिक भाषेत म्हणायचं तर 'टीमवर्क' असते तिथे टीमसाठी कृतज्ञता व्यक्त करायची दानत असायलाच हवी. या कृतज्ञतेच्या चार शब्दांनी चार माणसे आपण जोडून घेतो. थोडेसे श्रेय दिले तर आपले सहकारी जिवापाड साथ देतात. तेही यशाचे भागीदार असतात.

आधुनिक जगात ज्याला नेटवर्किंग म्हणतात ते फार महत्त्वाचे आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातली, वेगवेगळ्या गुणवत्तेची माणसे आपल्याला समृद्ध करतात. आपल्या कामाचा दर्जा वाढवतात, अनेक दिशांनी ते काम पसरवत नेतात. पण नेटवर्किंग करतानाच एक भान ठेवायला हवे.... माणसांची मदत घ्यावी, पण माणसांना वापरून बाजूला सारू नये. नाहीतर माणसे दुखावतात. प्रगतीच्या वेगात ते लक्षातही येत नाही. माणसांची मदत घेणे आणि त्यांना वापरणे यातला फरक सूक्ष्म असला तरी दूरगामी परिणाम करतो.

सध्याच्या जगात प्रत्येक स्त्रीला जीवघेण्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते. अशा वेळी तिची स्वत:ची एकादी खुबी किंवा खासियत असायला हवी, जी चार जणांच्या स्पर्धेत तिला आघाडीवर ठेवेल. कधी ती विदेशी भाषा असेल, कधी स्वत:च्याच क्षेत्रातला ॲडव्हान्स कोर्स असेल तर कधी केवळ गोड बोलणेसुद्धा असू शकते. अडचणीच्या वेळी शांत डोक्याने, गोड बोलून प्रश्न सोडवणे हा महत्त्वाचा आणि दुर्मीळ गुण ठरतो.

कधीकधी थोड्याशा यशाबरोबर खूप कौतुक वाट्याला येते. हे कौतुक आपला प्रगतीचा वेग कमी करू शकते. उलट त्या कौतुकाने जबाबदारी वाढली असे मनात ठेवले, तर स्त्री आणखी प्रगती करते.

प्रत्येकाच्या अंगात काही उपजत गुण असतात. काही कष्टाने आणि सवयीने बाणवले जातात. त्यांना लखलखीत धारदार ठेवणे आणि दैनंदिन कामात वापरणे गरजेचे असते.

स्वत:च्या कक्षा रुंदावणारे, वाढीच्या संधी टिपणारे काम सतत करत राहणे, मित्रमैत्रिणींच्या साथीनं पुढे जाणे आणि नव्या आव्हानांसाठी सज्ज राहणे हेच खरं तर आपल्या हातात असते. प्रगतीच्या वाटेवर चालताना मूल्यांची साथ न सोडणे, तत्त्वांशी तडजोड न करणे यावर आपण श्रद्धा ठेवू शकतो... बाकी कशाचा विचार करूच नये याचा अर्थ दैववादी असावे असे नाही. पण सकाळी सोनेरी प्रकाश पसरतो, वाऱ्याच्या हलक्या लाटा बागेवर स्वार होतात. त्यातल्या कुठल्या रविकिरणाने आणि कुठल्या झुळकेने कळी खुलेल हे आपल्याला सांगता येते का? तसेच आहे हे.




# स्वावलंबी 'महालक्ष्मी'

**राज्यातील ग्रामीण, शहरी भागातून मोठ्या संख्येने महिला बचतगट, लघू गृहउद्योग, तसेच मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, छत्तीसगड, तेलंगाणा व पूर्व भारतातून अनेक राज्यांनी नाबार्डच्या सहयोगाने निर्माण केलेल्या उद्योगाच्या वस्तूंचे प्रदर्शन या वेळी भरवण्यात आले. ग्राहकांना सर्व प्रकारच्या वस्तू एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कोट्यवधी रुपयांच्या विक्रीतून महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनत आहेत.**

**स्वप्नील भालेराव / वृषाली बर्गे**

महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसहायता महिला बचतगटांचे असंघटित लघू उद्योगांना एकत्र करून, राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासनाच्या वतीने बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, मुंबई येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शन व विक्री -२०१८ आयोजित करण्यात आले होते.

गेल्या १४ वर्षांपासून भरवण्यात येत असलेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनचा उद्देश राज्यातील ग्रामीण भागातील महिला स्वयंसाहाय्यता गट, कारागीर यांच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीसाठी बाजारपेठ मिळवून देण्याचा आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी फक्त महाराष्ट्रातील नाही तर देशातील अनेक बचतगट मुंबईत आले. मराठी, हिंदी, इंग्रजीसह, कोकणी, अहिआणि, मराठवाडी, नागपुरी तसेच

ओडीसी, पंजाबी, आसामी, गुजराथी, कन्नडी, तमिळ अशा विविध भाषांची गुंफण गुंफली. या प्रदर्शनात एकूण ५११ स्टॉल होते. इतर राज्यातील १५० स्टॉल, नाबार्ड संस्थेकडून ५० प्रायोजित, उमेद अंतर्गत २६० ...... ५१ स्टॉल ../ सहभागी झाले. एकूण १३ दिवस प्रदर्शन चालले. दररोज साधारण २५००० माणसे प्रदर्शनाला भेट देत होती. उत्स्फूर्त प्रतिसाद या प्रदर्शनाला मिळाला.

### खवय्यांसाठी मेजवानी

प्रदर्शनात शाकाहारी व मांसाहारी स्टॉल उभारण्यात आले. कोकणातील लज्जतदार कोळंबीचा रस्सा, पापलेट, सुरमई फ्राय, मसाला खेकडा, सोबत तांदळाच्या भाकरी. कोल्हापुरी तडका, मटण, चिकन, पांढरा-तांबडा रस्सा, खानदेशची ज्वारीची झुणका भाकर, बेसन, ठेचा, विदर्भातील रांजन्या रोटी, मराठवाड्याची पुरणपोळी, हुर्डा, चटणी, लोणचे, यांच्यापासून बनवलेल्या विविध पदार्थांचा खमंग मसालेदार सुवास सर्वत्र दर्वळत होता. खवय्यांनी पदार्थाचा मनसोक्त आस्वाद घेतला. अनेक चवदार पदार्थाची मेजवानी मुंबईकरांना मिळाली.

### विद्यार्थिनी ते सेंद्रिय शेतकरी, धान्य विक्रेती

नामांकित संस्थेत समाजकार्याची पदवी प्राप्त करून, नोकरीची आस न करता सेंद्रिय शेतीची कास अमरावती जिल्ह्यातील; अचलपूर तालुक्यातील पोही गावच्या सोनल बदरके यांनी धरली. रासायनिक खताच्या अती वापरामुळे शेताचा पोत खालावत चालला आहे. त्यामुळे सेंद्रिय शेती करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

अल्पभूधारक सोनलने मोठ्या भावाची दीड एकर जमीन सेंद्रिय लागवड करण्यासाठी घेतली. उन्हाळ्यात वेचणी, नांगरणी, बखरणी केली. गांडूळ विकत घेऊन त्यापासून सेंद्रिय खत बनवले.सुरुवातीस पालेभाज्याची लागवड करून, त्यातून भरघोस उत्पादन काढले. सकाळी आडतला माल घेऊन जाणे, विकणे दुपारी शेतात काम करणे, अशी दिनचर्या चालू झाली. सेंद्रिय भाजीपाल्याला मोठी मागणी असल्यामुळे परिसरातील महिला सेंद्रिय शेती पाहण्यासाठी सोनलकडे येत असत. त्यातून समविचारी मैत्रिणी एकत्र आल्या. विचारांची देवाणघेवाण झाली. यातून बचतगट स्थापन करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. साईनाथ माहिला स्वंयसहायता बचतगट स्थापन झाला. बचतीची सवय लागली. भारतीय स्टेट बँकेने ६०,००० रुपये कर्ज दिले. त्याची परतफेड मुदतीपूर्वी केल्यामुळे पुन्हा १,८०,००० कर्ज मिळाले. या रक्कमेतून नवनिर्मिती करून रोजगार निर्माण करण्याची कल्पना सुचली.

कर्जाच्या पैशातून पारंपरिक कापूस पीक न घेता तीळ, गावरानी चणा, तूर कडधान्याची पेरणी केली. पाच (५) किलो तिळापासून ३०० किलो उत्पादन झाले. लागवड खर्च २०,००० रुपये आला. त्यापासून ६०,००० रुपये मिळाले. ४०,००० रुपये निव्वळ नफा झाला. त्याचप्रमाणे गावरान चणा, तूर यापासूनही भरघोस उत्पादन मिळाले. हा सेंद्रिय माल दुकानदार, सावकार यांच्याकडे न विकता थेट बाजारात बसून विकला. एक पाव, अर्धा, एक किलो वजनाचे पाकीट बंद करून त्यावर स्वतःच्याच बचतगटाचे नाव चिटकवले. काबाडकष्ट करणारी शेतकरी व्यापारी झाली. तिला महालक्ष्मी सरस प्रदर्शन व विक्रीची बाजारपेठ महाराष्ट्र शासनाने मिळवून दिली.

यंदा बोंड अळीने कापूस पिकाचे नुकसान झाले. पारंपरिक कापूस पीक न घेता सेंद्रिय तीळ, तूर, हारभरा लागवडीने माझा फायदा झाला. बचतगटामुळे सावकाराचे कर्ज काढण्याची आवश्यकता राहिली नाही, आम्ही मैत्रिणी एकत्र आलो, विचाराची देवाणघेवाण झाली, बचतीची सवय लागली. महालक्ष्मी सरस प्रदर्शनाने विक्रीसाठी केंद्र उपलब्ध करून दिले.', असे तिने आनंदाने सांगितले.

### खुशबू अगरबत्ती (मजूर ते व्यावसायिक)



चंद्रपूर जिल्ह्यातील पंचायत समिती बल्लारपूरचे विस्तार अधिकारी श्री. खंडरे सरांनी बचतगटाच्या माध्यमातून उद्योग सुरू करण्याची प्रेरणा दिली. वैशाली विलास पायखन यांनी महिलांना एकत्र करून खुशबू स्वयंसहायता महिला बचतगट स्थापन केला. चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ८०,००० रुपये कर्ज काढले. अगरबत्ती उद्योग सुरू करण्याचा निर्णय घेतला. महिला व्यवसाय करणार असल्याने समाजाकडून विरोध झाला. कुंटुंबात नाराजीचे वातावरण पसरले. विरोधाने खचून न जाता कुटुंबाला विश्वासात घेतले. अगरबत्ती बनवण्याची मशिन कर्जाच्या पैशातून विकत घेतली. विदर्भात बांबू मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. त्या कच्च्या मालावर प्रक्रिया करून सुगंधी अगरबत्ती बनवली. बचत गटाच्या सदस्यांनी स्वतः घरोघरी, कार्यालय, बाजारात अगरबत्तीची विक्री केली. मागणी वाढत होती, तसे आर्थिक उत्पन्न वाढत होते. महिलांना अगरबती बनवण्याचे काम मिळाले, गावात रोजगार निर्माण झाला.

शासनाने व्यवसायाची दखल घेत अगरबत्ती विक्रीसाठी चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, पंजाब, रांची, मुंबई, येथील प्रदर्शनात विक्री स्टॅल उभारण्यासाठी मदत केली. ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. खुशबू अगरबत्तीचा सुगंध देशभर दरवळला. व्यवसायातील नफ्यातून कुटुंब, मुलांचे शिक्षण सांभाळत नवीन घर बांधकाम करत आहे. खुशबू महिला बचतगटाला सलग तीन वर्षे राजमाता जिजाऊ पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मोगरा, गुलाब, जास्वंद, चंदन अशा सुगंधाची अगरबती बनवली जाते. ओला-सुका धूपबत्ती बनवतात. नागपूर, गडचिरोली येथून



मागणीप्रमाणे कच्चा माल विकत घेतला जातो. सुगंधी मसाला कांडीला चिकटवतात, मशिनमध्ये टाकतात. तो एकत्र करून पाकिटात भरतो. त्यावर खुशबू अगरबत्तीचे नाव चिटकवून विक्रीसाठी तयार होतात. एक तासात सरासरी ३०० अगरबत्ती तयार होतात.

### इंटरनेट साथी प्रकल्प प्रशिक्षणापासून व्यावसायिक

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात अलिपूर गावच्या विठाई महिला स्वयंसहायता बचतगटाला राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ग्रामविकास विभाग व टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनेट चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या महिलांना टॅब, मोबाइल, बॅगचे विनामूल्य वितरण करण्यात आले. शासनाचे हे प्रशिक्षण ग्रामीण महिलांना थेट जगाशी कनेक्ट करणारे आहे. याचा प्रत्यक्ष अनुभव या बचतगटातील शीतलने घेतला. 'इंटरनेटमुळे माहितीचा खजिनाच आमच्यासाठी खुला करून देण्यात आला. प्रशिक्षणात दिलेल्या माहितीचा उपयोग करून टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनवण्याची चित्रफीत यू-ट्यूबमधून मिळाली. बांगडी, रबर, दोरी, पुठ्ठा टाकाऊ वस्तूंना रंगरंगोटी करून निर्माण केलेल्या वस्तूंचे गावातच दुकान उघडले. वस्तूच्या विक्रीतून आर्थिक परिस्थिती सुधारली. अर्धवट राहिलेले शिक्षण पुन्हा सुरू केले,' अशी प्रतिक्रिया तिने व्यक्त केली.

ती आता गावातील बचतगटांना इंटरनेट वापराचे प्रशिक्षण देत आहे. त्यांच्या बचतगटाला महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी होण्याचे आमंत्रण मिळाले. गावातले दुकान थेट मुंबई शहरात मांडले. त्यात सिल्क बांगडी, बेबी हेअर बेल्ट, कानातले, पिन, पूजेची थाळी, श्रृंगार पेटी, पर्स, ब्रेसलेट, या सौंदर्य साहित्यांची अतिशय आकर्षक पद्धतीने मांडणी केली. ग्राहकांनी खरेदीसाठी गर्दी केली. विक्रीतून चांगला नफा मिळाला. हातात टॅब घेऊन कॅशलेस व्यवहार करत शीतल शिवाजी टिंगळ व अर्चना राजकुमार रसाळे इंटरनेटमुळे जीवनात झालेला हा बदल सांगत होत्या.

### दर्यापूर वियोगी पापड

खासगी कारखान्यात नोकरी करत असताना अचानक मालकाचा मृत्यू झाला. कारखाना बंद झाला. नोकरीच्या अनुभवावर व्यावसायिक होण्याचा निर्णय घेतला. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यात उमरी इतवारपूर गावच्या विभा रमेशराव तळोकर यांनी लघू उद्योगाच्या साहित्याचे भांडवल उभारण्यासाठी महिला बचतगटाची स्थापना केली. सेंट्रल बँकेचे कर्ज घेतले. पापड, शेवया बनवायचे मशिन विकत घेतले. पापड, शेवया, कुरड्या, मसाला पदार्थ, आंबा, लिंबू, हळद, आवळा, कवट, मिरची, करवंद याचे लोणचे बनवले. गाव बाजार, किराणा दुकान, वसतिगृह, महाविद्यालय, कार्यालय येथे घरपोच पोहोचवले. पदार्थांचा दर्जा चांगला असल्यामुळे भ्रमणध्वनीवरून पापडाची मांगणी वाढली. दर्यापूर पापड नावाचा ब्रँड निर्माण झाला. पदार्थ बनवण्यासाठी १६ माहिला कामगारांना रोजगार मिळाला. महिला बचतगट सदस्यांच्या आर्थिक परिस्थितीत बदल झाला. शासनाने लघुउद्योग मालाचे विक्री प्रदर्शन मुंबई शहरात भरवले व्यवसायास प्रोत्साहन दिले. विभा यांनी सांगितले की, शहरातील ऑनलाइन विक्रेते त्यांच्यासोबत करार करण्यासाठी उत्सुक आहेत. हे प्रदर्शन त्यांच्यासाठी उद्योग विस्ताराचे व्यासपीठ बनले.

### पोषक व रुचकर

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या सोयाबीन, ज्वारी, गहू या शेतमालावर प्रक्रिया करून त्यापासून पोषक व रुचकर पदार्थ बनवण्याचा लघुउद्योग सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील शेळगावच्या श्रीमती सारिका संतोष खंडागळे यांनी तुलसी महिला स्वंयसहायता बचतगटाच्या माध्यमातून सुरू केला. कृषी विज्ञान केंद्र गुळवंशीने सोयाबीन व ज्वारी महत्त्व विषद करून त्यापासून लाडू बनवण्याचे प्रशिक्षण दिले. सोया शरीरात प्रोटीनचे प्रमाण वाढवतो. मधुमेह नियंत्रित ठेवतो. ज्वारीतून फायबर अधिक

### अँड्रॉईड ॲप

महिला बचतगटाचा माल नागरिकांना वर्षभर उपलब्ध व्हावा, यासाठी 'महालक्ष्मी सरस' नावाचे ॲप तयार केले आहे. यामुळे ग्राहकांना माहिती मिळते, ऑर्डर देता येते. बचतगटाच्या महिलादेखील चांगली माहिती पुरवतात. या ॲपमुळे महिलांना चांगला फायदा होईल.



मिळते. जे शरीरासाठी उपयुक्त असते. राज्यात हा पहिला प्रयोग. बँकेचे कर्ज व स्वतःचे भांडवल गुंतवणूक करून सोया, ज्वारी प्रक्रिया यंत्र विकत घेतले, लाडू बनवले. डॉक्टर, दवाखाना, औषधालय, किराणा दुकान मालक यांना लाडूचे महत्त्व सांगितले. लाडूचा ग्राहकांना सकारात्मक परिणाम जाणवला. ग्राहकांची मागणी वाढली. लहान मुलांसाठी सोया, ज्वारीपासून चॉकलेट बनवले. त्यात अननस, अंबा, पपई, स्टॉबेरी, अंगूर, सफरचंद स्वाद घालून लहान मुलांना आवडेल, अशा प्रकारे सोनेरी कागदात बांधून विक्रीसाठी ठेवले. मुलांनी आनंदाने विकत घेतले. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळाला. ग्राहकांना औषधाच्या स्वरूपात पोषक खाद्यपदार्थ उपलब्ध झाले. सरस प्रदर्शनात महिलांनी लाडू, चॉकलेट खरेदी करून विदेशास राहणाऱ्या आपल्या नातेवाइकांना पाठवले. आम्हाला आर्थिक नफा मिळाला.

### आवडता छंद झाला व्यवसाय

प्रत्येक मानवात सुप्त गुण असतात ते विकसित करण्याची संधी दिली पाहिजे. शासनाने महिलांच्या कलागुणांचा आदर बाळगून उमेद प्रकल्पाने अनेक संधी उपलब्ध करून दिल्या, असे मत हिंगोली जिल्ह्यातील केळापूर तालूक्यात तेलंगटाकळी येथील सावित्रीबाई फुले स्वंयसहायता महिला बचतगटाच्या अध्यक्षा नैनाबाई सोनेकर, सचिव मृणयी सोनेकर यांनी व्यक्त केले. घर सजावट करण्याचा छंद. झुंबर, तोरण, बांगडी बनवणे, घरातील लहान वस्तू पटकन मिळाव्या, यासाठी चावी गुच्छ, पेन, कंगवा, स्टँड बनवले. छायाचित्र कवर, पायपुसणी, वुलनच्या वस्तू बनवण्याची आवड. बनलेल्या वस्तू घरात सुव्यवस्थित सजावट करून ठेवल्या. उमेद प्रकल्पाचे कार्यकर्ते घरातील वस्तू पाहून भारावून गेले. बनवलेल्या वस्तूचा व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन दिले. यवतमाळ व मुंबई शहरात स्टॉल मांडण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. ग्राहकांनी मोठ्या संख्येने वस्तूंची खरेदी केली. आमचा आवडता छंद शासनाच्या मदतीने, स्थैर्य आणि आर्थिक उत्पनाचा व्यवसाय झाला, असे मनोगत या महिलांनी व्यक्त केले.

### स्मार्ट ई – अभियान

बदलत्या प्रवाहाबरोबर उमेद आणि महालक्ष्मी सरस एक्झिबिशन फेसबुक पेज तयार करण्यात आले आहे. लवकरच ई–मार्केट पोर्टल सुरू होत आहे. यामुळे २४ तास खरेदी विक्रीचे व्यवहार सुरू राहतील. त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर देखील रिटेल मार्केट सुरू करण्यात आले असून, सध्या नागपूर व वर्धा या ठिकाणी ते सुरू आहे.

### एक क्लिक

महालक्ष्मी सरसबद्दल संपूर्ण माहिती www.mahalaxmisaras.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच जिल्हा ग्रामीण विकास अधिकाऱ्याकडे व बचतगट सखीकडे माहिती उपलब्ध होऊ शकते. काही अडचण किंवा तक्रार असल्यास ceo.msrlmgmail.com यावर थेट मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मेल पाठवू शकता.

**सूर्यकांता महिला शेतकरी बचतगट सातेफळ, ता. वसतक, जि. हिंगोली**

कावेरी प्रल्हाद बोरघडे यांनी सांगितले की, २००४ला ११ महिलांना घेऊन त्यांनी बचतगट सुरू केला. सेंद्रिय शेतीवर त्यांचा खूप भर आहे. 'सेंद्रिय हळद 'हे त्यांचे मुख्य उत्पादन आहे. 'महालक्ष्मी सरसचा २०१६ बेस्ट प्रोडक्ट' पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. प्रदर्शनात तीनपट विक्री होते. महिलांना महिना ५ ते ९ हजार रुपये मिळतात. हळदीचे पॅकिंग, बाजारपेठबरोबर त्यांच्यातील महिलांनी पापड, लोणची हा जोडधंदाही सुरू केला आहे. हिंगोली जिल्ह्यात १७ बचतगट आहेत. या बचतगटांची मिळून 'शेतकरी उत्पादक कंपनी'ची स्थापना त्यांनी केली. शेतकऱ्यांचा माल जागेवर खरेदी करणे, त्याच्यावर प्रक्रिया करणे व थेट बाजारपेठेत पोहोचवणे ही कामे कंपनी करते. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातात पैसे मिळतो. या वर्षी कंपनीला ३ कोटी ९ लाख फायदा झाला.



**चिदघना स्वयंसाहाय्यता महिला बचतगट पारतळे, ता. मुरबाड, जि. ठाणे**

कायद्याची विद्यार्थिनी चैताली दळवी, हिने सांगितले की, मायक्रोमार्टचा वापर करून आम्ही वेगवेगळे कंदील तयार केले. हे कंदील मायक्रोमच्या धाग्यापासून तयार केले जातात. रात्रीच्या अंधारात lighting साठी हे कंदील आकर्षक ठरतात. तसेच खिडक्यांजवळ वाऱ्याच्या झुळकेबरोबर या कंदिलाचा निनाद घरभर घुमतो. तसेच हॉलमधील शोसाठी याचा वापर जास्त आकर्षक ठरतो. मी कायद्याची विद्यार्थिनी असूनही हा गट स्थापन केल्याने माझी आवड जोपासता आली आणि इतर महिलांनाही आर्थिक पाठबळ मिळत गेल्याने वेगळे समाधान मिळत आहे. शिकलेल्या मुलींचा हा उत्साहवर्धक सहभाग महालक्ष्मी सरसचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

### अमृतवेल महिला बचतगट, श्रीमलंगड वाडी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे

शोभा अरुण नाईक यांनी सांगितले की,'२००९ ला १० महिलांना घेऊन आम्ही बचतगट तयार केला. त्यांच्याकडे बाटीक प्रिंटिंगचे  कपडे तयार केले जातात व बाटिकचे प्रक्षिक्षणही दिले जाते. स्कर्ट, टॉप, साडी, ड्रेस मटेरिअल, फॅन्सी ब्लाऊज इ. तयार केले जातात. आतापर्यंत त्यांनी १५० ते २०० महिलांना प्रशिक्षण दिल आहे. नेहरू रोजगार योजनेमार्फत त्यांनी महिलांना प्रक्षिक्षण दिले. ग्रामीण भागात पंचायत समिती व इतर बचतगटांच्या साहाय्याने त्या महिलांना प्रशिक्षण देत असतात.

### निर्मिती स्वयंसाहाय्यता समूह, ता. पालघर, जि. पालघर

आशा भोवर यांनी सांगितले,'२००२ ला १० महिलांना घेऊन आम्ही बचतगट तयार केला. सुरुवातीला शेती करते, भाजीपाला पिकवते, मोगरा लागवड फुलवून आम्ही बाजारपेठ गाठली. आता तीन वर्षापासून आम्ही बांबूच्या शोभेच्या उपयोगी वस्तूंचा व्यवसाय सुरू केला आहे. विवेक राष्ट्रसेवा समिती भालवली (वसई)ला आम्ही याचे प्रशिक्षण घेतले. इतर महिलांनाही ते प्रशिक्षण दिले. सध्या फूड स्टॅन्ड, स्टार कंदील, आकाश कंदील, लॅम्प, पेपरवेट, गिफ्ट बॉक्स, मोबाइल स्टॅन्ड, की टॅगर, टी कोस्टर, पात्रदार, पेन स्टँड अशा अनेक उपयोगी शोभेच्या बांबूच्या वस्तूंचे उत्पादन आम्ही घेत आहोत. प्रत्येक महिलेला महिन्याला ७ ते ८ हजार रुपये मिळतात.




### सिद्धिविनायक महिला बचतगट, मु. पो. नांदगाव, कोळीवाडा, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

कुसुम शिवा तरे यांनी सांगितलं, २०१५ ला आम्ही १० महिलांना घेऊन बचतगट तयार केला. मच्छी सुकवून पॅकिंग करणे, त्यांना बाजारपेठेत पोहोचवण्याचे काम आम्ही महिला करतो. आमच्याकडे सुकी मच्छी, जवळा, करदी, बोंबील, सोडे, बांगडा, सुरमई इ. प्रकारचे मासे मिळतात. सध्या पापलेट महाग झाला आहे. पूर्वीसारखा मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर मुशी, लाळ, कोळंबी अशा माशाचं प्रमाण कमी झाले आहे. मोठी जाळी आल्यामुळे जास्त नुकसान होत आहे. छोटे मासे यामध्ये अडकून जातात. पण तरीही रोजची कामे सांभाळून प्रत्येक महिलेला दिवस ५०० रुपये मिळतात.

### माऊली महिला बचतगट, मु.पो. आंबोली, ता. गुहागर, जि. रत्नागिरी

ऋतुजा राजेश शिंदे यांनी सांगितले की,'२१ जुले २०१४ ला आम्ही ११ महिलांनी मिळून बचतगट तयार केला. यातील प्रत्येकीचा व्यवसाय वेगवेगळा आहे. माझा व्यवसाय अगरबत्तीचा आहे. काही पापड, लोणची तयार करतात. काही चविष्ट पदार्थांचे स्टॉल टाकतात. काहीजणी बाजारपेठ सांभाळतात. ऑर्डर घेणे, माल पाठवणे, हिशेब तपासणे ही कामे करतात. आमचे व्यवसाय वेगवेगळे असले तरी ऑर्डर आल्यावर आम्ही एकमेकींना मदत करतो. फायदा वाटून घेतो. प्रत्येकीच्या गुणवत्तेला वाव दिल्याने प्रत्येकजण समाधानी आहे. बचतगटामुळे कर्ज मिळाल्याने सगळ्यांचे व्यवसाय भरभराटीला आले आहेत.' महालक्ष्मी सरस फक्त स्त्रियांनाच सबल करते असे नाही, तर प्रत्येक दुर्बल व्यक्तीला सबल करण्यासाठी मदतीचा हात पुढे करते.

**आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन तक्ता - ४ नियम ८ वा**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ |
| २) प्रकाशन काल | : मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : मीनल जोगळेकर |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| ४) प्रकाशकाचे नाव | : मीनल जोगळेकर |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ |
| ५) संपादकाचे नाव | : ब्रिजेश सिंह |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ |

मी मीनल जोगळेकर असे जाहीर करते की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**मीनल जोगळेकर**
**मुद्रक व प्रकाशक**

अस्मिता

# कसोटीचे क्षण

**मीरा बोरवणकर**

**आपल्याला वेळोवेळी आणि अनपेक्षितपणे वेगवेगळ्या संकटांचा सामना करावा लागतो. या प्रसंगी आपली कसोटी लागते. मात्र अशा वेळी स्वत:वर संपूर्ण विश्वास ठेवून या समस्यांना भिडले की, त्यावर मात करण्याचे सामर्थ्य आपल्याला प्राप्त होते.**

आपल्यापैकी बहुतांश जणांच्या मनात एखादी आंतरिक इच्छा असते आणि ती योग्य असल्याचे सिद्ध होते. अशा क्षणांचा अनुभव मीसुद्धा घेतला आहे. त्यातला एक प्रसंग माझ्या चांगल्या स्मरणात राहिला आहे. नागरी सेवांसाठी इंग्रजी विषयात जास्त गुण मिळू शकत नाहीत, असे माझ्या बहिणीचे मत होते. त्यामुळे पदव्युत्तर पदवीच्या शिक्षणासाठी मी इतिहास हा विषय घ्यावा, असे तिचे मत होते. माझी भाषेवर हुकमत असल्यामुळे जर मी इंग्रजी विषय घेतला तर त्याचा भविष्यात मला माझ्या लिखाणात उपयोग होईल, असे मला अगदी मनापासून आतून वाटत होते. माझ्यासाठी तो कसोटीचा क्षण होता. ही तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. 'मी कधी काळी काही लिहीन' याची मला तेव्हा सुतराम कल्पना नव्हती!

'सिक्थ सेन्स' वा 'गट फिलिंग (प्रबळ आंतरिक इच्छा)' या शब्दांबद्दल मी ऐकले होते. त्यामुळे, केव्हा आपल्या आतल्या आवाजाला प्रतिसाद द्यावा आणि केव्हा तर्कसुसंगत धोरण धरावे, याचा मी विचार केला. तार्किक विचारांचे महत्त्व कमी न लेखता मी माझ्या प्रबळ इच्छेला झुकते माप दिले.


मीरा बोरवणकर

माझे वडील पंजाब पोलीस-खात्यात असल्यामुळे मी एका पोलिसी कुटुंबातच मोठी झाले होते. साहजिकच, लहानपणापासून अनेक मैदानी खेळांशी माझी ओळख झाली होती. पंजाब पोलिसांकडे घोडे होते आणि पोलिसांच्या मुलांना घोडेस्वारी शिकून घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जायचे. त्यामुळे, मलाही घोडेस्वारी आवडायला लागली होती. मी जीप चालवायला आणि खूप आधीपासूनच ०.२२ रायफल चालवायला शिकले होते. आणि एवढे होऊनही, जेव्हा यूपीएससीची वेळ आली, तेव्हा मी भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण सेवेची निवड केली. 'मुलींसाठी' हाच सुरक्षित पर्याय असल्याचे माझ्या कुटुंबाला वाटत होते. आधी माझी बहीण पात्र ठरली होती. तिने करिअर म्हणून 'महसूल सेवा', म्हणजेच प्राप्तीकर विभागाची निवड केली होती. 'मला जे करायचे, ते हे नाही' असे मला राहून-राहून वाटत होते, पण त्या काळच्या समस्त मुलींप्रमाणे मीदेखील स्वत:च्या सुप्त इच्छेकडे दुर्लक्ष केले.

शिमलामधल्या 'यारोज' या नावाने प्रसिद्ध असलेल्या भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण सेवेच्या सुंदर प्रशिक्षण अकादमीमध्ये मी जाऊन पोहोचले. एकदम उमद्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली आम्हाला प्रशिक्षण मिळणार होते. असे असले तरी, मला लेखा (अकाऊंट्स) म्हणजेच आकडेमोड करण्यात आणि एका टेबलावर बसून विविध संस्थांची खाती सांभाळणे आणि तपासणे यात काहीच रस नव्हता. 'मस्त मैदानी खेळांत' मला रस होता आणि भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण सेवेचा त्याच्याशी काही संबंध नव्हता. मी स्वत:च्या सुप्त इच्छेकडे लक्ष दिले नव्हते आणि 'मुलींसाठी योग्य' या नावाखाली सरधोपट मार्गाच्या जाळ्यात येऊन पडले होते. त्यातल्यात्यात चांगली गोष्ट म्हणजे, खूप उशीर व्हायच्या आधी मला या गोष्टीची जाणीव झाली आणि मला मनापासून आवडत असलेल्या पोलीस-खात्यासाठी मी परत एकदा नागरी सेवा परीक्षेला बसले. अर्थात, भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण सेवेतल्या माझ्या सहकाऱ्यांना मी अत्यंत बालिश निर्णय घेत होते, असे वाटत होते. त्या निर्णयापासून मला परावृत्त करण्याचे त्यांनी खूप प्रयत्न केले. !

१९८१ सालच्या आयपीएस तुकडीमध्ये मी एकटीच महिला अधिकारी होते. त्यामुळे, काही प्रमाणात त्यांचे भाकीत खरे होते. पण, असे पोलिसी प्रशिक्षण खडतर असले, तरी मी त्यात आनंदी होते. यातून मी एक धडा शिकले होते- स्वत:च्या मनाचा आतला आवाज ऐका. अर्थात मी हा आवाज थोडा उशिराच ऐकला होता. करिअरमध्ये बदल केल्याचा मला कधीच पश्चात्ताप झाला नाही. आज, तीस वर्षांची कारकिर्द झाल्यानंतर मी या निष्कर्षाप्रत पोहोचले आहे की, कोणत्याही समस्येचा तर्कसुसंगत विचार करून आपल्या आंतरिक इच्छेशी त्याचा तोल साधणे, हे चांगले धोरण आहे. माझ्या बाबतीत ते लागू पडले.

योगासने, ध्यानधारणा आणि प्राणायाम यांचीही अंतर्मनाला जोडण्यासाठी चांगली मदत होते. चांगले आरोग्य आणि आंतरिक शांती यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या आणि काळाच्या कसोटीवर उतरलेल्या या पद्धतीचे आता पुनरुज्जीवन झाले आहे, ही चांगली गोष्ट आहे. अंतर्मनाचा आवाज ऐकण्यासाठी स्वत:ची क्षमला वाढवण्याचं काम योग आणि ध्यानधारणेमुळे होते.

### यातून शिकण्यासारख्या गोष्टी

● स्वत:चे म्हणणे ऐका. ● आंतरिक इच्छा आणि तर्कसुसंगत विचार यांचा तोल साधणे, हे चांगले धोरण आहे. ● शांततेमुळे तुमच्या अंतर्मनाला साद घालायला मदत होते. योगासने, ध्यानधारणा आणि प्राणायाम या गोष्टी चांगल्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

**(लेखिका निवृत्त ज्येष्ठ आयपीएस अधिकारी आहेत.)**



डॉ. आबान मिस्त्री

# सलाम कर्तृत्वाला

**स्त्री सक्षमीकरणासाठी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या यशस्वी महिलांचा देशपातळीवर पुरस्कार देऊन उचित गौरव करण्यात येतो. अशाच विविध क्षेत्रांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केलेल्या महिलांना सलाम!**



डॉ. स्वाती पिरामल



सुरेखा यादव

नवनिर्मितीचे बीजांकुर आपल्या उदरात ठेवून नव्या जीवनाला आयुष्य देणारी प्रत्येक महिला ही 'फर्स्ट लेडी' असते. कारण प्रत्येक वेळी आपले आयुष्य पणाला लावून ती नवजीवन देते. स्त्रियांनी आज जवळजवळ सर्वच क्षेत्रे काबीज केली आहेत. ज्या क्षेत्रांमध्ये पुरुषवर्गच मोठ्या प्रमाणात कार्यरत असायचा अशा क्षेत्रांमध्येही स्त्रियांनी आपली सहभाग नोंदवून इतिहासाला नवी दिशा दिली. हा इतिहास घडवणाऱ्या महिलांचा प्रवास थक्क करणारा आहे. हा प्रवास भारतातील प्रत्येकाला माहिती व्हावा, यासाठी केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्रालयाने पुढाकार घेऊन; देशभरातील विविध क्षेत्रात पहिल्या होण्याचा मान मिळवणाऱ्या ११३ महिलांना, 'फर्स्ट लेडी' या पुरस्काराने राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याहस्ते राष्ट्रपती भवनात सन्मानित केले. यामध्ये काहींना मरणोत्तरदेखील सन्मानित करण्यात आले.

## महाराष्ट्रातील महिलांचा सन्मान

भारतात सर्वप्रथम प्रवासी रेल्वे चालवण्याचा विक्रम करणाऱ्या सातारा येथील सुरेखा यादव यांनी पुरस्कार स्वीकारला. त्यांनी १९८८ मध्ये रेल्वेची पहिली महिला स्पेशल लोकल ट्रेन चालवून या क्षेत्रातील पुरुषांची मक्तेदारी मोडून काढली. ८ मार्च २०११ ला त्यांनी डेक्कन क्वीन ही पुणे ते मुंबई (सीएसएमटी) या मार्गावरील रेल्वे चालवून असा विक्रम करणारी आशिया खंडातील पहिली महिला रेल्वे चालक होण्याचा मान मिळवला.

जागतिक ग्रँड मास्टर स्पर्धा जिंकणाऱ्या पहिल्या महिला बुद्धिबळपटू मुंबई येथील पद्मश्री भाग्यश्री ठिपसे यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांनी पाच वेळा बुद्धिबळात राष्ट्रीय चॅम्पियनशिपचा किताब मिळवला आहे. त्या १९९१ मध्ये महिला आशियाई बुद्धिबळाच्या मानकरी ठरल्या. १९९९ च्या राष्ट्रकुल देशांच्या स्पर्धेत त्यांनी सुवर्ण तर तीन वेळा रजत पदकावर मोहर उमटवली आहे. १९८६ मध्ये त्यांनी जागतिक बुद्धिबळ संघाचा जागतिक महिला मास्टर हा बहुमान मिळवला आहे. बुद्धिबळातील त्यांच्या योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री आणि अर्जुन पुरस्काराने सन्मानित केले आहे.




हर्षिनी कान्हेकर

## पहिल्या अग्निशमन अधिकारी

देशातील पहिल्या महिला अग्निशमन अधिकारी नागपूर येथील हर्षिनी कान्हेकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. अग्निशमन अभियंता म्हणून रुजू होऊन त्यांनी देशातील अग्निशमन सेवा व महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रथम महिलेचा सन्मान मिळवला आहे.

देशातील पहिल्या महिला ऑटोरिक्षा चालक परभणी जिल्ह्यातील शीला डावरे यांनाही या पुरस्काराने गौरवण्यात आले. पुरुषांची मक्तेदारी मोडीत काढत त्यांनी १९८८ मध्ये सर्वप्रथम ऑटोरिक्षा चालवली. त्याची नोंद 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने घेतली. त्यांनी सतत १३ वर्षे ऑटोरिक्षा चालवली. त्यानंतर महिला ऑटोरिक्षा चालकांसाठी अकादमी सुरू केली.



शीला डावरे

## पहिल्या कर्णधार

भारतीय महिला क्रिकेट एकदिवसीय संघाच्या पहिल्या कर्णधार पद्मश्री डायना एडलजी यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९७५ ते १९९५ पर्यंत त्यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाचे नेतृत्व करून, महिला क्रिकेटला नवी दिशा दिली. महिला जागतिक क्रिकेट स्पर्धेत त्यांनी भारताचे दोन वेळा नेतृत्व केले. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पद्मश्री व अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



डायना एडलजी

**अंजू निमसरकर**

देशातील पहिली सॅनिटरी पॅडची बँक सुरु करणाऱ्या आमदार म्हणून वर्सोवा, मुंबई येथील



डॉ. भारती लव्हेकर

विद्यमान आमदार डॉ. भारती लव्हेकर यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ‘ती’ संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सार्वजनिक ठिकाणी व शाळांमध्ये सॅनिटरी पॅड एटीएम आणि डिस्पोजल मशीन स्थापित केल्या. त्यांनी स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधासह महिलांच्या आरोग्य, शिक्षणासाठी महत्त्वाचे कार्य केले.


दुर्गाबाई कामत


उपासना मकाती

### चित्रपट सृष्टीतील पहिल्या तंत्रज्ञ

भारतीय चित्रपट सृष्टीतील पहिल्या महिला तंत्रज्ञ पुण्याच्या अरुणा राजे पाटील यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. १९६९ मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीत प्रवेश करणाऱ्या अरुणा राजे पाटील यांनी पटकथाकार, संपादक, दिग्दर्शक आणि निर्माता म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे.

### पहिली कार ड्रायव्हिंग प्रशिक्षण संस्था

देशातील पहिली कार ड्रायव्हिंग प्रशिक्षण संस्था स्थापन करणाऱ्या मुंबई येथील स्नेहा कामत यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला. २०१२ मध्ये त्यांनी ‘शी कॅन ड्राईव्ह’ या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ महिलांसाठी ड्रायव्हिंग प्रशिक्षण देण्याच्या कार्यास प्रारंभ केला. त्यांनी ४०० पेक्षा अधिक महिलांना प्रशिक्षित केले आहे.


भाग्यश्री ठिपसे


स्नेहा कामत

### पहिल्या खाण अभियंता

देशातील पहिल्या महिला खाण अभियंता चंद्रपूर येथील डॉ. चंद्रानी प्रसाद वर्मा यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. त्या नागपूरला स्थायिक आहेत. सीएसआयआर–सीआयएमएफआरच्या नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयात प्रधान शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत.

देशातील पहिल्या टेस्ट ट्यूब बेबीची प्रसूती करणाऱ्या मुंबईच्या प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ पद्मश्री डॉ. इंदिरा हिंदुजा यांना सन्मानित करण्यात आले. १९८९ मध्ये त्यांनी आयव्हिएफ सेंटरची स्थापन केलेली


डॉ. चंद्राणी वर्मा


तारा आनंद


डॉ. इंदिरा हिंदुजा

आहे. सध्या त्या पी.डी. हिंदुजा राष्ट्रीय रूग्णालय आणि वैद्यकीय संशोधन केंद्रात कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना २०११ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. अंधांसाठी देशातील पहिले व्हाईट प्रिंट हे लाइफ स्टाइल मासिक ब्रेल लिपित प्रकाशित करणाऱ्या मुंबई येथील उपासना मकाती यांनाही या वेळी पुरस्कार प्रदान करण्यात आला. २०१३ मध्ये सुरू झालेले हे मासिक शाळा, महाविद्यालये, वृद्धाश्रम, रूग्णालय, ग्रंथालयात उपलब्ध करून दिले जाते. मकाती यांच्या कार्याची दखल घेऊन २०१६ मध्ये फोर्ब्सने आपल्या यादीत स्मार्ट सीईओ म्हणून पहिल्या ३० नावात त्यांची वर्णी लागली होती. डिजिटल आर्ट द्वारे भारतातील महिला योध्यांचा परिचय करून देणारी मुंबईची १९ वर्षीय तरुणी तारा आनंद यांचाही या पुरस्काराने गौरव करण्यात आला. ‘आय ॲम नो मॅन’ नावाने त्यांनी भारतातील महिला योद्ध्यांचे केलेल्या रेखाटनांचे जागतिक स्तरावर कौतुक झाले आहे.

‘असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज ऑफ इंडिया’ (असोचेम)च्या पहिल्या महिला अध्यक्ष मुंबई येथील स्वाती परिमल यांनाही हा पुरस्कार जाहीर झाला. त्या देशातील आघाडीच्या उद्योजक असून आरोग्य, शिक्षण सेवामध्ये आमूलाग्र बदल घडवण्यात त्यांचे योगदान आहे.

### दुर्गाबाई कामत व आबान मिस्त्री यांना मरणोत्तर फर्स्ट लेडी सन्मान

भारतीय चित्रपट क्षेत्रातील पहिल्या महिला नायिका दुर्गाबाई कामत व देशातील पहिल्या महिला तबला वादक डॉ. आबान मिस्त्री यांना मरणोत्तर हा सन्मान जाहीर झाला. दुर्गाबाई कामत यांच्या वतीने हा पुरस्कार त्यांची नातसून वृषाली गोखले यांनी स्वीकारला. तर डॉ. आबान मिस्त्री यांच्या वतीने जामिनी जवेरी यांनी फर्स्ट लेडी पुरस्कारा स्वीकारला.

**माहिती अधिकारी, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली**
**संपर्क: ०९८९९११४१३०**



फेसबूकवरून एखाद्या महिलेला 'फ्रेंड रिक्वेस्ट' पाठवणे, तिच्या फेसबूकवरील पोस्टवर सारखे छळणारे कमेंट करणे, तिला ई-मेलद्वारे अथवा सोशल मीडियाद्वारे प्रत्यक्ष भेटण्यासाठी आग्रह करणे, फोनवर प्रतिसाद मिळाला नाही तर इतर विविध सोशल मीडिया माध्यमाद्वारे सतत संपर्क करत राहणे, एकूणच सर्वतोपरी त्या स्त्रीला त्रास देऊन तिचे शोषण करणे, यालाच सायबर स्टॉकिंगचा गुन्हा असे म्हटले जाते.

### सायबर स्टॉकिंग गुन्ह्याविरुद्धचा कायदा आणि शिक्षा

भारतीय दंड विधानातील कलम ३५४(ड) अन्वये सायबर स्टॉकिंग हा गुन्हा असून, या कलमांतर्गत ३ वर्षांपर्यंतच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे. या गुन्ह्याचे अधिक गंभीर स्वरूप म्हणजे, जेव्हा एखाद्या स्त्रिचे नग्न अवस्थेतील फोटो किंवा चित्रफित मोबाइल वा संगणकाद्वारे प्रसारित करणे. या गुन्ह्याच्या विरोधात माहिती तंत्रज्ञान कायद्यामधील कलम ६६(इ) अंतर्गत नग्न अवस्थेतील छायाचित्रे प्रसारित करून व्यक्तीच्या गोपनीयतेचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली ३ वर्षांचा कारावास आणि २ लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकण्याची तरतूद आहे.

याच कायद्यामधील कलम ६७ अंतर्गत ३ वर्षांचा कारावास आणि ५ लाख रुपयांपर्यंतचा दंड होण्याचीदेखील या गुन्ह्याविरुद्धची तरतूद आहे. तसेच, हा गुन्हा दखलपात्र स्वरूपाचा आहे, म्हणजेच गुन्हेगाराला पोलीस विना-वॉरंट अटक करू शकतात.

देशभरातील सायबर स्टॉकिंगचे वाढते गुन्हे आणि त्यासंदर्भात नोंदवल्या जाणाऱ्या तक्रारी लक्षात घेता या गुन्ह्याविषयी सरकारचे धोरण बदलताना लक्षात येत आहे.

माझ्याजवळ आलेल्या अशा अनेक केसेसपैकी एका केसमध्ये व्हॉट्सअ‍ॅप आणि फोनद्वारे अश्लील संदेश पाठवून सायबर स्टॉकिंगचा गुन्हा झाला होता. या गुन्ह्यामध्ये भारतीय दंड विधानमधील कलम ३५४(ड) अंतर्गत सर्वात गतीने निर्णय दिला गेला. भारतातील ही पहिलीच केस होती. ज्यामध्ये इतक्या तातडीने निर्णय दिला गेला. या केसमध्ये, चाकणस्थित एका कंपनीमध्ये आरोपी सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होता. एक मुलगी तेथे नोकरीची मुलाखत द्यायला आली होती. सुरक्षा गेटजवळ तिने आपल्या प्रवेशाची नोंद करताना आपला मोबाइल नंबरसुद्धा लिहिला. सुरक्षारक्षकाने तो आपल्या वहीत लिहून ठेवला आणि नंतर त्या मुलीला तो फोन आणि

# सायबर पाठलागापासून सावधान

**ॲड. प्रशांत माळी**

**एकीकडे नवनवीन डिजिटल आणि इंटरनेट माध्यमातील तंत्रज्ञान वापरून नेटवर्किंग, व्यावसायिक कामकाज, मतप्रदर्शन यासारख्या अनेक गोष्टींचा स्त्रिया लाभ घेताना दिसत असल्या तरी, त्यांच्या या उत्साही सायबर सहभागामुळे त्या सायबर पीडित होण्याचे प्रमाण वाढले आहे.**

महिलांच्या बाबतीत सायबर स्टॉकिंग (महिलांना इंटरनेट माध्यमाद्वारे पाठलाग करून छळणे), हॅकिंग, ऑनलाइन बदनामी, प्रौढ छळवणूक, इलेक्ट्रॉनिक ब्लॅकमेलिंग, मॉर्फ्ड पोर्नोग्राफिक इमेजेस, रिवेंज पोर्न आणि इतर अनेक गुन्हे घडू लागले आहेत.

ऑक्सफर्ड डिक्शनरीनुसार, स्टॉकिंग म्हणजे द्रुतपणे पाठलाग करणे होय. सायबर स्टॉकिंग म्हणजे, विविध ऑनलाइन माध्यमातून एखाद्या स्त्रीचा तिच्या इच्छेविरूद्ध सतत पाठलाग करणे व त्याद्वारे तिचा मानसिक छळ करणे.

सायबर स्टॉकिंगचे वाढते प्रमाण आणि स्त्रियांचे ऑनलाइन शोषण हा भारतीय समाजात विकोपाला गेलेला सायबर गुन्हा आहे. एखाद्या महिलेच्या मनाविरूद्ध व्हॉट्सअ‍ॅपवर सतत तिच्या मैत्रीची मागणी करणे, भावनिक मेसेजला उत्तर दिले नाही तरी सतत, 'गुड मॉर्निंग', 'गुड नाइट'सारखे मेसेज, स्मायलीज पाठवणे,

व्हॉट्सअॅपवरून अश्लील संदेश पाठवू लागला. या गुन्ह्यांमध्ये मला तांत्रिकदृष्ट्या आणखी दोन गुन्ह्यांची जाणीव झाली, ती म्हणजे डेटा चोरी आणि गोपनीयतेचे उल्लंघन. मोबाइल नंबरच्या शेअरींगमुळे गोपनीयतेविषयी तडजोड भारतात वाढली आहे. पोलिसांनी या केसमध्ये गतीने नंबर ट्रेस करून त्या सुरक्षारक्षकाला ताब्यात घेतले. त्याने आपला गुन्हा कबूल केला. त्यामुळे जलदरीत्या या केसचा निकाल लागला. खरे तर त्या मुलीचा काही संबंध नसताना, ती त्या गुन्हेगाराची टार्गेट बनली आणि मानसिक छळाला बळी पडली. सायबर स्टॉकिंगमध्ये काही स्त्रियांच्या मानसिक स्थितीत बदल होतो तर काहींच्या कुटुंबात कलह निर्माण होतात. कालांतराने अशा सायबर स्टॉकिंगला बळी पडलेल्या स्त्रिया सोशल मीडिया, संगणक, मोबाइल याकडे शंकेच्या नजरेने पाहायला लागतात.

## ऑफिशियल प्रक्रिया

एखाद्या स्त्रीचे स्टॉकिंग करणे म्हणजे, तिचा प्रत्यक्षरीत्या पाठलाग करणे, तिला छळणे, या गोष्टीला भारतीय समाजात सहसा दृष्टीआड केले जाते. अशा गोष्टी रूढ व्हायला, आपली चित्रपटसृष्टी जबाबदार आहे. चित्रपटांतील काही गाण्यांचे चित्रीकरण आणि भाव उलगडला तर तो असाच होतो की, कुठल्याही रोड रोमिओने आपल्याला आवडलेल्या स्त्रीचा पाठलाग करावा आणि ती जोपर्यंत हो म्हणत नाही, तोपर्यंत तिचा पाठलाग करावा. प्रसंगी आपल्या मनातील भावना उघडपणे बोलून दाखवाव्यात, ही आपल्याला आवडलेल्या स्त्रीचे प्रेम संपादन करण्याची ‘ऑफिशियल’ प्रक्रिया आहे असेच सगळ्यांना वाटते. तसेच, ही प्रकिया पाळणे हे कुठेतरी पौरूषत्वाशी जोडली गेली आहे. म्हणूनच रोमिओ मंडळी अशा प्रकारे वागण्यासाठी प्रवृत्त होतात. आता ‘स्मार्टफोन’चा जमाना असल्यामुळे या रोमिओंना रस्त्यावर जाऊन प्रत्यक्ष पाठलाग करण्याची गरज भासत नाही. हातात स्मार्टफोन घेऊन ते स्त्रियांचा ऑनलाइन पाठलाग करतात. असा पाठलाग करताना ते अजिबात कसलीही भीड ठेवत नाहीत कारण रस्त्यावर पाठलाग करताना सजग नागरिकांची भीती असते. एकत्र येऊन नागरिक अशा रोड रोमिओंना धडा शिकवू शकतात. परंतु ऑनलाइनमध्ये त्यांना ही भीती नसते, सायबर स्टॉकिंगचे कृत्य करताना कुणी त्यांना रोखू करू शकत नाही. सायबर स्टॉकिंग करणाऱ्या व्यक्तीला खूप वेळा हे कळतच नाही की, आपण टार्गेट करत असलेल्या महिलेचा आपण मानसिक छळ करत आहोत. माझ्या इतक्या वर्षांच्या वकिली कारकिर्दीत मी असे अनेक खटले हाताळले आहेत, ज्यामध्ये असे लक्षात आले की, सायबर स्टॉकिंगद्वारे छळण्यात आलेल्या स्त्रियांचा मानसिक तोल ढासळून गेलेला असतो. इतकेच नव्हे तर, अशा स्त्रियांचा मोबाइल फोन आणि इंटरनेट संबंधीच्या विश्वासाला मोठा तडा गेलेला असतो, त्यामुळे मोबाइल फोन आणि सोशल मीडिया वापरण्याची त्यांच्या मनात भीती बनून राहते. काही केसेसमध्ये तर महिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेल्या असतात.

मला येथे असा सल्ला द्यावासा वाटतो की, जसा उत्तर प्रदेशात रोड रोमिओंच्या त्रासावर नियंत्रण आणण्यासाठी रोमिओ पथक तयार केले आहे. त्याचप्रकारे जर भारतातील प्रत्येक राज्यात पोलिसांनी ऑनलाइन रोमिओंविरुद्ध ऑनलाइन रोमिओ पथक निर्माण केले आणि तो ऑनलाइन पोलिसिंगचा भाग बनवला, तर अशा सायबर स्टॉकिंगच्या घटना घडण्यापूर्वीच पोलीस त्यांचा योग्य तो बंदोबस्त करू शकतील आणि हे असे करणे आवश्यक आहे. ही योजना जर यशस्वी झाली तर, सर्व महिला ऑनलाइन व्यवहार बिनधास्त करू शकतात.

**सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ**
**संपर्क: ०९८२१७६३१५७**



## ऑनलाइन नैतिकता

महिलांच्या ऑनलाइन सुरक्षेबाबत विचार करणे आणि त्यांचे रक्षण करणे हे भारतासारख्या देशाचे कर्तव्य आहे. जर आपल्या देशाला सायबर स्टॉकिंगच्या राक्षसाला मुळापासून उपटून टाकायचे असेल तर त्याची तयारी पाल्यांच्या बालपणापासूनच करणे गरजेचे आहे. मुलांच्या शालेय अभ्यासक्रमात आधुनिक विज्ञान, कम्युनिटी लिव्हिंग या विषयांमधून मुलांना ऑनलाइन नैतिकता म्हणजे काय, ती कशी जपावी तसेच, ऑनलाइन कम्युनिटीमध्ये इतर नेटीझनशी कसे वागावे याचे ज्ञान पाठ्यपुस्तकाद्वारे त्यांना देणे गरजेचे आहे. सायबर स्टॉकिंग आणि त्यातून होणारे मानसिक आजार किंवा आत्महत्या थांबवायच्या असतील तर, एका सजग सायबर सुरक्षित समाजाची रचना होण्याची नितांत गरज आहे. समाजाची सायबर सुरक्षिततेबद्दल सजगता तेव्हाच वाढेल जेव्हा सगळे मिळून सायबर संस्कृती निर्माण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील. सायबर स्टॉकिंग काय असते आणि त्या बद्दलची माहिती तुम्हाला या लेखाद्वारे समजली असेल तर, तो गुन्हा घडतो कसा, तो एखाद्या स्त्रीला कसा घातक ठरतो त्याबद्दल इतरांनादेखील सांगा. जास्तीत जास्त लोकांपर्यंत ही माहिती पोहचवून समाज जागृती करून सायबर सुरक्षित समाज निर्मिती करण्याच्या दृष्टीने पावले उचलणे अत्यावश्यक झाले आहे.

**सध्याच्या काळात महिला सर्वच क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावत आहेत. त्यांना योग्य संधी व प्रोत्साहन मिळाले तर त्या आत्मविश्वासाने पुढे जातात आणि यशस्वी होतात. महाराष्ट्रातील अशाच काही वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी महिलांचा परिचय..**

# उत्तुंग भरारी

## पान संस्कृतीला नवा आयाम

कोल्हापूर येथील राजाबाळ पान मंदिरचे राजेंद्र आणि विनायक घळसासी या बंधूंनी अनेक वर्षांपासून कोल्हापूरकरांना पानांच्या अस्सल चवींचा नजराणा दिला आहे. त्यांची मुलेही याच व्यवसायात आहेत. पण कविता व ज्ञानेश्वरी या दोघी सुनांनी 'रुची बँक्वेट' या नावाने ४ वर्षांपासून सुरू केलेला हा व्यवसाय ग्लोबल होऊ लागला आहे. कविता व ज्ञानेश्वरी घळसासी यांनी भारताच्याच नव्हे तर जगभरातील विविध प्रदेशांच्या खाद्यसंस्कृतीचा बारकाईने अभ्यास करून विड्यांमध्ये अत्यंत चपखलतेने त्याचा वापर केला आहे.

या दोघींनीही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक असणाऱ्या या पानाच्या विड्याला ग्लोबल रूप देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पारंपरिक, आरोग्यवर्धक स्वादिष्ट आणि भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग असणाऱ्या या पानाला ऑथेंटिकली मॉडर्न रूप देत राष्ट्रपती भवनापर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे स्वप्न आहे.

वाईन कल्चरसाठी प्रसिद्ध असणाऱ्या गोव्यात पान कल्चर निर्माण करण्याचे त्यांनी ठरवले. गोव्यात झालेल्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल (इफ्फी) मध्ये त्यांनी विविध प्रकारच्या जवळपास १०० वेगवेगळ्या स्वादांमधल्या पानांच्या विड्यांचा स्टॉल लावला. या पानाच्या विड्यांनी अख्या बॉलीवूडला भुरळ घातली. अस्सल कोल्हापुरी शब्दात सांगायचे तर कंप्लीट धुरळाच केला.



**पानाची लज्जत ग्लोबल करणाऱ्या कविता व ज्ञानेश्वरी घळसासी.**

### पानांच्या ४०० व्हरायटीज

हळदीकुंकवाच्या निमित्ताने गल्लीतच सुरुवातीला काही प्रमाणात त्यांना ऑर्डर्स मिळाल्या. महिला, लहान मुले यांनाही विड्याचा आस्वाद घेता यावा यासाठी सुपारी ऐवजी काजू, भाजके शेंगदाणे, खजूर, विविध प्रकारच्या मिठाई, चॉकलेट, कॉफी, सरबत, आईस्क्रीम, मूस, ज्यूस अशा अनेक प्रकारांमध्ये त्यांनी पान उपलब्ध करून देण्याचा सपाटाच सुरू केला. त्यांनी इन्होवेशन केलेले पान शॅट, शाही पान सरबत, पानटिनी, पान कबाब, पान मूस, खजूर मसाला, पान जामून, पान कप केक, पान रोल, डार्क चॉकलेट, ड्रायफ्रूटस पान, फालुदा, कॉफी मसाला, एक्सॉटिक चोको पान, बदाम थंडाई पान, लिंबू टिंबू पान, चटपटा दिलखुश पान, ग्रीन पल पान अशा अनेक व्हरायटींना ग्राहकांची प्रचंड मागणी आहे. चीझ मसाला, पिनट बटर, मायोनिझ मसाला, फ्राईड पान, अशा आज पानांच्या सुमारे ४०० व्हरायटीज त्या उपलब्ध करून देत आहेत. सुरुवातीला पान आणि पानाचा विडा होता. मसाले पानाचे एक खास वैशिष्ट्य आहे. तसेच वेगवेगळ्या ड्राय फ्रूटसचे प्रकार, ऋतूप्रमाणे होणारा फळांचा वापर, हजारो प्रकारची चॉकलेटस्, विविध प्रकारच्या चटण्यांच्या चवींनी नटलेली ही पाने म्हणजे पान चवीने खाणाऱ्यांसाठी पर्वणीच ठरते. पानांचे एकूण चारशे ते पाचशे प्रकार येथे मिळतात. येथे कमीत कमी किमतीपासून ते वीस, पन्नास, अगदी शंभर-दोनशे रुपयांपर्यंतची पाने मिळतात. काही पाने तयार करताना त्यात विशेष प्रकारची चटणी, सल्ली सुपारी, मीनाशी नॉवीन इत्यादी पदार्थ घातले जातात. चॉकलेट पानाचेच अडीचशेच्यावर प्रकार येथे तयार केले जातात. लग्नकार्यातही यांच्या पानांसाठी विशेष मागणी असते. पाच ते दहा हजार पानांची मागणीही त्या स्वीकारातात. देवीदेवतांनाही पानाचा नैवेद्य पुरवण्यासाठी त्यांनी अनेक प्राचीन ग्रंथांचा अभ्यास केला आहे. दख्खनचा राजा जोतिबासाठी बावन्नकशी महाविडाही त्या तयार करतात.





सुरुवातीला काही हजारात असणारा हा व्यवसाय आता लाखोंची उलाढाल करणारा झाला आहे.

त्यांचे www.ruchibanquets.com हे संकेतस्थळ आहे.

### देशभर फ्रँचायझी

रुची बॅन्क्वेट यांच्या पानाच्या फ्रँचायझी आपल्याला देशभर लवकरच पाहायला मिळतील. पान कोल्हापुरातच तयार होईल, मात्र ते संपूर्ण देशभरात खायला मिळेल अशी त्यांची योजना आहे.

### रीतभात

राजेंद्र घळसासी यांची पत्नी मानसी व सून जुई घळसासी यांनी रीतभात या बॅनरखाली पानांचा व्यवसाय सुरू केला आहे. राजाबाळ पान मंदिरास लागणारी पाने रीतभातच्या माध्यमातून पुरवली जातात.

रीतभातच्या माध्यमातून दररोज साधारणपणे १२०० ते १५०० पाने बनवली जातात. पान मोदक, पान कटलेट, पान चॉकलेट, पान ड्रिंक, पान लाडू गोविंद विडा, बावन्नखणी विडा, मेझेटो फ्लेवर, मस्तानी फ्लेवर, बाळंत विडा, आदींना चांगली मागणी असते. मुंबई, पुणे, लोणावळा, बेळगाव, गोवा या ठिकाणाहून ऑर्डर्स येतात.

**– वर्षा पाटोळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

## फायर वुमन

नागपूर येथील नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज हे भारतातले पहिले आणि जगातील दुसऱ्या क्रमांकाचे कॉलेज आहे. पूर्णतः मुलांचे असणाऱ्या या कॉलेजमध्ये नाशिक येथील हर्षिनी कान्हेकर या प्रवेश घेण्यास जाणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या.

हा अभ्यासक्रम मुलींसाठी नाही हा सल्ला त्यांना देण्यात आला. मात्र हा अभ्यासक्रम करायचे हे मनाशी पक्क करून आलेल्या हर्षिनी यांनी अनेक समस्यांवर मात करून प्रवेश अर्ज दाखल केला. नॅशनल फायर या अभ्यासक्रमासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते, ही परीक्षा फार अवघड असली तरी ध्येय गाठण्यासाठी हर्षिनी यांनी परीक्षा दिली. त्यानंतर काही दिवसांनी हर्षिनी यांना वडिलांकडून नॅशनल फायर कॉलेजमधून पत्र आल्याचे समजले. हे पात्र हर्षिनीच्या निवडीबाबत होते. प्रवेश घेतल्यावर पहिली समस्या आली ती म्हणजे या अभ्यासक्रमामध्ये असलेले ७ सत्र त्या ठिकाणी राहून पूर्ण करावे लागतात. मात्र मुलींसाठी तेथे वसतिगृह नव्हते, मुलींसाठी कॉलेजमध्ये कोणत्याच सुविधा नव्हत्या यासाठी हर्षिनी यांना दिवसभर अभ्यासक्रम पूर्ण करून घरी जाण्याची परवानगी मिळाली. कॉलेजसोबतच त्यांनी घराची जबाबदारीही काळजीपूर्वक पार पडली.



**आगीसोबत खेळणारे व्यक्तिमत्त्व हर्षिनी कान्हेकर**

कॉलेजच्या पहिल्या दिवशी हर्षिनी यांनी युनिफॉर्म घालून कॉलेजमध्ये प्रवेश केला. त्यांच्यावर चर्चा करणाऱ्यांचे तोंड बंद झाले.

नॅशनल फायर कॉलेजमधील पहिली स्त्री आणि पुरुषांची मक्तेदारी असणाऱ्या क्षेत्रात एक स्त्री असून मिळवलेले स्थान हे देशासाठी अभिमानाचे ठरले. हे शिक्षण सोपे नसून यात होज पाइप उचलणे, लॅडर खांद्यावर उचलून नेणे ही सगळी कामे फार कठीण होती ती त्यांनी जबाबदारीने पार पडली.

त्यांनी दिल्ली कोलकत्ता आणि मुंबईमध्ये आपली कामगिरी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि उत्तमरीत्या पार पाडली. दिल्ली येथील एका टीन फॅक्ट्रीमध्ये लागलेली आग नियंत्रित करण्यासाठी सहकाऱ्यांसोबत त्यांनी सलग सहा तास काम केले. तसेच त्यांनी पूरग्रस्त, वन्यजीव आक्रमण, मोठ्या इमारतींच्या अपघातात अडकलेले नागरिक यांचे प्राण वाचवले आहेत. आता हर्षिनी कान्हेकर या मुंबई येथे उपप्रबंधक अग्निशमन सेवा या पदावर कार्यरत आहेत. मुलांची मक्तेदारी असणाऱ्या क्षेत्रात हर्षिनी यांच्या प्रभावी कामगिरीमुळे, देशातील पहिली फायरवुमन म्हणून त्यांचे नाव प्रत्येक स्त्रीच्या मनात कोरले गेले आहे.

**– रिताली तपासे,** आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

## स्वयंसिद्धा

महाराष्ट्रातील स्त्री सक्षमीकरणाच्या चळवळीचा आढावा घेताना कोल्हापूरच्या स्वयंसिद्धा संस्थेचे नाव प्राधान्याने घ्यावे लागते. बँकेतील व्यवस्थापकपदाची नोकरी सोडून स्त्री सक्षमीकरणाच्या चळवळीला वाहून घेतलेल्या कांचन परुळेकर यांनी शेकडो महिलांना स्वयंसिद्ध बनवले. कांचनताईंनी आतापर्यंत 'स्वयंसिद्धा'च्या माध्यमातून ४५०० उद्योजिका घडवल्या आहेत. त्यांच्यामाध्यमातून इतर शेकडो महिलांना रोजगार मिळवून दिले आहेत. 'स्वयंप्रेरिका महिला सहकारी औद्योगिक संस्था' आणि 'व्ही. टी. पाटील फाऊंडेशन'च्या माध्यमातून त्यांनी स्वयंसिद्धा ही चळवळ उभी केली. या संस्थेमार्फत सुमारे ९००० शहरी, ३० हजार ग्रामीण स्त्रियांबरोबरच आणि १५० कार्यकर्त्यांची साखळी तयार केली आहे.



**स्वयंसिद्धा संस्थेच्या संस्थापक कांचन परूळेकर ग्रामीण महिलांसोबत.**

वस्तूंचे उत्पादन कुणालाही करता येते, परंतु त्या उत्पादनाला बाजारपेठ मिळणे गरजेचे असते. ही बाब लक्षात घेऊन कांचनताईंनी १९९४ मध्ये स्वयंप्रेरिका महिला सहकारी औद्योगिक संस्थेची स्थापना केली. त्याबरोबरच खेड्यातील लोकांना अर्थसाहाय्य करण्यासाठी 'व्ही.टी. पाटील फाऊंडेशन'ची स्थापना केली. स्त्रियांना उत्पादित मालाच्या विक्रीचा पारंपरिक दृष्टिकोन बदलण्यास भाग पाडले. त्यांच्यासमोर व्यवसाय म्हणजे काय, त्याचे पथ्य काय, उत्पादनाचा दर्जा, घरचे सांभाळून व्यवसायासाठी द्यावयाचा वेळ, सामाजिक बांधिलकी या गोष्टींबाबत त्या स्त्रियांचे प्रबोधन करतात. स्त्रियांना त्यांची आवड आणि गरजेनुसार वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू बनवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. येथील उत्पादनांच्या दर्जाची कल्पना असल्यामुळेच कसलीही जाहिरात न करता दिवाळीला २० लाख रुपयांहून अधिक रकमेची फराळाची विक्री होते. त्याव्यतिरिक्त वेळोवेळी भरणारी छोटी छोटी प्रदर्शने, दैनंदिन विक्री या माध्यमातूनही स्त्रियांना उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले आहे. 'स्वयंसिद्धा'मार्फत नाममात्र मूल्य घेऊन ३० प्रकारचे व्यवसाय प्रशिक्षणवर्ग चालवले जातात. संगणक हाताळणी, विविध हस्तकला, पर्स, पाककलेपर्यंतच्या अनेक व्यवसायांचा यात समावेश आहे. महाराष्ट्राबरोबरच गोवा आणि कर्नाटकातही बचतगट संकल्पना आणि उद्योजकीय प्रेरणा यांचे प्रशिक्षण ही संस्था देते.

– **अश्विनी पुजारी,** उपसंपादक

## वेगळ्या डॉक्टर



**डॉ. सुनिता कांबळे**

भारतातील पहिल्या, शेळ्यांच्या महिला डॉक्टर होण्याचा मान डॉ. सुनीता कांबळे यांनी पटकावला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी पट्ट्यातील सोलापूर जिल्ह्यातील महूद (ता. सांगोला) या गावच्या डॉ. सुनिता कांबळे हे नाव कुणालाही माहीत नव्हते. आठवीपर्यंत शिक्षण झालेल्या डॉ. सुनीता कांबळे या आपल्या पतीला बैलांचे दागिने (बैलपोळ्यादिवशी बैलाला सजवण्याचे दागिने) बनवण्याच्या व्यवसायात मदत करत होत्या. हा त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता. बैलपोळ्याला बैलाला गावातून मिरवणूक काढताना सजवण्यासाठी त्याच्या गळ्यात माळा, अंगावर झुली घातल्या जातात. त्या बनवण्याचे काम पतीसोबत सुनीता करत होत्या. आपल्या मूळच्या व्यवसायाचे काम करत असताना माणदेशी फाऊंडेशनच्या संपर्कात आल्या. या फाऊंडेशनकडून महिला सबलीकरणासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांपैकी एक असलेल्या 'शेळी सखी' या उपक्रमाच्या त्या भाग बनल्या.

या उपक्रमांतर्गत सुनीता यांना निंबकर ॲग्रिकल्चर रिसर्च इन्स्टिट्यूट 'नारी' (ता. फलटण) या संस्थेमधून २०१५ मध्ये व्यावसायिक शेळीपालन, लसीकरण, शेळ्यांना होणारे सर्वसाधारण आजार व कृत्रिम रेतनचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले. व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन त्या डॉक्टर झाल्यानंतरही घराच्या आणि आजूबाजूच्या लोकांना पटवून देण्यासाठी प्रशिक्षणानंतरचा एक वर्षाचा कालावधी जावा लागला. आमची शेळी दगावली तर तुम्ही भरून देणार का?' यासारख्या प्रश्नाचा भडिमार लोकांकडून केला जात होता.

याशिवाय घरातील ज्येष्ठ मंडळीदेखील 'एवढी शिकून पडल्याती त्यांना काम नाहीत, अन तुला कुठन काम मिळणार आहे.' 'चांगला हातातला धंदा सोडून पळत्याच्या मागे लागण्यात काय अर्थ हाय' असे ऐकवत होती. मात्र या सगळ्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. करत असलेल्या कामापासून त्या मागे हटल्या नाहीत. सासर आणि माहेर याव्यतिरिक्त इतर कुठल्याही गावांची फारशी ओळख त्यांना नसल्यामुळे सुरुवातीला आपल्या पतीला घेऊन त्या स्वत:च्या गावापासून अगदी ५० कि.मी.पर्यंत लोकांना शेळ्यांना देण्यात येणारे लसीकरण, कृत्रिम रेतन याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी जात.

लोकांना कृत्रिम रेतनाचे महत्त्व पटवून देत.

एक दिवशी शेजारच्या गावामध्ये लोकांना कृत्रिम रेतनाविषयी सांगत असताना येथे उपस्थित असलेल्या व्हेटर्नरी डॉक्टरांच्या समोर त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले. पुढे २१ दिवसांनी शेळीचा मालक असणाऱ्या शेतकऱ्याचा सुनीता यांना कृत्रिम रेतन यशस्वी झाल्याचा फोन आला. मग मात्र लोकांना विश्वास बसला. पूर्वी कामासाठीच येणारे लोक आता इतर बाबतीतही निर्णय विचारू लागले आहेत. कमी शिक्षण असताना, मारलेली मजल ही आजूबाजूच्या महिलांना प्रेरणा देणारी ठरत आहे.

पुढे त्यांच्या कामाचा व्याप वाढला तसे त्यांनी शेळी सखीच्या माध्यमातून १३ महिला शेळी-मेंढी डॉक्टरांची टीम तयार केली आहे. पंचक्रोशीतील कामाबरोबरच सुनीता आणि त्यांची टीम पंचक्रोशीशिवाय इतर ५० खेड्यांमध्ये काम करत आहे. सुनीता करत असलेल्या कृत्रिम रेतनातून उस्मानाबादी शेळ्यांची पैदास केली जाते.

इतरांच्या घरी जाऊन लोकांना मार्गदर्शन करता असताना त्यांनी स्वत:च्या घरीही बारा शेळ्यांचे फार्म उभारले आहे. चौकशीसाठी आलेल्या काही लोकांना त्या आपल्या घरीच प्रात्यक्षिकदेखील करून दाखवतात. २०१४ पासून सुरू झालेल्या या पशुवैद्यकीय व्यवसायात त्यांचा चांगलाच जम बसला आहे. कामाविषयी सुनीता सांगतात, 'इतर डॉक्टरांप्रमाणे मी शेळ्यांच्या औषधांची यादीही इंग्रजीतून देत नाही. तर ती मराठीतून लिहून देते. यादी बघताच मेडिकलमधील लोकांच्या देखील लक्षात येते, की ही कांबळे डॉक्टरने पाठवली आहे म्हणून!'

– **प्राजक्ता ढेकळे,**
लेखक, स्तंभलेखक/मुक्तपत्रकार

अस्मिता

# मिळून साऱ्या जणी

नांदेड जिल्ह्यातील आदिवासी किनवट तालुक्यात लोणी (झेंडीगुडा) गावाच्या प्रशासनात तलाठी, कृषी सहायक, वनरक्षक, स्वस्त धान्य दुकानदार, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामसेवक या पदावर महिलाच विराजमान आहेत. गावातील कारभार महिलांच्या हाती आला आहे. ही महिला सक्षमीकरणाकडे होणारी यशस्वी वाटचाल आहे. गावामध्ये मुख्याध्यापिका वर्षा कुलकर्णी यांनी शिक्षण हक्क कायद्याची जनजागृती केली. ग्रामस्थांच्या मदतीने शाळा डिजिटल केली. मराठी माध्यमाचे मुले इंग्रजीचे धडे गिरवत आहेत. संगणकावरून देशविदेशाची माहिती मिळवत आहेत. शाळेत नावीन्यपूर्ण उपक्रम उर्मिला प्रभणकर, शाहीन गुलाब बेग घेत असतात. महिलांच्या कार्याचा गौरव करत सह शिक्षिका अर्चना भंडारवार यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. असाध्य कर्करोगावर यशस्वी नियंत्रण मिळवून शिक्षिका अनुसया वाकोडे अध्यापनाचे कार्य करत आहेत.







**किनवट तालुक्यातील लोणी (झेंडीगुडा) गावच्या कारभारणी**

पारंपरिक शेती कसण्याचा पद्धतीला फाटा देत आधुनिक तंत्राची शेती करण्याचे प्रात्यक्षिक कृषी सहायक वर्षा पाटील यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिले. पारंपरिक पिकात बदल करून शेवगा, फळे, सेंद्रिय भाजीपाला लागवड करण्यासाठी शासनाच्या योजनांचा लाभ दिला. अंगणवाडी सेविका सुशिला मेश्राम, मदतनीस रेखा चव्हाण यांनी भिंतीवर मुलांना मनोरंजन करणारे प्राणी, वाघ, सिंह, माकड, ससा, फुले कमळ, गुलाब, यांचे चित्र रेखाटले आहेत. सहायक जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भारुड (आयएएस) व आमदार प्रदीप नाईक यांनी अंगणवाडीला प्रत्यक्ष भेट देऊन प्रोत्साहन दिले. याची आएसओसाठी निवड झाली आहे. माजी सरपंच कौशल्याबाई प्रचाके, तंटामुक्त सदस्य रुक्माबाई डुमनवाड, ग्रामसेविका सुनंदा कनकावार, तलाठी किरण जाधव यांनी ग्रामविकासाची भूमिका घेऊन पेय जल योजना, तंटामुक्त गाव अभियान, रमाई आवास योजना प्रभावीपणे राबवली आहे. शासनाचा तंटामुक्त ग्राम पुरस्कार गावाला मिळाला आहे. या पुरस्काराच्या बक्षिसातून तंटामुक्त भवन उभारण्यात आले आहे. तसेच प्रत्येक कुटुंबामध्ये शौचालये आहेत. कुटुंबाची जबाबदारी सांभाळून या महिला प्रशासन, राजकारण व समाजकारणात वेगळा ठसा उमटवत आहेत.

– **स्वप्नील भालेराव,** आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

## रेशीम दागिने

खामगांव तालुक्यातील सुटाळा खुर्द येथील कलादालन महिला बचतगटाने रेशामवर आधारित ज्वेलरी निर्माण केली आहे. तसेच विलिंग पेपरवरील कलाकुसरही वाखाणण्यासारखी आहे.

रेशीम धाग्यांच्या गाठी आणून बचतगटातील महिला त्यापासून कानातील दागिने, नाकातील नथणी, बांगड्या, हार, साडी पिन, तोरड्या आदी ज्वेलरी बनवतात. रेशीम व अन्य ज्वेलरीचे साहित्य जळगाव, मुंबई व अकोला येथून आणतात. त्यापासून प्रत्येक स्त्रीला आकर्षित करून घेण्याची क्षमता असलेल्या दागिन्यांची निर्मिती करण्यात येते. अशा या अनोख्या ज्वेलरीमुळे खामगाव परिसरातील महिला, बचतगटाच्या दागिन्यांची आतुरतेने वाट बघत असतात. बचतगटाच्या अध्यक्षा सविता किशोर देशमुख यांनी बचतगटाच्या माध्यमातून या नवीन व्यवसायाची मुहूर्तमेढ यशस्वीरीत्या रोवली.

सुटाळा खुर्द येथील महिलांना एकत्रित करत आपल्या कला–गुणांच्या उपयोगातून नवीन उत्पादने करण्याचा निर्णय घेतला. त्यांना सचिव वैशाली देशमुख यांची साथ लाभली. तसेच भाग्यश्री भूषण इगवे, रूपाली शालीग्राम टेकाडे, संगीता राजपूत, मेघा दूधे या महिला सदस्यांनी आपल्या कला–गुणांचे सादरीकरण करीत अनोखी रेशीम ज्वेलरी आकारास आणली आहे. एवढ्यावरच हा बचत गट थांबला नाही, तर विलींग पेपर, प्लायवूडद्वारे लग्नसमारंभासाठी लागणाऱ्या विविध वस्तू बनवण्यात हा गट अग्रेसर राहिला आहे.



**सुटाळा खुर्द येथील महिला बचतगटाचे रेशमाचे दागिने.**

### लग्नसमारंभाचे साहित्य

वऱ्हाडामध्ये लग्नात मुलींसोबत रुखवत देण्याची प्रथा आहे. या रुखवतामध्ये घर सुशोभित करणाऱ्या वस्तू असतात. या वस्तू कलांगण महिला बचत गट उत्कृष्टरीत्या बनवतो. त्यामध्ये वर–वधूचे ताट, चौरंग, दरवाजाचे तोरणे, लोकरीच्या पर्स, आकर्षित करणारी बैलजोडी, घरात दर्शनी भागात ठेवण्याच्या वस्तू, लाईटच्या व्यवस्थेसह असलेले दिवे, वर–वधूंचे शृंगार साहित्य आदींचा समावेश आहे. सध्या बनवलेल्या वस्तूंपेक्षाही जास्त मागणी या बचत गटाकडे आहे. केवळ खामगांव व परिसरापुरतेच कलांगण महिला बचतगटाच्या वस्तू मर्यादित नाहीत, तर इतरही जिल्ह्यात वस्तू विक्रीस जात आहेत.

– **निलेश तायडे,** माहिती सहायक, बुलडाणा

## 'ती' आणि 'तो' सुद्धा...

स्त्री प्रश्नावर निर्भीडपणे लिहिणारी पहिली तृतीय पंथीय स्तंभलेखिका, वेळोवेळी कवितेतून शब्दबद्ध करणारी पहिली तृतीयपंथीय कवियत्री, माणूसपणाची व्याख्या मांडणारी, शासनानं मला 'स्त्री असल्याचे ओळखपत्र दिल आहे, मी स्त्री आहे हे ठामपणे सांगणारी दिशा पिंकी शेख. पुरुषाच्या जन्माला येऊन स्त्रीत्वाच्या दिशेकडे झालेला संघर्षमय प्रेरक प्रवास.

नाशिक जिल्ह्यातील येवला हे छोटेस गाव. इतर मुलांप्रमाणेच हाही घरातील मोठा दादा. अरे–कारे करणारा. सातवी–आठवीपर्यंत सगळे ठीक होते. पण नंतर मित्रच आवडायला लागले. 'मला काहीतरी वेगळे जाणवतेय' हे घरच्यांना सांगायचे धाडस मात्र झाले नाही. मित्रांकडून कुचेष्टा आणि अरे मुलासारखा वाग ना, अशा सरांकडून कानपिचक्या यामुळे त्याने शाळा सोडली. मग सुरू झाला आत्मसंघर्ष 'स्व'ला शोधण्याचा. स्वतःसारखी समाजातील इतर माणसे त्याने शोधली. 'हिजडा कम्युनिटी'त दाखल झाला. बरोबरीला पुस्तके होतीच.



**दिशा पिंकी शेख**

बाहेरून दहावीची परीक्षा दिली.

दिशा म्हणते,'मला माझीच घृणा येत होती, कारण मी स्त्रीसारखी आहे. यातूनच मला स्त्रीचे प्रश्न व स्त्री जवळची वाटली. स्त्रियांचे प्रश्न लोकांना समजले तर आमचे प्रश्न लोकांना समजतील हे मला उमगले म्हणूनच मी स्त्री प्रश्नावर काम करायला सुरुवात केली व 'स्त्री' माझ्या लेखनाची केंद्रबिंदू बनली. पुस्तकांमुळे मी घडले. म्हणूनच मी आज परंपरागत चौकाचौकात, सिग्नलला, बस, ट्रेनमध्ये वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठी भिकेची टाळी वाजवणे बंद केले. आज मी 'बुक स्टॉल' चालवते.'

तृतीयपंथीयांनी सार्वजनिक ठिकाणी मिसळण्याचा प्रयत्न जरी केला तरी स्त्री व पुरुष दोघांनाही गैरसोयीचे वाटते. त्यांचा स्वीकार करून त्यांना प्रेम व कुटुंबाचा घटक बनवून समान दर्जा दिला तर तेही मुख्य प्रवाहात येतील, असा तिला विश्वास आहे. तिच्या जिद्दीला, कर्तृत्त्वाला सलाम करत तिला विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

– **वृषाली बर्गे,** आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# सुरक्षा आणि सक्षमीकरण

**महिलांचा विकास, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी केंद्र शासनाच्या विविध योजना राबवण्यात येत आहेत. यामुळे महिलांच्या सक्षमीकरणास मदत होत आहे.**

## प्रधानमंत्री महिला शक्ती केंद्र

देशातील अतिशय मागास अशा ११५ जिल्ह्यांकरिता प्रधानमंत्री महिला शक्ती केंद्र (पीएमएमएसके) या नव्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. या केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली जाईल. या सगळ्या प्रक्रियेत स्थानिक महाविद्यालयातील जवळपास ३ लाख विद्यार्थ्यांची परिवर्तन स्वयंसेवक म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. एनएसएस, एनसीसीच्या विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेतले जाईल. या स्वयंसेवकांच्या कामाचे मूल्यांकन डिजिटली होऊन त्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

## 'बेटी बचाओ...' चा देशव्यापी विस्तार

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' चा विस्तार करून देशातील सर्व जिल्ह्यात ही योजना नेण्यात येईल. मुलींच्या जन्मदराबाबत पिछाडीवर असलेल्या जिल्ह्यांतून त्याची सुरुवात होईल.

## 'वन स्टॉप सेंटर'

अत्याचारपीडित महिलांसाठी १५० पेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये 'वन स्टॉप सेंटर' (ओएससी) सुरू करण्यात येणार आहेत. एक खिडकी सेवा या संकल्पनेत तयार होणाऱ्या या सेंटरकडून महिलांना वैद्यकीय मदत, पोलिसांचे साहाय्य, कायदेशीर मदत, समुपदेशन आणि सोबतच तात्पुरता निवाऱ्याची सोय होईल.

## महिला पोलीस स्वयंसेवक

विविध राज्यातील ६५ जिल्ह्यांमध्ये महिला पोलीस स्वयंसेवकांना समाजाशी जोडले जाईल. यातून सामान्य जनता आणि पोलिसांमधील समन्वय निर्माण करून सुसंवाद वाढवण्यावर भर दिला जाईल.

## महिलांसाठी वसतिगृहे

शहरातील नोकरदार महिलांच्या समस्या लक्षात घेऊन १९० वसतिगृहे बांधणार. १९ हजार महिलांच्या निवासाची व्यवस्था यातून होणार आहे.

## स्वाधारगृहे

नव्या २०८ स्वाधारगृहांना मान्यता देण्यात आली आहे. अत्याचार पीडितांनाही यात सामावून घेतले जाणार आहे. २६,००० व्यक्तिंना याचा लाभ मिळेल. या माध्यमातून मदत आणि पुनवर्सन याकडे लक्ष दिले जाणार आहे.

## राष्ट्रीय आहार मिशन

अर्भकांमधील कुपोषण आणि खुरटणाऱ्या वाढीचे प्रमाण ३८.४ टक्क्यांवरून २०२२ पर्यंत थेट २५ टक्क्यांपर्यंत कमी आणण्याचे उद्दिष्ट असणारी राष्ट्रीय आहार मिशन योजना आखण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यांत १६२ मागास जिल्ह्यांमधील ४२ लाख बालकांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी या योजनेत तब्बल ९,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे, अर्भक, गर्भवती महिला आणि युवती यांच्यामधील रक्तक्षयाचे (अनिमिया) प्रमाण तीन टक्के करण्याचेही या योजनेचे उद्दिष्ट आहे.

## मुद्रा


२०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये १ लाख ८० हजार कोटी रुपयांचे कर्ज वाटप. त्यापैकी ७० टक्के कर्जवाटप महिलांसाठी. म्हणजे सुमारे सव्वा लाख कोटी रुपयांचे कर्जवाटप महिलांना करण्यात आले आहे. त्यातही इतर मागासवर्गीय, आदिवासी, दलित व मुस्लीम महिलांचे प्रमाण लक्षणीय असून त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मोठा हातभार लागत आहे.

## प्रधानमंत्री उज्ज्वला योजना

गेल्या दीड वर्षांमध्ये ३ कोटी २० लाख गॅस सिलिंडरचे गरीब महिलांना मोफत वितरण करण्यात आले आहे. ही योजना गोरगरीब महिलांच्या आरोग्याचे कवचकुंडल बनली आहे. (साभार : 'साद' जानेवारी २०१८ (राज्य महिला आयोगाचे मुखपत्र))

## महिलांसाठी हेल्पलाइन

देशातील राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशात २४ तास कार्यरत असलेली १८१ क्रमांकाची हेल्पलाइन अडचणीतल्या महिलेला उपयोगी ठरते आहे. सार्वजनिक ठिकाणी तसेच




कौटुंबिक हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांसाठी २४ तास कार्यरत अशी ही हेल्पलाइन आपत्कालीन वेळेत उपयोगी ठरेल.



माटुंगा रेल्वे स्थानकाच्या स्टेशन मास्तर ममता कुलकर्णी

**मुंबईतील माटुंगा उपनगरी रेल्वे स्थानकावरील सर्व कारभार महिला अधिकारी आणि कर्मचारी चालवतात. सगळ्या महिला कर्मचारी चालवत असलेले हे भारतातील पहिलेच स्थानक ठरले आहे. या विक्रमासाठी माटुंगा स्थानकाची 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्येही नोंद झाली आहे.**

# माटुंग्यात 'ती'चे राज्य...

**राधिका अघोर**

उपनगरी रेल्वेसेवा म्हणजे मुंबई शहराची जीवनवाहिनी... लाखो प्रवाशांना दररोज त्यांच्या मुक्कामी पोहोचवणारी ही अवाढव्य व्यवस्था वर्षानुवर्षे अत्यंत सुरळीतपणे अव्याहत सेवा देते आहे. या मध्य रेल्वे उपनगरी मार्गावरचे एक चिमुकले स्थानक, माटुंगा... इथे २० वर्षांपासून सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या अर्चना माने म्हणतात, गेली कित्येक वर्षे मी इथे काम करते आहे, माझ्या कामात काही बदल झालेला नाही, मात्र गेल्या सात महिन्यांपासून आमच्या कामाची सगळे जण दखल घेत आहेत. देशभरात आमचे, आमच्या स्टेशनच नाव झाले, लोक आमचे फोटो काढतात, शुभेच्छा देतात, तेव्हा खूप छान वाटते. आपल्या कामाची पावती मिळाली, की इतक्या वर्षांच्या कष्टाचे चीज झाल्यासारखं वाटते! अर्चनाताई अगदी खुशीत येऊन भरभरून बोलत होत्या. सात महिन्यात जगभर नाव होण्यासारखा काय विक्रम या स्थानकात घडला आहे? तर तो विक्रम म्हणजे, या स्थानकावर एकवटलेली स्त्री शक्ती. या स्थानकावरच्या सगळ्या अधिकारी आणि कर्मचारी महिला आहेत. सगळ्या महिला कर्मचारी चालवत असलेले हे भारतातील पहिलेच स्थानक ठरलेय! या विक्रमासाठी माटुंगा स्थानकाची 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्येही नोंद झाली आहे. या नोंदीमुळे सध्या प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या या स्थानकाची कहाणी आम्ही या कर्मचाऱ्यांकडूनच जाणून घेतली.

## पहिली महिला स्थानक व्यवस्थापक

१९९२ साली मध्य रेल्वेच्या पहिल्या महिला सहायक स्थानक व्यवस्थापक म्हणून नियुक्त होण्याचा मान मिळवणाऱ्या ममता कुलकर्णी यांची या स्थानकाच्या स्टेशन मास्तर म्हणून नियुक्ती झाली आहे, गेल्या २० वर्षांच्या नोकरीचा अनुभव असलेल्या या समर्थ हातात माटुंगा स्थानकाची जबाबदारी देण्यात आली आहे. स्थानकात संपूर्ण महिला कर्मचारी नियुक्त करण्याची मूळ कल्पना मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक डी. के. शर्मा यांची! त्यांच्याच पुढाकाराने या स्थानकावर सर्व पदांवर महिलांची नियुक्ती झाली, असे कुलकर्णी यांनी सांगितले. महिलांनी सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने नव्हे तर, त्यांच्याशिवाय स्वतंत्रपणे निर्णय घ्यावेत आणि स्वतः त्याची अंमलबजावणीही करावी, या उद्देशाने संपूर्ण महिला चमूची संकल्पना साकार करण्यात आली, असे ममता कुलकर्णी यांनी सांगितले. जून २०१७ पासून ४१ रणरागिणींची ही टीम समर्थपणे या स्थानकाचा कारभार चालवते आहे. कुलकर्णी यांनी आपल्या नोकरीत १९९२चे दंगे, पूर, संप अशा कठीण काळातही काम केले आहे. त्या अनुभवाचा फायदा त्यांना येथे काम करताना मिळतो. २९-३० ऑगस्ट २०१७ला आलेल्या पावसामुळे वाहतूक खोळंबली होती, प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. अशा वेळी माटुंगा स्टेशनाच्या या महिला चमूने अहोरात्र काम केले. त्या प्रसंगाने सगळ्यांचा आत्मविश्वास वाढला, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

## सर्व पदांवर महिला

या स्थानकातल्या विविध विभागात, महिला काम करतात. बुकिंग क्लार्क म्हणून १५ जणी, आठ तिकीट तपासनीस, सहाजणी रेल्वे सुरक्षा दलाच्या कर्मचारी, दोन निवेदिका, पाच पॉइंट पर्सन्स, दोन सफाई कर्मचारी, अशा सगळ्या पदांवरच्या जबाबदाऱ्या महिलाच सांभाळतात. येथील तिकीट तपासणीसाठी आठ महिलांचा चमू आहे. वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या अनुभवी तिकीट तपासनीसांना एकत्र आणून ही टीम तयार केली आहे. मुख्य तपासनीस अस्मिता मांजरेकर यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या या चमूचा माटुंगा स्थानकावर

काम करण्याचा अनुभव खूप चांगला आहे. आम्हाला स्त्री म्हणून कधीही काही त्रास झाला नाही, प्रवासी सहकार्य करतात, दंडही भरतात, असे तपासनीस संगीता धोंड यांनी सांगितले. जेव्हापासून माटुंगा स्थानकाचे नाव लिम्का बुकमध्ये नोंदले गेले, तेव्हापासून अनेक प्रवासी, अगदी युवकांपासून ते वयोवृद्ध प्रवाशांपर्यंत सगळे जण आवर्जून भेटून आमचे अभिनंदन करतात. पुष्पगुच्छ देतात तेव्हा खूप आनंद होतो, आणखी चांगलं काम करण्याचा हुरूप वाढतो, असे तपासनीस जयश्री माने आणि राधिका निगुडकर यांनी सांगितले.

रंजना गोरे येथे निवेदिका म्हणून काम करतात. त्यांच्यासोबत त्यांच्या आणखी एक सहकारी आहेत. आम्ही दोघी एकमेकींच्या वेळा सांभाळतो. त्यामुळे कामात अडचण येत नाही, असे त्यांनी सांगितले. माटुंगा स्थानकात सगळ्या पदांवर महिलांची नियुक्ती करण्याचा निर्णय झाला. त्यानंतर इतर अनेक जणींसोबत गोरे यांची नियुक्ती झाली. माटुंगा तसे छोटे स्थानक असल्याने कामाचा ताण जाणवत नाही, म्हणजे, हे स्थानक अतिशय स्वच्छ आहे. कुठेही कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी बघायला मिळाली नाही. स्थानकाच्या स्वच्छतेकडे स्टेशन मास्तर ममता कुलकर्णी जातीने लक्ष देतात आणि दोन सफाई कर्मचारी मनापासून हे स्थानक स्वच्छ करण्याचे काम करतात.

या सगळ्या नोकरदार महिलांना आपापल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या देखील आहेत. जेव्हापासून माटुंगा रेल्वे स्थानकाला महिला स्थानक म्हणून प्रसिद्धी मिळाली, नाव मिळाले, तेव्हापासून कुटुंबातही कौतुक होऊ लागले. मुलांना आपल्या आयांचा अभिमान वाटायला लागला, याचा विशेष आनंद या सगळ्या जणींनी व्यक्त केला. सगळ्या सहकारी




**माटुंगा रेल्वे स्थानक चालवणारी महिला शक्ती.**

असेही त्यांनी सांगितले.

या स्थानकात पॉइंट पर्सन म्हणून पाच महिला काम करतात. या स्थानकात होणाऱ्या मानवी अपघातांच्या वेळी या महिलांना मदतीला जावे लागते. एकट्याने हे काम करण्याचा अनुभव त्यांच्यासाठी नवा होता. अनेकदा भीषण अपघातानंतर मृतदेह किंवा जखमींची योग्य व्यवस्था करावी लागते. सुरुवातीला हे काम करताना थोडे दडपण यायचे, पण आपल्यालाच ते करायचे आहे, हे समजून मन पक्के केले, आता पूर्वीइतका त्रास होत नाही, असे कीर्ती कठाळे यांनी सांगितले. अशी कामे स्त्रिया करू शकत नाहीत, ही समाजातील धारणा या पंचकन्यांनी खोटी ठरवली. काही आव्हानात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्यावर मन अधिकच भक्कम बनते. कठीण प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी, त्यातून मार्ग काढण्यासाठी तयार होते, असेही कीर्तीने सांगितले.

### स्थानकावरील स्वच्छता

या स्थानकावरची आवर्जून लक्षात येणारी आणखी एक गोष्ट

महिला असण्याचा आणखी एक फायदा म्हणजे, या सगळ्या जणी एकमेकींच्या कौटुंबिक अडचणी, आरोग्यविषयक प्रश्न समजून घेऊ शकतात. मग रजा हवी असेल किंवा काही समस्या असेल तर सांगायला संकोच वाटत नाही. एकमेकींना सांभाळून घेतले जाते.

### प्रधानमंत्र्यांकडून कौतुक

माटुंग्याला सर्व स्त्री कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतल्यावर, वेगवेगळ्या स्थानकांवरच्या या अनुभवी महिला कर्मचारी येथे एकत्र आल्या. या शक्तीची, पर्यायाने त्यांच्या कामाची दखल घेतली गेली. या सगळ्यांचा आत्मविश्वास वाढला. त्याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या कामावर झाला. थेट प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मधून आमचे कौतुक केले. त्या दिवशी आम्हाला खूप समाधान, आनंद मिळाला अशी भावना या सगळ्यांनी व्यक्त केली.



# सावध व्हा, अन्यथा..

**भारतीय राज्यघटनेच्या १४ आणि १५ कलमानुसार, समानतेचा मूलभूत अधिकार आणि कलम २१ नुसार प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळालेला आहे. कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळामुळे या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होते. ते रोखण्यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळांविरुद्ध महिलांना संरक्षण देण्यासाठी, प्रतिबंध करण्यासाठी आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी हा कायदा करण्यात आला. कोणत्याही वयाच्या स्त्रीसाठी हा कायदा लागू होतो. लैंगिक छळामध्ये अनेक बाबींचा समावेश होतो. शिवाय लैंगिक छळ फक्त कार्यालयातच होऊ शकतो असे देखील नाही. लैंगिक छळ आणि कामाचे ठिकाण म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. हा कायदा फक्त स्त्रियांसाठीच आहे.**

लैंगिक छळामध्ये स्त्रीच्या इच्छेविरुद्ध किंवा अप्रत्यक्ष केल्या जाणाऱ्या कोणत्याही लैंगिक स्वरूपाच्या कृतींचा समावेश होतो. शारीरिक, तोंडी किंवा हावभाव किंवा इतर माध्यमातून स्त्रीच्या इच्छेविरुद्ध केलेली लैंगिक कृती किंवा वर्तन याला लैंगिक छळ म्हटले जाते. स्त्रियांना दुय्यम मानून त्यांचा अपमान करणे हादेखील लैंगिक छळ आहे. महिलेच्या इच्छेविरुद्ध केलेली पुढील कोणतीही कृती लैंगिक छळामध्ये धरली जाते.

शरीरसंबंधाची मागणी करणे किंवा तशी इच्छा ठेवणे, असुरक्षित स्पर्श करणे, कुरवाळणे, पाठ थोपटणे, चिमटे घेणे, हात लावणे हा लैंगिक छळ आहे. एखाद्या महिलेच्या इच्छेविरुद्ध तिच्या खासगीपणाचे उल्लंघन करणारी कोणतीही शारीरिक जवळीक साधणारी कृती ही लैंगिक छळामध्ये धरली जाईल.

लैंगिक अर्थाचे शब्द स्त्रीला उद्देशून वापरणे जसे, आयटम, चिकणी इत्यादी शिवाय पेहराव, लैंगिक अवयक, लिंग या संदर्भाने लैंगिक वाक्ये उच्चारणेदेखील लैंगिक छळ मानला जाईल. एखाद्या स्त्रीला पाहून गाणे गाणे, लैंगिक आवाज काढणे, शिटी वाजवणे किंवा शिव्या उच्चारणे, अश्लील किंवा स्त्री सन्मानाला धक्का पोहचेल असे विनोद, मेसेज करणे किंवा प्रत्यक्ष सांगणे हा लैंगिक छळ आहे. वैयक्तिक आयुष्यातील घटना किंवा खासगी बाबी सर्वांसमोर उघडपणे बोलणे, स्वत:च्या किंवा पत्नीच्या व्यक्तिगत लैंगिक आयुष्याबद्दल चर्चा करणे, लैंगिक गोष्टींचा उल्लेख करून पत्र, ई मेल किंवा फोन करणे, द्व्यर्थी शब्द उच्चारणे इ. सर्व लैंगिक छळामध्ये गृहीत धरले जाते. अश्लील फिल्म, पुस्तके, फोटो दाखवणे किंवा त्याची मागणी करणे हादेखील लैंगिक छळ आहे.

### कामाचे ठिकाण म्हणजे काय?

■ शासकीय, निमशासकीय आणि शासन पुरस्कृत इ. किंवा स्थानिक प्रशासन, सार्वजनिक कंपनी, महामंडळ किंवा सहकारी संस्था संचलित कोणतीही संस्था, उद्योग कार्यालय किंवा शाखा. ■ खासगी क्षेत्रातील संस्था किंवा कंपनीने संचलित केलेली संस्था, उद्योग, सोसायटी, विश्वस्त संस्था, स्वयंसेवी संस्था इ. तसेच व्यापारी, व्यावसायिक किंवा कौशल्य प्रशिक्षण केंद्र. शैक्षणिक संकुल आणि मनोरंजनाची ठिकाणे. उद्योग आरोग्य किंवा वित्त इत्यादी क्षेत्रात पुरवठा, विक्री, वितरण किंवा अन्य सेवा देणाऱ्या संस्था. ■ रुग्णालये किंवा शुश्रूषागृह. ■ खेळांशी संबधित संस्था, स्टेडियम, वास्तू, स्पर्धेची ठिकाणे मग ती निवासी असो किंवा अनिवासी, खेळ किंवा तत्सम कामासाठी वापरली जाणारी ठिकाणे. ■ कर्मचारी कामासंदर्भात भेट देत असलेली ठिकाणे किंवा नियोक्त्याने पुरवलेली वाहतुकीची साधने ■ नियोक्त्याने निवासाचे ठिकाण अथवा घर ■ असंघटित क्षेत्र– कामाच्या संबंधातील घर ज्याची मालकी एखाद्या व्यक्तीकडे असेल, कोणत्याही प्रकारच्या सेवा पुरवणारी व्यक्ती किंवा स्वयंरोजगार करणारे कामगार आणि घरकामगार यांचे त्यांच्या कामानुसार बदलणारी ठिकाणेदेखील यामध्ये समाविष्ट आहेत.

## अंतर्गत तक्रार निवारण समिती

प्रत्येक आस्थापना प्रमुखाने अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करणे अनिवार्य आहे. अशी तक्रार निवारण समिती प्रत्येक शाखेमध्ये करणे गरजेचे आहे. समितीची स्थापना करण्यासाठी पुढील बाबी आवश्यक आहेत. ■ समितीच्या अध्यक्षपदी त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून वरिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या महिलेची नेमणूक करावी, वरिष्ठ महिला उपलब्ध नसेल तर त्याचा मालक/नियोक्त्याच्या अन्य शाखा किंवा कंपनीतील वरिष्ठ महिलेची अध्यक्षपदी नेमणूक करावी. मालक किंवा आस्थापना प्रमुख या समितीचा अध्यक्ष असता कामा नये. ■ कर्मचाऱ्यांमधून कमीत कमी दोन सदस्य असे नेमण्यात यावेत ज्यांची महिलांच्या प्रश्नांशी बांधिलकी असते व ज्यांना समाजकार्याचा अनुभव असेल किंवा कायद्याची माहिती असेल. ■ स्वयंसेवी संस्था किंवा संघटनांमधून एक सदस्य घेणे आवश्यक आहे. त्या सदस्याची महिलांच्या प्रश्नांशी बांधिलकी असेल तसेच लैंगिक छळाच्या मुद्द्याबाबत जाण असेल. शिवाय स्वयंसेवी संस्थेमधून घेण्यात आलेल्या सदस्याला मालक/नियोक्त्याकडून ठरावीक शुल्क किंवा भत्ता देता येऊ शकतो. ■ समितीमध्ये किमान ५० टक्के सदस्य महिला असल्या पाहिजेत, अध्यक्ष व समितीचे अन्य सदस्य त्यांची नेमणूक झाल्यापासून जास्तीत जास्त ३ वर्षे त्या समितीवर काम करतील. ■ अध्यक्ष किंवा एखाद्या सदस्यावर गुन्हेगारी स्वरूपाची किंवा शिस्तभंगाची कारवाई सुरू असेल तर अशा सदस्याला समितीवरून काढण्यात येईल व रिक्त जागा नियमाप्रमाणे भरण्यात येईल.

## स्थानिक तक्रार निवारण समिती

प्रत्येक जिल्ह्यात कायद्यांतर्गत नेमणूक झालेल्या जिल्हा अधिकाऱ्याने स्थानिक तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना लैंगिक छळाच्या तक्रारी नोंदवण्यासाठी स्थानिक तक्रार निवारण समिती उपलब्ध असते. शिवाय संघटित क्षेत्रातील मालकाच्या/नियोक्त्याच्या विरोधात तक्रार करायची असेल अशा तक्रारी स्थानिक तक्रार निवारण समितीकडे नोंदवता येऊ शकतात. अंतर्गत तक्रार समितीची स्थापना झालेली नसेल किंवा कामकाज कायदेशीर तरतुदीप्रमाणे होत नसेल तर अशा तक्रारीदेखील जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंदवता येतात. शिवाय नेमून दिलेल्या जिल्हा अधिकाऱ्याची प्रत्येक जिल्ह्यात अंतर्गत आणि स्थानिक तक्रार निवारण समिती यांच्या कामकाजांची देखरेख करणे, त्यांचे वार्षिक अहवाल स्वीकारणे आणि त्याच्या कामकाजाचे मूल्यमापन करणे ही प्रमुख जबाबदारी असते.

## समितीची स्थापना

■ सामाजिक क्षेत्रात काम करणारी प्रख्यात महिला अध्यक्ष म्हणून नेमण्यात येईल. ■ संबंधित जिल्ह्यातील तालुका, प्रभाग, नगर परिषद या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या महिलांना सदस्य नेमण्यात येईल. ■ समाज कल्याण अधिकारी किंवा जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी यांची सदस्य सचिव म्हणून नेमणूक करण्यात येईल. ■ कायद्याचे तज्ज्ञ असणारी एक व्यक्ती नेमण्यात येईल. ■ तसेच निमसरकारी संघटनेतील एक व्यक्ती नेमण्यात येईल. ■ समितीचा कार्यकाल तीन वर्षांचा असेल. तीन वर्षानंतर नवीन सदस्यांची नेमणूक केली जाईल. ■ समितीतील कोणताही सदस्य तक्रारदार महिलेची, साक्षीदाराची, आरोपीची किंवा केससंदर्भात कोणताही माहिती प्रकाशित, प्रसारित किंवा सार्वजनिकरीत्या उघड करेल त्यास समितीकडून काढले जाईल. ■ समितीमधील सदस्यास एखाद्या अपराधासाठी शिक्षा झाली असेल किंवा शिस्तभंग कारवाईत ती व्यक्ती दोषी असेल किंवा पदाचा गैरवापर केला असेल तर अशा सदस्यास समितीतून काढले जाईल. ■ समितीमधील सदस्यांना कामकाज चालण्यासाठी निर्देशित केलेले शुल्क किंवा भत्ता दिला जाईल. ■ कायद्यांतर्गत नेमणूक झालेल्या जिल्हा अधिकाऱ्याकडे किंवा समाज कल्याण अधिकारी किंवा महिला आणि बाल विकास अधिकारी यांच्याकडे थेट तक्रार देता येऊ शकते.

## कायद्यातील व्याप्ती आणि कार्य

■ पीडित/तक्रारदार महिला कामाच्या ठिकाणी संपर्कात येणारी कोणत्याही प्रकारची स्त्री तक्रार दाखल करू शकते. ■ घर कामगार घरकाम करण्यासाठी थेट किंवा एखाद्या संस्थेमार्फत तात्पुरत्या/कायमस्वरूपी, अर्धवेळ पूर्णवेळासाठी नेमलेली स्त्री घरकामगार समजली जाईल. मात्र ती स्त्री घरमालकाच्या कुटुंबाची सदस्य असता कामा नये. ■ कर्मचारी–नियमित, तात्पुरती, रोजंदारीने किंवा कंत्राटी पद्धतीने नेमणूक केलेली व्यक्ती कर्मचारी या व्याख्येत बसते. कामाच्या ठिकाणी प्रशिक्षणासाठी किंवा ऑडिटसाठी येणारी व्यक्ती देखील कर्मचारी मानली जाईल. मुख्य मालकाला माहीत नसताना एखाद्या कंत्राटदाराने कामासाठी नेमलेली व्यक्ती कर्मचारी धरली जाईल. पगारी, बिनपगारी, ऐच्छिक काम करणाऱ्या व्यक्तीला कर्मचारी म्हटले जाईल. ■ मालक अथवा नियोक्ता–कोणत्याही कंपनीचा मालक किंवा कामाच्या ठिकाणी व्यवस्थापन, निरीक्षक किंवा नियंत्रण करण्याची जबाबदारी असलेली कोणतीही व्यक्ती, मंडळ किंवा समिती यांना मालक/नियोक्ता समजण्यात येईल, संस्थेसंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्यास व अंमलात आणण्यास जबाबदार असेल अशा व्यक्तींना मालक म्हणता येईल. जी व्यक्ती घरकामगारला कामाला लावत असेल आणि तिच्या कामाचा लाभ घेत असेल अशा व्यक्तीला मालक किंवा नियोक्ता म्हणता येईल.

## अंतर्गत आणि स्थानिक तक्रार निवारण समिती

■ समितीच्या नियमित बैठका होणे गरजेचे आहे. ■ समितीच्या कोणत्याही सदस्याकडे लैंगिक छळाची तक्रार आल्यास समितीची

बैठक बोलवण्यात येईल. ■ समितीचे अध्यक्ष लेखी सूचनेद्वारे किंवा ई-मेलद्वारे सदस्यांना बैठकीसाठी बोलवतील. या सूचनेची प्रत फाइलमध्ये ठेवण्यात येईल. ■ बैठकीतील कामकाजाविषय अध्यक्ष ठरवतील आणि सर्व सदस्यांना कळवतील. ■ समितीकडे आलेल्या सर्व तक्रारी गोपनीय राहतील आणि त्याबद्दल समितीच्या बाहेरील व्यक्तींना त्यांचे तपशील देणार नाहीत. ■ समितीचे कामकाज दिवाणी न्यायालयाप्रमाणे चालेल. ■ कामकाज गतीने केले जावे याचे बंधन समितीला असेल. ■ समितीच्या सदस्यांनी तक्रारदार महिलेला अर्ज लिहिणे, समुपदेशन करणे तसेच पोलीस कारवाईमध्ये सर्वतोपरी मदत करणे अपेक्षित आहे. ■ समितीच्या सदस्यांची नावे आणि संपर्क क्रमांक संस्थेच्या कार्यालयात सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावावेत तसेच संकेतस्थळावर प्रसिद्ध करावीत.
■ लैंगिक छळाबाबत आणि तक्रारी निवारणासंबंधी जाणीवजागृती, प्रशिक्षण आणि अशा घटनांना आळा बसावा, यासाठी तक्रार निवारण समितीने संस्थेच्या भरती प्रक्रियेमध्ये अशा सत्रांचा समावेश करावा. ■ समितीच्या प्रत्येक बैठकीचे इतिवृत्तांत ठेवण्यात येतील. प्रत्येक तक्रारीचे दस्तऐवज राखून ठेवले जातील. ■ समितीच्या कामाचा वार्षिक अहवाल जिल्हा अधिकाऱ्याकडे जमा करणे बंधनकारक आहे.

## तक्रारसंदर्भात महत्त्वाच्या गोष्टी

तक्रारदार महिलेने अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीकडे घटना घडल्यानंतर तीन महिन्यांच्या आत किंवा शेवटची घटना घडल्याच्या तीन महिन्यांच्या आत लेखी तक्रार करावी. तक्रारदार महिलेला मानसिक दबावामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे शक्य नसल्यास तिने तसे संबंधित अधिकाऱ्यांना कळवावे. अशा महिलेला तिने अर्ज केल्यास तीन महिन्यांची मुदत वाढवून देता येऊ शकते. टेलिफोन, ई-मेलद्वारे तक्रारदार महिलेची शारीरिक किंवा मानसिक क्षमत नसल्यास किंवा तिचा मृत्यू झाल्यास तिचा कायदेशीर वारस किंवा अन्य नेमलेली व्यक्ती तिच्यावतीने तक्रार दाखल करु शकते.

तक्रारदार महिलेने इच्छा व्यक्त केल्यास तडजोड केली जाऊ शकते. मात्र आर्थिक देवाणघेवाणीच्या आधारे कोणतेही तडतोड न करता योग्य ती कारवाई करण्याची ग्वाही समितीकडून दिली जाणे आवश्यक आहे. तडतोड घडून आल्यानंतर पुढील अहवाल तयार करून नियोक्त्यांना किंवा जिल्हा अधिकारी यांना लेखी माहिती देणे आवश्यक आहे. तसेच तडजोडी किंवा निर्णयाच्या प्रती तक्रारदार महिला व आरोपी यांना दिल्या पाहिजेत.

## चौकशी प्रक्रियेच्या गुप्ततेबाबत

■ तक्रारदार महिला व साक्षीदार यांचे नाव, पत्ता, ओळख किंवा त्या संदर्भाने येणारी कोणतीही माहिती गुप्त ठेवावी लागेल. प्रसार माध्यमांनादेखील छापण्यास देऊ नये किंवा चर्चा करण्याकरिताही देऊ नये. ■ तक्रार आणि चौकशी कामकाजातील मजकूर प्रकाशित अथवा जाहीर करण्यास बंदी आहे. कायद्यातील कलम १६ नुसार अधी माहिती दिली गेल्यास त्या व्यक्तीवर सेवानियमांनुसार कारवाई केली जाईल. ■ माहितीचा अधिकार कायदा, २००५ मधील कलम ९ नुसार कोणी माहिती उपलब्ध करून द्यावी असे सुचवले तरीही या कायद्यानुसार ती दिली जाऊ शकत नाही.

## तक्रारींची चौकशी

■ तक्रारदार महिलेने दिलेला अर्ज लैंगिक छळाच्या व्याख्येनुसार आहे की नाही हे समितीने तपासणे आवश्यक आहे. अर्जामध्ये छळाच्या घटनेच्या स्पष्ट उल्लेख केला आहे की नाही याची खातरजमा करावी. ■ तक्रारदार महिलेने समितीकडे अर्जाच्या सहा प्रती देणे बंधनकार आहे. ■ तक्रारदार महिलेचा अर्ज आल्यावर सात दिवसांच्या आत समितीने प्रतिवादीला नोटीस द्यावी. तसेच नोटिशीसोबत महिलेल्या अर्जाची प्रत जोडावी. प्रतिवादीने नोटीस आणि अर्ज मिळाल्यानंतर दहा दिवसांच्या आज उत्तर देणे अपेक्षित आहे. सोबत संबंधित कागदपत्रे जोडणे अपेक्षित आहे. ■ चौकशीकरिता किमान तीन सदस्यांची आवश्यकता आहे. यामध्ये अध्यक्ष, बाहेरील तज्ज्ञ व्यक्ती असणे बंधनकारक आहे. ■ सर्वात प्रथम तक्रारदार महिलेची चौकशी केली जाईल. त्यानंतर प्रतिवादीची चौकशी केली जाईल.

## साक्षीदारांची चौकशी

■ जाब देणारी व्यक्ती कर्मचारी असल्यास त्या आस्थापनाच्या सेवा नियमानुसार/त्या कायद्याच्या नियम आणि धोरणांनुसार चौकशी सुरू होईल. ■ तक्रारदार घरकामगार किंवा असंघटित कामगार असेल तर त्यांनी प्रथम स्थानिक तक्रार निवारण समितीकडे तक्रार द्यावी. भारतीय दंड संहिता कलम ५०९ अथवा अन्य योग्य कलमानुसार तक्रार नोंदवल्यापासून ७ दिवसांच्या आत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवावा. या तक्रारीबाबत कोणतीही तडजोड झालेली नसल्याचा निर्वाळा तक्रारदाराने दिला पाहिजे. ■ दोन्ही पक्षकारांना एकमेकांनी दिलेल्या जबाबांची प्रत देण्यात येईल. जेणेकरून त्यांना त्यांची उत्तरे देता येतील. ■ तक्रारदार आणि प्रतिवादी व्यक्तीने पुरावे आणि साक्षीदार यांची माहिती पुरवावी. ज्यामुळे चौकशी योग्य दिशेने नेता येईल. तक्रारदार महिलेची तक्रार पुराव्याआभावी खोटी ठरणार नाही. ■ तक्रारदार महिलेला आवश्यक वाटल्यास तिच्या अर्जानुसार तक्रारदार महिलेची किंवा प्रतिवादीची अन्य कामाच्या



ठिकाणी बदली करता येईल. तक्रारदार महिलेला तीन महिन्यांची देखील रजा मंजूर करता येऊ शकते. ही रजा तिला अन्यथा मिळणाऱ्या रजेच्या व्यतिरिक्त असावी. ■ घटना घडल्याच्या ठिकाणाची प्रत्यक्ष तपासणी समितीमार्फत करता येऊ शकते.
■ राज्य घटनेने दिलेल्या या मूलभूत अधिकारांनुसार प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. खालील मुद्दे नैसर्गिक न्यायतत्त्वात समाविष्ट होतात म्हणून चौकशी करताना पुढील गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.
■ समता, न्याय, स्पष्टता या तत्त्वांच्या आधारावर समिती काम करेल. कामकाज पूर्वग्रहदूषित नसावे. ■ भारतीय राज्य घटनेतील कलम १४ नुसार कायद्यासमोर प्रत्येक व्यक्ती ही समान असते.
■ कलम १५ नुसार सामाजिक समानता म्हणजेच स्त्री–पुरुष भेदभाव करू नये. ■ कलम १९ नुसार स्वातंत्र्याचा अधिकार आहे.
■ कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार आहे.

## चौकशीचा अहवाल

■ कायद्यानुसार केली जाणारी चौकशी पूर्ण झाल्यानंतर निर्णयाचा अहवाल तक्रार निवारण समिती नियोक्त्याला किंवा जिल्हा अधिकारी यांना १० दिवसांच्या आत देईल. त्याची प्रत संबंधित पक्षांना/तक्रारदार आणि आरोपी या दोघांना उपलब्ध करून देईल. ■ अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीच्या चौकशीत आरोपीविरुद्धचा आरोप सिद्ध झाला नाही तर तक्रार निवारण समिती नियोक्त्याला किंवा जिल्हा अधिकाऱ्यांना त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई न करण्याची शिफारस करू शकते.
■ तक्रार निवारण समितीच्या चौकशीत आरोप सिद्ध झाल्यास तक्रार निवारण समिती नियोक्तयाला किंवा जिल्हा अधिकाऱ्यांना खालील शिफारसी करू शकतात. ■ आरोपीला अंतर्गत तक्रार समितीने लागू केलेल्या कामाच्या नियमावलींमधील लैंगिक गैरवर्तणुकीविरुद्ध केल्या जाणाऱ्या शिक्षा त्याला देण्यात याव्यात.
■ तक्रारदार स्त्रीला किंवा तिच्या वारसाला नुकसान भरपाई म्हणून देण्यात येणारी रक्कम आरोपीच्या पगारातून कापली जाईल. आरोपीच्या पगारातून अशी कपात शक्य नसल्यास त्याच्याकडून ती रक्कम थेट घेता येईल. जर आरोपीने रक्कम भरली नाही तर कायदेशीर कारवाई करून थकबाकी वसूल करता येऊ शकते.
■ तक्रार निवारण समितीकडून मिळालेल्या शिफारसीनंतर ६० दिवसांच्या आत त्यांची अंमलबजावणी करणे नियोक्ता किंवा जिल्हा अधिकारी यांना बंधनकारक असेल.



## खोटी तक्रार

■ तक्रारदार महिलेने दिलेली तक्रार किंवा पुरावे खोटे आढळून आल्यास तक्रारदार महिलेविरुद्ध कामाच्या सेवा नियमावलीनुसार किंवा समितीच्या शिफारसीनुसार कारवाई करता येईल. फक्त आरोप सिद्ध करता न येणे किंवा पुरावे देणे शक्य नसणे या गोष्टी शिक्षा देण्यासाठी पुरेशा नाहीत. ■ चौकशीच्या दरम्यान एखाद्या साक्षीदाराने खोटी साक्ष किंवा चुकीची माहिती दिली तर तक्रार निवारण समितीच्या शिफारसीनुसार कारवाई करण्याचा अधिकार आहे.

## नुकसानभरपाई

तक्रारदार महिलेला नुकसान भरपाई मिळण्याचा कायदेशीर अधिकार आहे. ही रक्कम ठरवताना पुढील गोष्टी विचारात घेणे जरुरीच आहे. ■ तक्रारदार महिलेला लैंगिक छळामुळे सहन करावा लागलेला मानसिक त्रास, शारीरिक त्रास, भावनिक दु:ख किंवा वेदना यांचा विचार व्हावा. शिवाय शारीरिक आणि मानसिक उपचारांवर झालेला खर्च किती आहे हे तपासून पाहावे. ■ लैंगिक छळामुळे सहन करावे लागलेले व्यावसायिक किंवा नोकरीच्या संधीचे झालेले नुकसान पाहावे. ■ नुकसान भरपाई मंजूर करताना प्रतिवादी व्यक्तीचे उत्पन्न व आर्थिक स्तर लक्षात घेणे आवश्यक आहे. शिवाय आरोपीने द्यावयाची नुकसान भरपाई रक्कम एकाच वेळी किंवा हप्त्याने देण्याची क्षमता किती आहे हेही पाहणे आवश्यक आहे.

### शिक्षा

**कायद्यातील व्याख्येप्रमाणे दिलेल्या कामाच्या ठिकाणी कामासंदर्भात उपलब्ध असलेल्या सेवा नियमावलीनुसार शिक्षा देण्यात येईल. उदा. लेखी माफी, पगारातील कपात, वेतनवाढ स्थगिती, पदावनती (डिमोशन), पदच्युत करणे (टर्मिशन), करेक्शन मेथड, नियमावली/आचारसंहितेनुसार लागू असलेली शिक्षा, अंतर्गत किंवा स्थनिक तक्रार समितीला दिवाणी कोर्टाप्रमाणे अधिकार असतील. कोणत्याही व्यक्तीला समजपत्र पाठवून, बोलावून घेऊन व त्याला तक्रार निवारण समितीसमोर उपस्थित राहण्यास व जबाब देण्यास कायद्याने भाग पाडले जाईल. आवश्यक ती कागदपत्रे शोधणे किंवा बनवणे, आवश्यक ती अन्य कोणतीही कारवाई करणे.**

## तक्रारदार महिलेचे अधिकार

लैंगिक छळ झालेला असूनही त्या स्त्रीला तक्रार करायची नसल्यास तो तिचा अधिकार आहे. स्वत:चे म्हणणे मांडण्याचा व ते इतरांपर्यंत पोहोचवण्याचा अधिकार तक्रारदार महिलेला आहे. कायद्यानुसार आणि सेवा नियमावलीनुसार तक्रारदार महिलेला रजा मिळण्याचा अधिकार आहे. तक्रारदार महिलेस स्वत:च्या किंवा

प्रतिवादीच्या बदलीची मागणी करू शकते.

तक्रारदार महिलेस तक्रार निवारण समितीचा निर्णय जाणून घेण्याचा अधिकार आहे. तक्रारदार महिलेला न्याय न मिळाल्यास तो मिळण्यासाठी विनंती करण्याचा अधिकार असतो.

### जिल्हा अधिकाऱ्यांचे अधिकार आणि कर्तव्य

■ जिल्ह्यामध्ये असलेल्या सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यासाठी प्रयत्न करणे. ■ अंतर्गत तक्रार समितीच्या कामकाजाचे निरीक्षण आणि देखरेख करणे, समितीच कामकाज सुरळीत चालण्यासाठी मदत करणे. ■ अंतर्गत आणि स्थानिक तक्रार निवारण समितीचे वार्षिक अहवाल स्वीकारणे. ■ जिल्ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या आस्थापनांनी कायद्यांच्या नियमानुसार समितीची स्थापना केली नसल्यास दंडात्मक करावाई करणे. ■ स्थानिक तक्रार निवारण समितीची स्थापना करणे. स्थानिक तक्रार समितीला चौकशी, बैठक इ. कामकाज करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. ■ जिल्हा अधिकारी यांनी लोकांमध्ये लैंगिक छळाबाबतचा कायदा व महिलांचे अधिकार याबाबत जनजागृतीपर कार्यक्रम राबवावे. ■ जिल्ह्यातील सर्व अंतर्गत आणि स्थानिक तक्रार निवारण समितीचा एक संक्षिप्त अहवाल राज्य शासनाला देतील.

### माहिती मागवण्याचा अधिकार

सक्षम शासन, जनहित व महिला कर्मचाऱ्यांच्या कामाच्या ठिकाणचे हित लक्षात घेऊन लिखित आदेशांद्वारे आवश्यकता भासल्यास कोणत्याही नियोक्त्याला अथवा जिल्हा अधिकाऱ्यांना बोलावून लैंगिक छळाच्या संदर्भात एखादे रेकॉर्ड किंवा कामाचे ठिकाण तपासण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करेल जो ठरावीक कालावधीत आपला तपासणीबाबतचा अहवाल सादर करेल.

प्रत्येक नियोक्ता किंवा जिल्हा अधिकारी, तपासणी अधिकाऱ्याच्या मागणीनुसार संबंधित विषयांची माहिती, रेकॉर्ड व त्याच्या ताब्यातील अन्य कागदपत्रे त्याच्यासमोर सादर करतील.

### कायद्यातील तरतुदीचे पालन न केल्याबद्दल दंड

कायदा व त्याचे नियम यांचे पालन न केल्यास नियोक्त्याला ५०,००० रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. एखाद्या मालकास/नियोक्त्याला वरील कोणत्याही कारणाने दंड झाला असेल आणि त्याने पुन्हा त्याच कायद्याचे उल्लंघन केले तर त्याला आधीच्या दंडाच्या दुप्पट दंड होईल किंवा त्याचा व्यवसाय करण्याचा परवाना रद्द देखील केला जाऊ शकतो. मेट्रोपोलिटन (महानगर दंडाधिकारी न्यायालय) किंवा जुडीशियल कोर्टाच्या खालील कोर्ट या कायद्याच्या अंतर्गत कारवाई करत नाही. या कायद्यातील प्रत्येक गुन्हा अदखलपात्र आहे.

### मालक किंवा नियोक्त्याचे कर्तव्य

■ कायद्यानुसार आस्थापनेमध्ये महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी अंतर्गत धोरण तयार करण्याची जबाबदारी आहे. ■ कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित आणि निकोप वातावरण उपलब्ध करून द्यावे. यात कामाच्या ठिकाणी संपर्कात येणाऱ्या व्यक्तीपासूनची सुरक्षादेखील समाविष्ट आहे. लैंगिक छळाविरुद्ध असलेला कायदा, तक्रार निवारण समिती यांच्या कारवाईबाबत, समिती सदस्यांची नावे आणि संपर्क सर्वांना दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करणे. ■ या कायद्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा जनजागृतीचे कार्यक्रम नियमितपणे घेऊन आपल्या कर्मचाऱ्यांचा कायदा, त्यातील तरतुदी, अंतर्गत तक्रार निवारण समिती व त्याचे सदस्य याबाबत माहिती द्यावी. ■ अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीला चौकशी, बैठक इत्यादी कामकाज करण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. ■ या अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीसमोर प्रतिवादी व साक्षीदारांना उपस्थित राहण्यासाठी समितीला सहकार्य करावे. तक्रारीच्या चौकशीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे व माहिती समितीला उपलब्ध करून द्यावी. तक्रारदार महिलेला भारतीय दंड संहितेनुसार इतर कायद्यांची मदत घ्यायची असेल तर तिला सर्वतोपरी सहकार्य करणे. लैंगिक छळ करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा. ती व्यक्ती कर्मचारी असल्यास त्याची लैंगिक छळाची कृती ही गैरवर्तणूक आहे असे मानून, त्याच्याविरुद्ध कामाच्या नियमावलीत गैरवर्तणुकीबाबत असलेली कारवाई सुरू करावी. अंतर्गत तक्रार निवारण समिती वेळेत कारवाई करत आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवावे. कंपनीत नोंद झालेल्या तक्रारी, आणि त्यावरील कारवाईबाबतची माहिती नियोक्त्याने आपल्या कंपनीच्या वार्षिक अहवालात सादर करावी. कंपनीतर्फे जर असा वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला जात नसेल तर कंपनी हा अहवाल जिल्हा अधिकाऱ्यांना देईल. (साभार : 'साद' जानेवारी २०१८ (राज्य महिला आयोगाचे मुखपत्र))



**महिलांनी त्यांच्यावर होणाऱ्या कोणत्याही जुलूम जबरदस्तीमुळे घाबरून जाऊ नये. महाराष्ट्र पोलीस त्यांच्या संरक्षणासाठी सदैव सज्ज आणि तत्पर आहे. आपत्तिग्रस्त महिलांनी तत्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवावी.**

- महिलांनी त्यांच्याविरुद्ध होत असलेल्या गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी न घाबरता पोलीस ठाण्यास जावे.
- पोलीस ठाण्यात महिला अधिकारी तत्काळ दखल घेऊन तक्रार नोंदवून घेतील.
- तुमची तक्रार तुम्हाला वाचून दाखवली जाईल व फिर्यादीची एक प्रत त्वरित विनामूल्य दिली जाईल.
- विनयभंग, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांचे घटनास्थळ कोठे आहे याची काळजी करू नका. कोणत्याही पोलीस ठाण्यात जा. पोलीस तुमची तक्रार नोंदवून संबंधित पोलीस ठाण्यात त्वरित हस्तांतरित करतील.



# पोलिसांकडून मदत...

- तुमचा जबाब नोंदवताना तुमच्यासोबत तुमची विश्वासार्ह व्यक्ती हजर राहू शकेल. तुम्ही कौटुंबिक हिंसाचाराचा बळी असाल तर पोलीस तुमची तक्रार नोंदवून घेतील. त्याचबरोबर तुम्हाला कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत जिल्हास्तरावरील महिला बाल विकास अधिकारी, या कार्यालयामार्फत सेवा उपलब्ध होऊ शकते याची माहिती देतील.
- महिला जर लैंगिक गुन्ह्याची बळी असेल तर महिलांच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती पोलीस ठाण्यात येऊन तक्रार देऊ शकते.
- महिला जर पोलीस ठाण्यास जाऊ इच्छित नसेल तर पोलिसांच्या मुंबई येथील १०३ व उर्वरित महाराष्ट्राकरीता १०९१ या हेल्पलाइनवर संपर्क साधा. महिला पोलीस अधिकारी साध्या वेशात तुम्हाला सोयीस्कर ठिकाणी भेटून तुमची फिर्याद /जबाब नोंदवतील.

अस्मिता

- महिला जर स्थानिक भाषेत बोलू शकत नसेल किंवा काही शारीरिक /मानसिक व्यंग असेल तर पोलीस दुभाष्या किंवा विशेष प्रशिक्षक बोलावून त्यांच्या मदतीने तुमची फिर्याद/जबाब नोंदवून घेतील. ● महिला पोलीस ठाण्यात आल्यावर आरोपीच्या संपर्कात येणार नाही याची दक्षता पोलीस घेतील.
- पोलीस तुम्हाला गरजेनुसार वैद्यकीय उपचार/तपासणीसाठी रुग्णालयात घेऊन जातील व महिला वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेतील. ● जर तुम्हाला आश्रय/निवारा हवा असेल तर तोही मिळवून देण्यास पोलीस सहकार्य करतील. ● महिला पोलीस अधिकारी पोलीस ठाण्यामध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलीस स्टेशनमध्ये महिलेस बोलविता येत नाही. ● सायबर गुन्ह्याबाबत महिला सायबर सेलशी संपर्क साधू शकतात. ● एखाद्या महिलेला अटक करताना महिला पोलीस व महिला साक्षीदार असतात. ● महिला त्यांच्या प्रकरणात जिल्हास्तरावर पोलीस अधीक्षक/आयुक्त कार्यालयातील महिला व मुलांकरिता सहायता कक्ष यांच्याकडे मदत मागू शकतात. ● विनयभंग, लैंगिक अत्याचार, सायबर गुन्हे अशा अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल.

### अन्याय सहन करू नका, कायद्याची मदत घ्या

- महिला आयोग सदैव आपल्या पाठीशी आहे. ● कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून प्रतिबंध /मनाई/निवारण कायदा, २०१३ नुसार कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता आहे. ● कौटुंबिक हिंसाचार कायदा, २००५ अन्वये महिलांना संरक्षण, निवारा, मुलांचा हक्क/नुकसान भरपाई /पोटगी या कायद्यान्वये मागू शकतात. ● गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम १९९४ या कायद्याने लिंग निवडीबाबत प्रतिबंध करण्यात आला आहे. ● सायबर क्राइम अधिनियम २०१५ अन्वये अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करणे, माहिती काढणे कायद्याने गुन्हा आहे. ● अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अन्वये महिलांची तस्करी करणे कायद्याने गुन्हा आहे. ● लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (POCSO) अन्वये अल्पवयीन बालकांवरील अत्याचारांस प्रतिबंध करण्यात आला आहे.

**लोकसभेत तिहेरी तलाकच्या विरोधात विधेयक मंजूर होणे, ही खूप मोठी गोष्ट आहे. १९८४ मधील शाहबानो ते २०१७ मधील शायराबानो असे एक वर्तुळ पूर्ण होत आहे. फेब्रुवारी १९८६ मध्ये मुस्लीम माता-भगिनींचा न्यायालयात जाण्याचा अधिकार हिरावून घेतला. मात्र, आता तिहेरी तलाकविरोधी विधेयकामुळे या महिलांना न्याय मिळेल.**

# तिहेरी तलाक: आता उजाडेल

**विजया रहाटकर**



२८ डिसेंबर हा दिवस मुस्लीम महिलांच्या अधिकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण राहील, कारण याच दिवशी 'मुस्लीम महिला विवाह अधिकारांचे संरक्षण विधेयक, २०१७' नावाचा कायदा बनण्याच्या दिशेने पहिले पाऊल पडले आहे. हे विधेयक मंजूर होताच पुरुषांनी एकाच दमात तीन तलाक म्हणून घटस्फोट देणे, हा गुन्हा ठरेल आणि त्यासाठी तीन वर्षांच्या शिक्षेची तरतूद असेल.

तिहेरी तलाकच्या प्रथेवर गेल्या अनेक दिवसांपासूनच चर्चा होत आहे. या सर्व चर्चांचे सार हेच आहे, की ही एक बुरसटलेली परंपरा आहे. ही मनमानी असून ती जाणार हे निश्चित आहे. कोणत्याही सभ्य आणि समतापूर्ण समाजासाठी ही प्रथा एक डाग आहे. म्हणूनच खुद्द सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत स्पष्ट शब्दात म्हटले आहे, की मुस्लीमांमधील एकदाच तलाक म्हणून देण्यात येणारा घटस्फोट 'अमान्य', 'अवैध' आणि 'घटनाबाह्य' आहे.



मुस्लीम कशाला, कोणतेही विवाहसंबंध संपुष्टात आणण्यासाठी तिहेरी तलाक पद्धत कधीही स्वीकारार्ह होऊ शकत नाही. तीन तलाकशी संबंधित विधेयक हे मुस्लीम महिलांना बरोबरीचा अधिकार देण्यासाठी स्वातंत्र्यानंतरचा कदाचित सर्वांत मोठा उपक्रम आहे. एका झटक्यात तीनदा तलाक- मग तो बोलून दिलेला असो, ई-मेलवरून असो किंवा एसएमएस-व्हॉट्सअपवरून असो- आता इतिहासजमा होईल. या विधेयकानुसार जो पती आपल्या पत्नीला मौखिक, लेखी किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने एकत्र तीन तलाक (तलाक-ए-बिद्दत) देईल त्याला तीन वर्षांची शिक्षा व दंडही होईल.

## स्वाभिमान आणि समानता

मुस्लीम महिलांसाठी हे स्वाभिमान आणि समानतेचे नवे युग सुरू करणारी घटना आहे. हे पाऊल कोणाचाही अनुनय नाही आणि सर्वांसाठी न्याय या तत्त्वाचा अंगीकार करणारे आहे. या बाबींचा चिकाटीने विरोध करणाऱ्या भारतीय मुस्लीम महिला आंदोलन (बीएमएमए) यांच्यासह अनेक संस्थांचे मन:पूर्वक अभिनंदन करावे लागेल. भारताच्या घटनात्मक इतिहासात केंद्र सरकारने प्रथमच सात ऑक्टोबर २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालयात तीन तलाक, निकाह हलाल आणि बहुविवाह प्रथेचा विरोध केला होता. हे मला आवर्जून सांगायचे आहे. एकीकडे हे विधेयक संसदेत येत असताना उत्तर प्रदेशातील रामपूर येथील एका भगिनीला या अत्याचाराचा सामना करावा लागला, ही एक विसंगतीच म्हणावी लागेल. तिचा गुन्हा एवढाच होता, की ती सकाळी झोपेतून उशिरा उठली आणि पतीने तिला तलाक दिला. सर्वोच्च न्यायालयाने तलाकवर बंदीचा ऐतिहासिक निर्णय देऊनही इतकी हिंमत दाखवली गेली, पण गुल अफशां हिच्यासारख्या सुमारे शंभर प्रकरणांमध्ये तलाक दिला गेला. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही म्हणूनच लोकसभेत तिहेरी तलाकच्या विरोधात विधेयक मंजूर होणे, ही खूप मोठी गोष्ट आहे. शाहबानो ते शायराबानोचे एक वर्तुळ पूर्ण होत आहे. शाहबानो खटला आपणा सर्वांना तर माहीत असेलच. त्या बिचाऱ्या घटस्फोटित महिलेला सर्वोच्च न्यायालयाने केवळ १२७ रुपयांची मेहेर व पोटगी देण्याचा आदेश दिला होता. मात्र, १९८६ मध्ये एका कायद्याद्वारे मुस्लीम महिलांचा पोटगीचा अधिकार हिरावला गेला. आता मात्र तिहेरी तलाकच्या विरोधात शायरा बानोने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली, तेव्हा विद्यमान सरकारने तिला पाठिंबा दिला. अन् आता तिहेरी तलाकची कुप्रथा समाप्त होण्याच्या मार्गावर आहे. एवढा मोठा प्रवास आपल्या मुस्लीम भगिनींनी केला आहे.

ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने या विधेयकाची संभावना महिलाविरोधी म्हणून केली आहे. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांच्या दृष्टीने हे विधेयक घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. मला त्यांना विचारायचे आहे की, पीडित महिलांना काही मूलभूत अधिकार आहेत की नाही? त्या शेळ्या-मेंढ्या आहेत का? देशातील कोट्यवधी मुस्लीम महिलांना समानता आणि स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार नाही का? हा कायदा महिलांच्या आत्मसन्मानाचा आहे. सुप्रीम कोर्टाने तलाक-ए-बिद्दतला बेकायदा ठरवल्यानंतरही अशा तलाकची शंभरहून अधिक प्रकरणे समोर आली आहेत. या लोकांना गुन्हेगार नाही, तर काय म्हणावे? गरीब मुस्लीम महिलांच्या बाजूने उभे राहणे हा अपराध असेल, तर आम्ही तो शंभरदा करू. महिलांवर

अन्याय होत राहील, तर या सभागृहाने काय शांत बसावे? धर्माच्या नावावर आपल्या अर्ध्या लोकसंख्येशी अनुचित व्यवहार होत असेल, तर जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून आपण कोणत्या तोंडाने बोलणार? काही व्यक्ती, संस्था या विधेयकावर टीका करत आहेत. ते म्हणतात की, तीन तलाकला गुन्हा ठरवण्यात आणि त्यासाठी तीन वर्षांच्या शिक्षेची तरतूद केल्याने त्यांचा गैरवापर होईल. त्यांचे हेही म्हणणे आहे की, पती तुरुंगात गेला तर या पीडित महिलांना पोटगी कोण देणार? या युक्तीवादावर हसू येते. त्या मान्य केल्यास बलात्कार, खून, महिलांवरील गुन्ह्यांमध्ये दोषी व्यक्तींना कधीही तुरुंगामध्ये पाठवता कामा नये, कारण ते तुरुंगात गेले तर त्यांच्या कुटुंबाचा निर्वाह कसा होईल? गैरवापर होण्याची शंका आपण समजू शकतो, पण अशा शंका सर्वच कायद्यांबाबत असतात. कधी-कधी बलात्काराच्या बाबतीत गैरवापर होतो, म्हणून आपण बलात्काराच्या विरोधातील कठोर तरतुदी काढणार का? त्याचप्रमाणे भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ (हुंडाविरोधी कायदा) याचाही सर्वाधिक गैरवापर होतो. स्वत: सर्वोच्च न्यायालयानेही हे मान्य केले आहे. म्हणून काय ते कलम आपण काढून टाकायचे? गैरवापराची शक्यता असेल, तर सर्वांनी मिळून त्यातून मार्ग काढायला हवा, परंतु तिहेरी तलाकच्या गुन्हेगारांना त्यांच्या गुन्ह्यांची शिक्षा मिळायला हवी. अशा प्रकारचा धाक, जरब समाजस्वास्थ्यासाठी आवश्यक आहे. शिवाय कोणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा भंग करत असेल, तर ते गुन्हेगारी कृत्यच (क्रिमिनल केस) मानले जाते.

**अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

## राज्य महिला आयोगाविषयी .....

१९९३ च्या महाराष्ट्र कायद्यातील कलम १५ अंतर्गत २५ जानेवारी १९९३ रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. सध्या विजया रहाटकर या आयोगाच्या अध्यक्ष असून डॉ. मंजूषा मोळवणे या सदस्य सचिव आहेत. या खेरीज आयोगाच्या अन्य सहा अकार्यकारी संचालक आहेत. राज्याचे पोलीस महासंचालक हे आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतात.

### आयोगाची प्रमुख उद्दिष्टे

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचवणे
- एखादा विद्यमान कायदा महिलांसाठी अन्यायकारक असल्यास त्याबाबत सरकारला सूचना देणे आणि संबंधित कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी उपाय सुचवणे.
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

### आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य आयोग ही वैधानिक संस्था असून, तिला दिवाणी न्यायालयाचा दर्जा आहे
- एखाद्या खटल्याशी संबंधित कागदपत्रे कोणत्याही सार्वजनिक कार्यालय वा न्यायालयाकडून आयोग मागवू शकतो
- साक्षीदार आणि कागदपत्रांची तपासणी करण्याबाबत आयोग आदेश देऊ शकतो
- आयोगाशी संबंधित विषयावर सुनावणीला स्थगिती देण्याचाही अधिकार आयोगाला आहे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखाद्या राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

### आयोगाची कामे

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरवणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- कार्यशाळा आणि प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे
- जनजागृती मोहिमा राबवणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबवणे
- तुरुंगांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- सरकारला महिलाविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे
- आयोगासाठी तक्रार निवारण मंच स्थापन करणे

### संपर्क

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग,**
पोटमाळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
**ई-मेल:**
mscwmahilaayog@gmail.com
chairperson.mscw@gmail.com
**संकेतस्थळ:** www.mscw.org.in
दूरध्वनी: ०२२-२६५९०८७८

# 'स्मार्ट' सुरक्षा

**मोबाइलमधील महिला सुरक्षा संदर्भातील ॲप्लिकेशनमुळे आपत्कालीन परिस्थितीमध्ये महिलांना स्वतःचा बचाव करता येवू शकतो. सुरक्षेचा उपाय म्हणून महिलांकरिता असे अनेक ॲप्लिकेशन गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असून सोयीनुसार ते डाऊनलोड करता येऊ शकतात. त्यामुळे आता महिला सुरक्षेसाठी 'स्मार्ट'सेफ्टी उपलब्ध आहे.**

**सोनल महादेव मंडलिक**

दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचार, बलात्कार, गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे महिलांची सुरक्षा हा विषय महत्त्वाचा ठरत आहे. मुंबई–पुणे–दिल्ली यांसारख्या शहरात रात्री कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे सुरक्षेचा मुद्दा आणखीच गंभीर होत आहे. शाळेत जाणारी विद्यार्थिनी ते कामासाठी घराबाहेर पडणारी महिला यांना भक्कम सुरक्षेच्या कुंपणाची गरज निर्माण झाली आहे. यासाठीच महिलांनी स्वतः सक्षम होणे गरजेचे आहे. प्रत्येक महिलेने संरक्षणाचे धडे तर शिकावेच पण त्याबरोबरच आपल्या सोबत सुरक्षेच्या दृष्टीने असणाऱ्या वस्तू बाळगाव्यात. यामध्ये पेपर स्प्रे, ब्लेड, चाकू या गोष्टींसोबत, पण मोबाइलच्या माध्यमातून मोठी मदत महिलांना मिळू शकते. प्रत्येकाजवळ स्मार्टफोन उपलब्ध असल्याने ते शक्य झाले आहे.



### सेफ्टी पिन

सेफ्टी पिन...! प्रत्येक महिलेकडे हमखास आढळणारी गोष्ट, याच संकल्पनेतून एक मोबाइल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले. तुमच्या मोबाइलवर इंटरनेटची सुविधा असेल तर तुम्हीही हे ॲप्लिकेशन वापरू शकता. जीपीएस, थ्री जी आणि वायफायसारख्या सुविधा असलेल्या अँड्रॉईड मोबाइलवर हे ॲप्लिकेशन वापरता येते. हे ॲप्लिकेशन जीपीएस, इमर्जन्सी कॉन्टॅक्ट नंबर, सेफ लोकेशन दाखवण्याचे काम करते. याशिवाय ॲप्लिकेशनमध्ये नोंद केलेल्या व्यक्तींना आपल्या जागेची ठरावीक माहिती उपलब्ध होते.

### 'बी स्मार्ट, बी सेफ'

bsafe
Never walk alone

महिलांवरील वाढते अत्याचार पाहता एका आयटी कंपनीने सुरक्षेसाठी स्मार्ट ॲप्लिकेशन तयार केले. यामुळे हल्ला झाल्यास पुरावा मिळवण्यात मदत होणार आहे. सायरन वाजून ठिकाण, छायाचित्र, आवाजाचे चित्रीकरण या ॲप्लिकेशनद्वारे केले जाते. आता गर्दीच्या ठिकाणी, वाहनांमध्ये रेल्वेमध्ये अगदी कुठेही महिलांवर काही हल्ला झाला तर त्यांच्या मदतीला त्यांचा मोबाइल फोन पडेल. 'बी स्मार्ट, बी सेफ' या ॲप्लिकेशनमध्ये ॲक्टीव्ह मोड, सायलेंट मोड, प्रिव्हेंटिव्ह मोड, काऊंटडाऊन मोड, ब्रॉडकास्ट मोड असे पाच विविध मोड आहेत. तुम्ही तुमच्या गरजेनुसार मोड बदलू शकता. मोफत असलेले हे ॲप्लिकेशन गुगल प्लेवरून 'बीसेफ (Bsafe)' नावाने डाऊनलोड करता येणार आहे. ॲप डाऊनलोड करण्यासाठी – URL&smart-safe.org या संकेतस्थळावर तुम्हाला लॉग इन करता येणार आहे. ज्यात रेकॉर्ड केलेला मजकूर तुम्हाला सुरक्षित ठेवता येणार आहे. यादरम्यान तुमच्या मोबाइलला इजा झाली तर रि–रेकॉर्ड सर्व्हरवर तो डेटा सेव्ह होणार आहे. पोलिसांना देखील पुराव्यासाठी हे ॲप्लिकेशन उपयोगी पडणार आहे.




### हिम्मत ॲप्लिकेशन

दिल्लीतील वाढत्या महिला अत्याचाराच्या घटनांना लगाम लावण्यासाठी आणि महिलांचा प्रवास सुरक्षित होण्यासाठी दिल्ली पोलिसांनी हिंमत ॲप्लिकेशन सुरू केले आहे. हे वापरण्यासाठी महिलांना दिल्ली पोलिसांच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे. नोंदणी केल्यावर एक ओटीपी नंबर (वन टाईम पासवर्ड) मिळेल. ॲप्लिकेशनमध्ये तो वापरता येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये या ॲप्लिकेशनमधील एसओएसच्या माध्यमातून अलर्टद्वारे लोकेशनसहित ऑडिओ, व्हिडिओ दिल्ली पोलिसांच्या कंट्रोल रुममध्ये जाणार आहे. त्यानुसार महिलेला तातडीने मदत मिळणे शक्य होते.

### वूमन सेफ्टी

हे ॲप्लिकेशन असुरक्षित जागेची माहिती देण्यासाठी सक्षम आहे. यामध्ये केवळ एका क्लिकवर तुमचे लोकेशन पाठवण्याची सुविधा उपलब्ध आहे. यामध्येही सुरुवातीला काही नंबर सेव्ह करावे लागणार आहे. त्यानुसार एसएमएसच्या माध्यमातून अलर्ट आणि तुमचे लोकेशन गुगल नकाशाच्या आधारे ठरावीक लोकांपर्यंत पोहोचणार आहे. विशेष म्हणजे हे ॲप्लिकेशन तीन विविध रंगाच्या माध्यमातून परिस्थितीचे गांभीर्य सांगते.



त्यामुळे परिस्थितीनुसार बटण क्लिक करून ही माहिती पोहोचवता येते.

### स्मार्ट २४ x ७

स्मार्ट २४ x ७ हे ॲप्लिकेशन विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी उपयोगी आहे. या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून पॅनिक अलर्ट इमर्जन्सी मोबाइल नंबरवर पाठवले जातात. हे ॲप्लिकेशन आपत्कालीन ठिकाणचे आवाज आणि फोटो रेकॉर्ड करून संबंधित पोलिसांपर्यंत पोहोचवण्याचे काम करते. हे ॲप्लिकेशन कॉल सेंटरसोबत जोडले गेले असल्याने व्यक्तीच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते. पॅनिक बटणवर क्लिक केल्यावर पर्याय निवडीची सुविधा यामध्ये देण्यात आली आहे. त्यानुसार निवड करून सबमिट बटण क्लिक करावे. जीपीआरएस सुरू नसल्यास मेसेजद्वारे अलर्ट पाठवण्यात येतो.

### शेक टू सेफ्टी

हे ॲप्लिकेशन वापरण्यासाठी सोपे असून विविध सुविधांसाठी याचा वापर करण्यात येतो. केवळ फोन शेक केल्याने म्हणजेच हलविल्याने किंवा पॉवर बटण ४ वेळा दाबल्याने मोबाइलमधील ॲप्लिकेशनमधून एसओएस नोंद केलेल्या लोकांपर्यंत पोहोचतो. विशेष म्हणजे हे ॲप्लिकेशन स्क्रीन बंद असताना आणि इंटरनेटशिवाय देखील काम करते. हे ॲप्लिकेशन नैसर्गिक आपत्ती, चोरी, यासारख्या घटनांसाठी देखील फायदेशीर आहे.

### निर्भया

हे ॲप्लिकेशन डाऊनलोड केल्यानंतर प्रोटेक्टर म्हणून पर्याय दिसतो. त्यामध्ये आपले मोबाइलमधील नंबर सेव्ह करून ठेवावे. गरजेच्या वेळी मोबाइलचा व्हॉल्युम बटण दाबल्याने किंवा मोबाइल ३-४ वेळा शेक केल्याने ॲप्लिकेशन सुरू होऊन प्रोटेक्टर नंबरवर एसएमएस पाठवण्यात येतो. याशिवाय जीपीएसद्वारे लोकेशन पाठवून 'हेल्प मी' असा संदेशही पाठवण्यात येतो. वापरकर्त्याला या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून नजीकच्या पोलिसांशी संपर्क करण्याची सुविधा आहे.

### स्पॉट अन सेव्ह

काही वेळा आपण अशा संकटात सापडतो की, त्या वेळी स्मार्ट फोनचा वापर करणे शक्य होत नाही. अशा वेळी स्पॉट ॲण्ड सेव्ह मनगटी ब्यांड फायदेशीर ठरतो. या मनगटी पट्ट्याद्वारे संकटकाळी अलर्ट पाठवण्यात येतो. हे ॲप्लिकेशन मोबाइलमध्ये डाऊनलोड केल्यानंतर मनगटी पट्ट्यासोबत कनेक्ट करून त्यामध्ये आपत्कालीन नंबर सेव्ह करून ठेवावेत. त्यानंतर स्मार्ट फोन नसतानादेखील या मनगटी पट्ट्याच्या आधारे मदतीसाठी एसएमएस लोकेशनसह पाठवता येईल.

### एसओएस स्टे सेफ

एसओएस हे ॲप्लिकेशन मोबाइलमधील पॉवर बटणच्या आधारे सुरू होते. तीन वेळा पॉवर बटण दाबल्यावर आपत्कालीन परिस्थितीमध्ये संबधित मोबाइल नंबरवर एसएमएस पाठवण्यात येतो. त्याचसोबत वापरकर्त्याचे लोकेशन आणि मोबाइलच्या बॅटरीबाबत अचूक माहिती पोहोचवण्यात येते. त्यानुसार मदतीसाठी सुविधा उपलब्ध होते.

### विथ यू

हे ॲप्लिकेशन व्ही चॅनेलच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे. पॉवर बटण दोन वेळा दाबल्यानंतर या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून निवडलेल्या मोबाइल क्रमांकांना लोकेशनसह अलर्ट पाठवण्यात येतो. तसेच दर २ मिनिटांनी अपडेट देण्यात येतात. यामध्ये 'टिप्स फीड' या पर्यायावर क्लिक केल्यास सेफ्टी टिप्सदेखील देण्यात आल्या आहेत.

### तेजस्विनी

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने महिला सक्षमीकरण करण्यासाठी तेजस्विनी ॲप्लिकेशन तयार करण्यात आले. या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून महिलांसाठी विशेष माहिती पुरवण्यात आली आहे. यामध्ये महिलांसाठीचे कायदे व नियम, विविध उपक्रम यांचा समावेश आहे. तसेच महिलांना तक्रार करण्यासाठी देखील पर्याय देण्यात आला आहे. त्यामुळे एखादी घटना किंवा गुन्हा घडल्यास महिला या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून तक्रार दाखल करू शकतात. त्यानुसार त्यांना मदत पुरवण्यात येते.

**आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

**मासिक पाळी ही एक शरीरशुद्धी आहे. दर महिन्याला ओव्हरीमधून एक अंडे ट्यूबमध्ये येते, मोठे होते आणि एका ठरावीक दिवशी ते फुटून रक्तस्राव सुरू होतो. त्या वेळी योनी मार्गाची स्वच्छता महत्त्वाची ठरते. काही मुलींना फार कमी रक्तस्राव होतो तर काहींना बराच रक्तस्राव होतो. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्याबद्दल जाणीवजागृती होणे गरजेचे आहे.**

# संकोचाचा पडदा दूर करा..

**डॉ. स्नेहलता देशमुख**

रजोदर्शन (मासिक पाळी) हा नावीन्याचा क्षण फार आनंददायी असतो. मुलगी तीच जी आधी परकरातली आहे, पण एक क्षण तिच्या जीवनात नावीन्याचा येतो आणि साऱ्या शरीराला लावण्याची नव्हाळी देऊन जातो. मुलगी वयात आली, लगेच आई लेकीला उष्ण पदार्थ खाऊ नकोस, सकस व शरीराला थंडावा हवा म्हणून गुलकंद, तूप, साखर खाऊ घालते. रजोदर्शन झालं म्हणजे स्त्री परिपूर्ण झाली. आईला वाटते मुलीला आता विश्रांतीची गरज आहे. म्हणून ती लेकीला खेळू नकोस, शाळेत जाऊ नकोस, शांत पडून राहा, असा सल्ला देते.



## जाचक रूढी

पूर्वी आणि आतासुद्धा रजोदर्शन हे अस्वच्छ मानले जाते. बाहेरची होणे, अंगावर जाणे, शिवू नको, बाजूला बस असे सांगितले जाते. रक्तस्राव शोषून घेण्यासाठी कपड्याची घडी दिली जात असे. पाळी येते हे कुणाशी स्पष्टपणे सांगायलाही मनाई असते. गुपचुपपणे विटाळाचे कपडे धुऊन टाकले जातात. देवळात जायला मनाई असे. हे सगळे मुलीला त्रासदायक, जाचक असे. मासिक पाळी ही एक शरीरशुद्धी आहे. दर महिन्याला ओव्हरीमधून एक अंडे ट्यूबमध्ये येते, मोठे होते आणि एका ठरावीक दिवशी ते फुटते व रक्तस्राव सुरू होतो. त्या वेळी योनिमार्गाची स्वच्छता अतिशय महत्त्वाची ठरते. काही मुलींना फारच कमी रक्तस्राव होतो तर काहींना बराच रक्तस्राव होतो. पूर्वी जुने पातळ कपडे घडी म्हणून घेत असत. नंतर पॅड आली आत कापूस व बाहेर कपडा. त्यानंतर आणखी सुधारणा झाली. त्याला सॅनिटरी नॅपकिन अशी संज्ञा मिळाली. अनेक कंपन्या हे नॅपकिन्स बनवू लागल्या. यामध्ये फोम सॅनिटरी नॅपकिन, सॅनिटरी पॅड, सॅनिटरी टॉवेल अशा नावाने कंपनी या विकते. ही झाली किंमत परवडणाऱ्या बायकांची सोय. परंतु या महाग आहेत. आता तर जीएसटी असल्यामुळे जास्त महाग झाल्या आहेत. काही प्रथितयश कंपन्या निरनिराळ्या आकाराची पॅडस बनवतात आणि जंतुनाशकेही वापरतात. स्वच्छतेच्या दृष्टीने ही पॅडस उपयुक्त आहेत. ऑफिसमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांना किंवा शिक्षण क्षेत्रात, बँकेत, ड्रायव्हिंग करताना, सकाळी ८ ते सायंकाळी ६ पर्यंत नोकरी करताना सॅनिटरी पॅडस वापरणे हे अविभाज्य आहे.

## पहिली पॅड

ब्रेन फ्रँकलिनने सर्वप्रथम वापरून फेकून देण्याची पॅडस बनवली. याचा उपयोग सैनिकांना जखमेमधून होणारा रक्तस्राव शोषून घेण्यासाठी केला गेला. जॉनसन अ‍ॅण्ड जॉनसन या कंपनीने १८८८ साली लाकडापासून केलेला भुसा वापरला. कोटेक्स कंपनी सर्वात पहिली ठरली. परंतु केमिस्टकडे जाऊन सॅनिटरी पॅड मागणे हे बायकांना लाजिरवाणे वाटते असे. आता काळ बदलला आज तर सरसकट सॅनिटरी पॅडसच्या मोठमोठ्या जाहिराती वृत्तपत्रात येतात, त्याचबरोबर टी.व्ही. चॅनेलवरही येतात. सॅनिटरी पॅडसमध्ये गेल्या ५० वर्षात बरेच बदल झाले आहेत. लूप आले नंतर चड्डीला चिकटणाऱ्या पट्ट्या आल्या, बेल्ट असणारे नॅपकिन फार काळ टिकले नाहीत. पॅडसची लांबी व रुंदी आणि त्याची शोषणशक्ती महत्त्वाची ठरते. पॉलिॲक्रिलेट जेलाची शोषण क्षमता जास्त बाजूला रक्तस्राव गळू नये म्हणून पॉलिथिलीन फिल्म वापरतात. खेड्यापाड्यांतून अजूनही चिंध्या, माती असे पदार्थ वापरतात आणि त्याची परिणती रोगामधे होते.

अरुणाचलम मुरुगथम यांनी एका कोइमतूरच्या खेड्यामध्ये एक मशीन तयार केले. सॅनिटरी पॅडस् कमी किंमतीत बनवता येऊ लागली. सुगंध आणि जंतुनाशके असल्याने दुर्गंधी येत नाही व जंतूचा प्रादुर्भावही टाळता येतो. मधल्या काळात टॅपॉन्सचा वापर करण्यात येऊ लागला. पण हा प्रयोग फार यशस्वी झाला नाही. त्यानंतर गेली दोन वर्षे रक्त गोळा करण्याकरता कपची कल्पना राबवली. ही संकल्पना फार काळ टिकली नाही.

डिस्पोझेबल मेन्स्ट्रुअल पॅडसचे अनेक प्रकार आहेत. अगदी

पातळ, नेहमीच्या वापराचे, पुष्कळ शोषण असणारे, रात्री वापरावयाचे, बाळंतपणानंतर वापरायचे. पुन्हा वापरण्याची कापडी पॅडस. कापड पुन्हा स्वच्छ धुऊन जंतुनाशके वापरून व सुगंध वापरून जवळ जवळ ५ ते ६ महिने ही पॅडस वापरता येतात. याच्याकरता गृहउद्योग सुरू केला आहे. जेव्हा टाकून देण्याची पॅडस वापरतो तेव्हा ती अनेक वेळा संडासात टाकली जातात. कारण दुसरी सोय केलेली नसते. असे केल्याने संडास तुंबतो. म्हणून आज पॅडस टाकण्याकरता वेगळी झाकणे असलेली बकेट ठेवण्याची आवश्यकता आहे.

### सुविधांची गरज

स्त्रियाभिमुख भूमिका सरकार घेते, तेव्हा सॅनिटरी पॅड वापरणे व त्यांची किंमत सर्वसाधारण बाईला परवडणारी अशी ठरवणे त्याचप्रमाणे वापरलेली पॅडस नष्ट करण्याकरिता मशीन उपलब्ध करणे ही जबाबदारी घ्यायला हवी. आता मशीन्स उपलब्ध आहेत. शाळेत, महाविद्यालयात, ऑफिसमध्ये, विमानतळावर वेंडिंग मशीन्स लावण्यात आली आहेत. त्यात या मशीनमध्ये पैसे टाकले की पॅड येते. त्याचबरोबर ओली पॅडस मशीनमध्ये टाकली की, त्या खराब झालेल्या पॅडसचा चुरा होतो. ही सोय महत्त्वाची आहे. रुग्णालयातील कचरा जशी प्रक्रिया करून नष्ट करतात तसाच हा मार्ग उत्तम आहे. ऑफिस, कार्यालये, शाळा, महाविद्यालये येथे ही सोय व्हायलाच हवी. स्वच्छ भारताचे स्वप्न साकार होण्यासाठी जसे ओल्या कचऱ्याची खत करण्याची मोहीम राबवण्यात येत आहे. तसेच या सॅनिटरी पॅडसच्या वापराबद्दल व वापरलेली पॅडस नष्ट करण्याचे शिक्षण देण्याची आज गरज आहे. ओली झालेली सॅनिटरी पॅडस ही जंतुनाशके वापरून मशीनद्वारे नष्ट केली पाहिजेत.

### उद्‌बोधनाची गरज

महिलांचे उद्‌बोधन करताना त्यांना असेही समजून सांगावे की, रक्तस्राव दर महिन्याला होणे ही एक सामान्य शारीरिक प्रक्रिया आहे. या दिवसात देवपूजा करू नये असे सांगितले जाते. ते सुद्धा शास्त्रीय कारणात सुसंगत नाही. आज असा कुठलाही व्यवसाय नाही जिथे महिला काम करीत नाहीत. अगदी घरकाम करणाऱ्या स्त्रीपासून ते हिमालयावर स्वारी करण्यापर्यंत स्त्रियांनी मजल मारली आहे.

### बाऊ करू नका...

तेव्हा आपल्या मुलींना सक्षम करण्यासाठी या शारीरिक रक्तस्रावाचा बाऊ न करता त्याला सामोरे जाण्यासाठी शरीर तंदुरुस्त ठेवणे व मनमनमिळाऊ असणे आवश्यक आहे. अती रक्तस्राव होत असल्यास लोह, कॅल्शियम घेण्याची गरज असते. तसेच फार कमी रक्तस्राव असल्यासही तपासणी करणे आवश्यक आहे. कारण हल्लीच्या जीवनशैलीमुळे तणाव वाढतो आणि त्यामुळे पॉलिसिस्टीक ओव्हेरिअन डिसीजचे प्रमाण वाढते आहे. याची योग्य वेळेला तपासणी करून औषध योजना केली तर पुढचा त्रास चुकेल.

**माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ**

अस्मिता

**वंदना धर्माधिकारी**

# मी आणि माझा पैसा

अर्थसाक्षरता म्हणजे नक्की काय? अर्थ म्हणजे पैसा आणि साक्षरता म्हणजे शिक्षण. याचाच अर्थ अर्थसाक्षरता-पैशाचे शिक्षण, पैसा ओळखणे, वापरणे, बाजूला ठेवणे, गरज लागल्यावर काढणे, गुंतवणे, त्यावरील परतावा उपभोगणे, जरूर तिथे बँकेकडून कर्ज घेणे आणि वेळेत फेडणे, मुलांना शिक्षित करणे, थोरामोठ्यांची काळजी घेणे, नातीगोती आणि घराचे घरपण जपत आपल्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे. अशा घराचे आर्थिक गणित योग्य पद्धतीने मांडले जाते, बरोबर सुटते, ना वादावादी ना तेढ ना रागराग. यासाठी पैशाला ओळखायला शिकले पाहिजे, अर्थसाक्षर व्हायला हवे. खरं पाहता बायका उत्तम व्यवहार सांभाळू शकतात, उत्तम आर्थिक नियोजन करू शकतात. देशाचा सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी महिलांच्या याच कौशल्याचा वापर केला पाहिजे. मुलांना उत्तम मार्गदर्शन केल्याने एक घर अर्थशिक्षित होते. जसजसा महिलांचा सहभाग वाढेल तशी देशाची प्रगती वाढेल. महिला सशक्तीकरण म्हणजे आर्थिक निर्णय घेण्याची परिपक्वता. महिलांना बचतीचे महत्त्व कळते. परंतु बचत केलेल्या पैशाची वृद्धी कशी करायची, त्यासाठीच्या योजना माहीत करून घेऊन त्यानुसार गुंतवणूक करायला त्या सरावलेल्या नाहीत. पुरुषप्रधान संस्कृतीत कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थापनात महिलांचा सहभाग अल्प प्रमाणात असल्याने त्या आर्थिक सक्रीय नसतात. केवळ कुटुंबाचे बाबतीत नव्हे तर स्वावलंबी आणि अत्मभानी होण्यासाठी महिलांनी आर्थिक गोष्टीत लक्ष घालून त्याची पार्श्वभूमी, जोखीम, फायदे-तोटे, भविष्य आणि आपापली कुवत याचे गणित योग्य प्रकारे सोडवायला शिकले पाहिजे. या गोष्टी अवघड नक्कीच नाहीत. चौकस असावे, माहिती करून घ्यावी, आपला फायदा कशात हेही बघावे आणि कोणाचेही वाईट न करता पैसा कमवावा. बँकिंगच्या अनेक पैलूंची माहिती करून घेऊन त्याचा दैनंदिन वापर करून आर्थिक स्थैर्य मिळवता येते.



ग्रामीण महिलांचे व्यवहार ज्ञान वाखाणण्याजोगे असते. कमी शिकलेल्या असल्या तरी हिशोबाला पक्क्या असतात. महिलांसाठी असलेल्या योजनांचा फायदा घेताना त्या आपल्याबरोबर अनेकींना खेचून आणतात. त्यांच्यात एकत्रितपणे काम करायची वृत्ती फेर धरून गाण्यासारखी वाटते. पुढे आहे तिच्या मागे जायचे आणि मागून दुसरीला खेचायचे. कल्पनाशक्ती, आहे ती परिस्थिती, कष्ट, जिद्द, यावर एखादी मस्त शक्कल त्या लढवतात आणि घरात पैशाचा स्रोत येऊ लागतो. गरज आहे, ती या येणाऱ्या पैशाचे नियोजन करण्याची, त्यासाठी अर्थसाक्षर होण्याची.




# मॅग्नेटिक आणि महत्त्वाकांक्षी महाराष्ट्र

**'मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स २०१८' या परिषदेचे उद्‌घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. एका नव्या उद्योगपर्वाची ही सुरुवात ठरली. अनेक करार या परिषदेच्या माध्यमातून झाले. त्यामुळे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या विपुल संधी महाराष्ट्रात उपलब्ध होतील.**

महाराष्ट्र राज्य देशातील पहिले ट्रिलीयन डॉलर इकॉनॉमीकडे वाटचाल करणारे राज्य असून देशाच्या आर्थिक विकासात महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. फडणवीस सरकारच्या सुधारणावादी धोरणांमुळे उद्योग क्षेत्राला एक नवी झळाळी प्राप्त झाली आहे. उद्योगांमुळे परिवर्तन आले आहे, असे गौरवोद्‌गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुंबई येथे आयोजित 'मॅग्नेटीक महाराष्ट्र' जागतिक गुंतवणूकदारांच्या शिखर परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी काढले.

### राज्यात १२ लाख १० हजार ४६४ कोटींची गुंतवणूक

मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स २०१८ च्या माध्यमातून राज्यात १२ लाख १० हजार ४६४ कोटी रुपये गुंतवणुकीचे ४ हजार १०६ सामंजस्य करार झाले आहेत. त्या माध्यमातून ३६ लाख ७७ हजार १८५ जणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. राज्याच्या अविकसित भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या शिखर परिषदेच्या व्यासपीठावरून स्पष्ट केले.

सर्वात जास्त गुंतवणूक उद्योग क्षेत्रात ५ लाख ४८ हजार १६६ कोटी एवढी होणार असून, गृह निर्माण क्षेत्रात ३ लाख ८५ हजार तर ऊर्जा क्षेत्रात १ लाख ६० हजार २६८ कोटी गुंतवणूक होणार आहे. शासनाच्या विविध पायाभूत प्रकल्पांचे १०४ सामंजस्य करार झाले असून, त्या माध्यमातून ३ लाख ९० हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून; २ लाख ६ हजार २६६ रोजगार निर्मिती होणार आहे.

राज्य शासन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून संरक्षण आणि हवाई उद्योगासाठी १ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. रेल्वेसोबत झालेल्या ६०० कोटी रुपयांच्या सामंजस्य करारामुळे लातूर येथे सुमारे ३५० एकर जागेवर रेल्वे कोच निर्मिती कारखाना पहिल्या टप्प्यात सुरू करण्यात येणार आहे. यामुळे या भागात १५ हजार जणांना थेट रोजगार मिळेल. त्याच्या तिप्पट अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल. हा प्रकल्प एकूण २ हजार हेक्टर जागेवर तयार करण्यात येत आहे. तेथे मेट्रो कोच निर्मिती होणार आहे. मेट्रोचे हे डब्बे देशाबरोबरच जागतिक स्तरावर पाठवण्यात येतील. या प्रकल्पामुळे लातूर, बीड, उस्मानाबाद, या जिल्ह्यांचे भाग्य उजळेल. मराठवाडा भागात गेल्या अनेक वर्षात कुठलाही मोठा प्रकल्प आला नव्हता. रेल्वेसोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीला चालना मिळेल. यामुळे मॅग्नेटिक महाराष्ट्राला प्रचंड यश मिळाले आहे. राज्याच्या अविकसित भागात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक झाली आहे. त्याचा फायदा मराठवाड्याला मोठ्या प्रमाणावर होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी मेक इन इंडिया सप्ताहात आठ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. त्यापैकी दोन वर्षात ६१ टक्के सामंजस्य करार प्रत्यक्षात कार्यरत झाले. मॅग्नेटिक महाराष्ट्र कॉन्व्हर्जन्सच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने १३ विविध धोरणे जाहीर केली आहेत.

### मॅग्नेटिक महाराष्ट्र कॉन्व्हर्जन्स २०१८ मधील गुंतवणूक

● गृह निर्माण – ७ प्रस्ताव ३ लाख ८५ हजार कोटी गुंतवणूक ● कृषी – ८ प्रस्ताव १० हजार २७८ कोटी गुंतवणूक ● पर्यटन व सांस्कृतिक – १७ प्रस्ताव ३ हजार ७१६ कोटींची गुंतवणूक ● ऊर्जा – १७ प्रस्ताव १ लाख ६० हजार २६८ कोटींची गुंतवणूक ● इतर – ४०८ प्रस्ताव ९५ हजार कोटींची गुंतवणूक ● कौशल्य विकास – ११३ प्रस्तावातून १ लाख ७६७ रोजगार निर्मिती ● उच्च शिक्षण – १२ प्रस्ताव, २ हजार ४३६ कोटी गुंतवणूक ● महाआयटी – ८ प्रस्ताव ५ हजार ७०० कोटी गुंतवणूक ● उद्योग क्षेत्र – ३५१६ प्रस्ताव, ५ लाख ४८ हजार १६६ कोटींची गुंतवणूक, असे एकूण ४१०६ प्रस्तावातून १२ लाख १० हजार ४६४ कोटींची गुंतवणूक.

**प्रमुख औद्योगिक प्रकल्प:** ● रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड – ६० हजार कोटी ● व्हर्जिन हायपरलूप वन – ४० हजार कोटी ● थ्रस्ट एअरक्राफ्ट क्लस्टर (अमोल यादव) – ३५ हजार कोटी ● जेएसडब्ल्यू इलेक्ट्रिक व्हेइकल – ६ हजार कोटी ● १२५० कोटी ● महिंद्रा इलेक्ट्रिक व्हेईकल – ५०० कोटी.

**अविकसित भागातील महत्त्वाचे प्रकल्प:** ● लॉइड मेटल ॲण्ड एनर्जी, गडचिरोली – ७०० कोटी ● जिनस पेपर ॲण्ड बोर्ड, नंदुरबार – ७०० कोटी ● टेक्नोकार्ट इंडस्ट्री, अमरावती – १८३ कोटी ● इंडिया ग्रो अनाज लिमिटेड, नांदेड – २०० कोटी ● शिऊर ग्रो लिमिटेड, हिंगोली – १२५ कोटी.

**मध्यम, लघू व सूक्ष्म उद्योग क्षेत्रातील महत्त्वाचे प्रकल्प:** ● कॉयर क्लस्टर, सिंधुदुर्ग – ७.५६ कोटी ● मेगा लेदर क्लस्टर, रायगड – ५०० कोटी ● चित्रावारली फाऊंडेशन आर्ट ॲण्ड क्राफ्ट क्लस्टर – पालघर – १ कोटी ● इलेक्ट्रॉनिक क्लस्टर, नागपूर – ५ कोटी ● गोल्ड ज्वेलरी क्लस्टर, अहमदनगर.

**महत्त्वाचे गृहनिर्माण प्रकल्प:** ● क्रेडाई महाराष्ट्र – १ लाख कोटी (पाच लाख परवडणारी घरे) ● नारेडको – ९० हजार कोटी (३ लाख परवडणारी घरे) ● खलिजी कमर्शियल बँक ॲण्ड भूमी राज – ५० हजार कोटी (२ लाख परवडणारी घरे) ● पोद्दार हाऊसिंग – २० हजार कोटी (१ लाख परवडणारी घरे) ● कन्सेप्टच्युअल ॲडव्हायजरी सर्व्हिस – २५ हजार कोटी (१ लाख परवडणारी घरे) **वस्त्रोद्योग क्षेत्रातील महत्त्वाचे प्रकल्प:** ● ह्योसंग – १२५० कोटी ● निर्वाण सिल्क – २९६ कोटी ● पलक इंडस्ट्रिज, अमरावती – २५ कोटी ● सुपर ब्ल्यू डेनिम – १२५ कोटी ● व्हेरिटो टेक्स्टाइल अमरावती – २५ कोटी.

**ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाचे प्रकल्प:** ● अदानी ग्रीन एनर्जी – ७ हजार कोटी ● रि न्यू पॉवर व्हेंचर – १४ हजार कोटी ● टाटा पॉवर – १५ हजार कोटी ● सॉफ्ट बँक एनर्जी – २३ हजार कोटी ● युनिव्हर्जी थिंक ग्रीन – २४ हजार कोटी.

**कृषी व विपणन क्षेत्रातील प्रकल्प:** ● जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने हवामान आधारित कृषी प्रकल्प – ४ हजार कोटी ● आयसीआरआयएसएटी, हैद्राबाद, किसानमित्र – विदर्भातील अकरा जिल्ह्यात ६६ कोटी गुंतवणूक ● रॉयल ग्रो फूडस् – १४०० कोटी ● पलासा ग्रो – २७०० कोटी

**फ्युचरिस्टिक सेगमेंट:** ● व्हर्जिन हायपरलूप वन – ४० हजार कोटी ● रिलायन्स इंडस्ट्रिज – ६० हजार कोटी ● आयएसडब्ल्यू इलेक्ट्रिक व्हेइकल – ६ हजार कोटी ● महिंद्रा इलेक्ट्रिक व्हेइकल – ५०० कोटी.

**लॉजिस्टिक मधील महत्त्वाचे प्रकल्प:** ● देवीसिटी लॉजिस्टिक पार्क नागपूर – ४२४ कोटी ● राज बिल्ड इन्फ्रा – ३ हजार कोटी ● लॉजिस्टिक पार्क, पुणे – १०० कोटी.

**थेट परकीय गुंतवणुकीचे महत्त्वाचे प्रकल्प :** ● कॅरियर मिडिया इंडिया प्रा. लि. – ३०० कोटी ● एमर्सन प्रोसेस मॅनेजमेंट – ८१५ कोटी ● आयएलजीआयएन ग्लोबल इंडिया – ७५० कोटी
● एलजी इलेक्ट्रॉनिक्स – ३५० कोटी
● ओव्हनस कॉर्निंग इंडिया – १०५० कोटी ● पेरी विर्क – ७२८ कोटी.

**पायाभूत सुविधांमधील प्रकल्पामध्ये शासनाची गुंतवणूक:** ● वाहतूक आणि बंदरे – ४८ प्रकल्प, ५९ हजार ३२ कोटींची गुंतवणूक ● सार्वजनिक बांधकाम – ५ प्रकल्प, १ लाख २१ हजार ५० कोटींची गुंतवणूक ● मुंबई महानगरपालिका – १८ प्रकल्प, ५४ हजार ४३३ कोटींची गुंतवणूक ● मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण – ३० प्रकल्प, १ लाख ३२ हजार ७६१ कोटी ● नगर विकास – ३ प्रकल्प, २३ हजार १४३ कोटी

## सामर्थ्याचे प्रतीक

आजचा महाराष्ट्र देशाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. पायाभूत क्षेत्र विकासात महाराष्ट्र अग्रेसर ठरले आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने पहिला क्रमांक पटकावला आहे. मानवी हस्तक्षेप कमी करून तंत्रज्ञानाच्या आधारे जनतेसाठी द्यावयाच्या सोयीसुविधा अधिक सोप्या करण्यासाठी केंद्र सरकारने काम सुरू केले आहे. त्यामुळे कामकाजात पारदर्शकता वाढून विश्वासार्हता वाढत आहे. सरकारने जवळपास १४ हजार निरुपयोगी कायदे रद्द करून, काही नवे कायदे जनतेच्या कल्याणासाठी केले आहेत. आर्थिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने सरकारने अनेक बदल अर्थसंकल्पात करून सर्वसामान्य व्यक्ती नजरेसमोर ठेऊन; विश्वास साधण्याचे ध्येय निश्चित केले आहे. नव्या आर्थिक धोरणांचा लाभ दलित, मागासवर्गातील जनता आणि शेतकऱ्यांना होईल. सर्वांना घरे, शुद्ध पाणी, मुबलक वीज, चांगले रस्ते,चांगल्या आरोग्याच्या सुविधा हे ध्येय गाठायचे आहे. आयुषमान भारत या योजनेत १० कोटी कुटुंबांना आरोग्य विमा देण्याचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागात वेलनेस सेंटर स्थापनाचा निर्धार आहे. शैक्षणिक क्षेत्रातील सुधारणांसाठी १ लाख कोटींची योजना आहे. मुद्रा योजनेतून लाखो रुपयांचे कर्ज दिले आहे. म्हणूनच 'मेक इन इंडिया' हे धोरण शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे, असे या परिषदेत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी सांगितले.



**मॅग्नेटिक महाराष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

## परकीय गुंतवणुकीत राज्य आघाडीवर

लिकॉन या सिंगापूरच्या कंपनीने केलेल्या सर्वेक्षणानुसार थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. थेट परकीय गुंतवणुकीत मोठी वाढ झाली आहे. ही वाढ ३०० टक्क्यांनी वाढली आहे. भारतात येणाऱ्या गुंतवणुकीपैकी ५० टक्के महाराष्ट्रात आली आहे.

देशाने फाईव्ह ट्रीलीयन इकॉनॉमीचे उद्दिष्ट ठेवले आहे तर राज्याने २०२५ पर्यंत ट्रीलीयन डॉलर इकॉनॉमीचे ध्येय गाठण्याचे निश्चित केले आहे. यासाठी पाच मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले आहे. यात सर्वप्रथम तंत्रज्ञान आधारित सेवांवर भर देण्यात

'टाटा उद्योग समूहाची सुरुवात महाराष्ट्र आणि नागपूरातून झाली. जेमशेदजी टाटांनी महिला सूतगिरणी सुरू केली. महाराष्ट्रात पुन्हा गुंतवणूक क्षेत्राला चालना मिळत आहे. महाराष्ट्राचे भवितव्य सर्वांगसुंदर आहे. नव्या सरकारमधील नेतृत्वाने या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले आहेत. औद्योगिक गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे नेहमीच अग्रेसर राहिले आहे.'

**– ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा**



येणार आहे. या दृष्टीने कार्यवाही सुरू झाली आहे. कृषिक्षेत्रातील लोकांचे उत्तम कौशल्य विकसित करून रोजगार निर्मिती करण्यात येणार आहे.

राज्याने देशात सर्वप्रथम फिनटेक पॉलिसी तयार केली आहे. ३०० नवे स्टार्टअप्स या क्षेत्रात सुरू झाले आहेत. इंट्रिग्रेटेड इंडस्ट्रीज एरिया ही नवसंकल्पनेवर आधारित असेल. राज्याने सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवली आहे. एका अहवालानुसार महाराष्ट्रातील मोठ्या प्रकल्पातील गुंतवणूक वेगाने वाढते आहे. निती आयोगानेही महाराष्ट्राला पायाभूत सुविधांच्या विकासात अग्रेसर ठरवले आहे. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असून, महाराष्ट्र समृद्धी कॉरिडॉर याद्वारे महाराष्ट्रातील चौदा जिल्हे जोडले जातील.

## पायाभूत सुविधांमधून राज्याची प्रगती

राज्यात वाढती वाहतूक आणि परवडणारी घरे या दोन समस्या आहेत. यावर उपाय करण्यासाठी राज्याने आश्वासक पावले उचलली आहेत. सबअर्बन रेल्वे, मेट्रो आणि मुंबई ट्रान्स हार्बर लिंक हा पर्यायी वाहतूक मार्ग निर्माण होत आहे. विरार ते अलिबाग असा मल्टी मोडल कॉरिडॉर तयार होणार आहे, याबाबतची कार्यवाही सुरू झाली आहे. यासोबतच बीकेसी ते विमानतळ हे अंतर केवळ १० मिनिटात पोहोचण्याची व्यवस्था निर्माण होत आहे. सुमारे १ लाख ७३ कोटीची कामे सुरू असून येत्या पाच वर्षात ती पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

उद्योग व्यापार क्षेत्रात महत्त्वाची समजली जाणारी सप्लाय चेन उभारणी करण्यासाठी राज्य भौगोलिकदृष्ट्या उत्तम असल्याचे मत 'मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स २०१८' या जागतिक गुंतवणूक परिषदेत झालेल्या एका परिसंवादात मान्यवरांनी व्यक्त केले.

## इंडस्ट्री ४.० व भविष्यातील रोजगार

रोजगाराच्या संधी या केवळ उद्योग क्षेत्रातच आहे असे नाही. सेवा, व्यवसाय, ब्रँडिंग, पुरवठा यासोबतच शेती क्षेत्रातसुद्धा रोजगाराच्या असंख्य संधी आहेत. कौशल्यप्राप्त मनुष्यबळाची सर्वच क्षेत्राला आवश्यकता आहे. देशात सध्या उद्योगाला पूरक वातावरण असून इंडस्ट्री ४.० मुळे विविध क्षेत्रात रोजगाराच्या मुबलक संधी निर्माण होतील असा सूर या परिषदेत निघाला. भौगोलिक स्थानाबरोबरच येथील औद्योगिक पार्श्वभूमीमुळे देशाच्या उद्योग प्रक्रियेत महाराष्ट्राला महत्त्वाचे स्थान असल्याचे मत 'एक्स्पोर्ट ओरिएंटेड इंडस्ट्रिलायझेशन' या परिसंवादात मान्यवरांनी व्यक्त केले.

## कृषी क्षेत्रातील मनुष्यबळ सेवा क्षेत्राकडे वळवणार

कृषी क्षेत्रातील मनुष्यबळाला विशेष कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना सेवा क्षेत्रातील संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्याने २०२५ पर्यंत एक ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेकडे पोहचण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली आहे. हे लक्ष्य साध्य करण्यासाठीचा रोडमॅप तयार केला असून मुख्यमंत्र्यांनी याबाबतचे सादरीकरण या परिषदेत केले. देशांतर्गत होणाऱ्या सकल घरेलू उत्पादनात कृषी क्षेत्राचा वाटा हा केवळ ११ टक्के इतका आहे, मात्र या क्षेत्रात वापरले जाणारे मनुष्यबळ हे सुमारे ५० टक्के आहे. तर उत्पादन क्षेत्रातील उत्पन्न ३० टक्के आणि वापरले जाणारे मनुष्यबळ हे २० टक्के आहे तर सेवा क्षेत्रातील उत्पन्नाचा दर हा ५९ टक्के आहे. मात्र यात वापरले जाणारे मनुष्यबळ हे केवळ ३० टक्के एवढे आहे. कृषी क्षेत्रातील औद्योगिक वाढ  ही ५ टक्के आहे. उत्पादन क्षेत्रातील व सेवा क्षेत्रातील वाढ ही १५ टक्के आहे. २०२५ पर्यंत सेवा क्षेत्रातील वाढ ही ६७ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे. सेवा क्षेत्रात होणाऱ्या वृद्धीचा वाढता दर लक्षात घेता या क्षेत्राला आवश्यक असणारे कौशल्य कृषी क्षेत्रातील मनुष्यबळाला उपलब्ध करून दिल्यास राज्याला ५० लाख कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. यासोबतच कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी गुंतवणूक वाढावी यावर भर देण्यात येणार आहे.

मॅग्नेटिक महाराष्ट्र
कन्व्हर्जन्स २०१८




ट्रिलीयन डॉलर इकॉनॉमीमध्ये महाराष्ट्रातील स्टार्टअप युवा उद्यमींचे योगदान महत्त्वपूर्ण राहील, या संकल्पनेत उत्पादन क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्रातील आणि डिजिटल प्रणालीशी निगडित उद्योग कल्पनांना वाव मिळेल. यामध्ये आर्टिफिशील इंटेलीजीन्स, फोरओ पॉइंट अशा संकल्पनांचा समावेश आहे. आपल्या युवकांमध्ये मोठी क्षमता आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. या अनुषंगाने मॅग्नेटिक महाराष्ट्र– कॉनव्हर्जन्स–२०१८ जागतिक गुंतवणूक परिषदेच्या निमित्ताने इनोव्हेटर्स ऑफ महाराष्ट्रा – स्टार्टअप सेशन ॲण्ड अॅवार्ड या कार्यक्रमात नवउद्यमींना पुरस्कार देण्यात आले. स्टार्टअप स्पर्धा ही महाराष्ट्राला आणखी मॅग्नेटिक करेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.

**टीम लोकराज्य**

# येथे कर माझे जुळती...

स्मरण

**सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात १२ मार्च यशवंतराव चव्हाण यांची जयंती, तर २३ मार्चला शहीद दिन साजरा केला जातो. त्यांच्या कार्याविषयी...**



## यशवंतराव चव्हाण

तत्कालीन सातारा जिल्ह्यात असणाऱ्या आणि सध्या सांगली जिल्ह्यात असलेल्या देवराष्ट्रे येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबात यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी झाला. त्यांनी प्राथमिक शिक्षण कराड येथे, उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे घेतले आणि बी.ए., एलएल.बी. झाले. १९३०-३१ असहकाराच्या (कायदेभंग) चळवळीत सहभाग १८ महिन्यांची तुरुंगवासाची त्यांना शिक्षा झाली. १९४० साली सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड. २ जून, १९४२ रोजी कराड येथे वेणुताईंशी विवाहबद्ध. म.गांधींच्या 'चले जाव' चळवळीत सामील आणि भूमिगत, 'भारत छोडो चळवळीत' अटक. १९४४ साली 'राजकीय क्रांती' या विषयावर कवितासाठी तुरुंगवास. १९४६ साली मुंबई इलाखा कायदे मंडळाच्या निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून निवड झाली. १४ एप्रिल १९४६, रोजी गृहखात्याचे संसदीय सचिव म्हणून निवड झाली. १९४८ साली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस म्हणून निवड. १९५२ ला कऱ्हाड मतदारसंघातून विधानसभेवर निवड व नागरी पुरवठा मंत्री म्हणून नियुक्ती. २८ सप्टेंबर १९५३, भाऊसाहेब हिरे व नानासाहेब कुंटे यांच्या समवेत नागपूर करारावर पश्चिम महाराष्ट्राच्या वतीने स्वाक्षरी. १९५४ - मुंबई राज्य पंचायत संघाची स्थापना. १ नोव्हेंबर १९५६ , विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना व द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून निवड. १ मे १९६०, महाराष्ट्र राज्याची स्थापना व पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथविधी. १० नोव्हेंबर १९६०, नागपूर करार अंमलबजावणीचा भाग म्हणून महाराष्ट्र विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपुरात दरवर्षी भरवण्यास सुरुवात. १९६१ - दिल्ली येथे भरलेल्या ४३ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष. १ मे १९६२ ,पंचायत राज्य योजनेचा प्रारंभ. १९६२ ला महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका, काँग्रेसने २६५ पैकी २१४ जागा जिंकून प्रचंड विजय मिळवला. २२ नोव्हेंबर १९६२, भारताचे संरक्षणमंत्री म्हणून सूत्रग्रहण. १९६३ ला नाशिक जिल्ह्यामधून लोकसभेवर बिनविरोध निवड. १४ नोव्हेंबर १९६६, केंद्रीय गृहमंत्रिपदी नियुक्ती. कानपूर विश्व विद्यालयात, औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठाची आणि कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ लॉ' पदवी सन्मानपूर्वक बहाल. २६ जून १९७० रोजी केंद्रीय अर्थमंत्री म्हणून नियुक्ती. १९७४ ला केंद्रीय परराष्ट्रमंत्री म्हणून नियुक्ती. परभणी, मराठवाडा कृषी विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही पदवी. १९७७-७८ लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड (मान्यताप्राप्त अशा विरोधी पक्षाचे स्वातंत्र्यानंतरच्या लोकसभेतील काळातील पहिले विरोधी पक्षनेते). चरणसिंग यांच्या संयुक्त मंत्रिमंडळात उपपंतप्रधान आणि गृहमंत्री. १९८२ ला आठव्या अर्थ आयोगाचे अध्यक्ष. १९८४ साली 'कृष्णाकाठ' आत्मचरित्र : खंड पहिला प्रकाशित. १९८४ मध्ये पुणे विद्यापीठाची सन्माननीय डी.लिट. पदवी बहाल. १९८४ ऑक्टोबर मध्ये 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्र ग्रंथास केसरी मराठा संस्थेतर्फे 'साहित्यसम्राट न.चिं. केळकर पारितोषिक.' २५ नोव्हेंबर १९८४, रोजी दिल्ली येथे निधन.

## शहीद दिन







समाजवादी विचारांनी प्रभावित झालेल्या तरुणांनी देशव्यापी क्रांतिकारी संघटना उभी करण्याचे ठरवले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव इत्यादी तरुण यामध्ये प्रमुख होते. हे सर्व क्रांतिकारक धर्मनिरपेक्ष विचारसरणीचे होते. १९२८ साली या तरुणांनी हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेची स्थापना केली. भारताला ब्रिटिशांच्या शोषणातून मुक्त करणे, हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. त्याचबरोबर तिला शेतकरी-कामगारांचे शोषण करणारी अन्याय्य सामाजिक-आर्थिक व्यवस्थाही उलथून टाकायची होती. सामाजिक न्यायावर व समतेवर आधारित समाज निर्माण करण्याला भगतसिंग यांनी महत्त्व दिले. या संघटनेच्या सदस्यांनी अनेक क्रांतिकारक कृत्ये केली. भगतसिंग व राजगुरू यांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी सॉंडर्स या अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार केले.

नागरी हक्कांची पायमल्ली करणारी दोन विधेयके या वेळी सरकारने मध्यवर्ती विधिमंडळात दाखल केली होती. त्यांचा निषेध करण्यासाठी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती विधिमंडळात बाँब फेकले.

सरकारने हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीच्या केंद्रांवर धाडी घातल्या. त्यातून सॉंडर्सच्या हत्येचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले. त्यांच्यावर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटले भरले. भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली. २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

**(संदर्भ : लोकराज्य मार्च २०१२, इयत्ता ८वी इतिहास)**

**संकलन: गजानन पाटील**


barti
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
बार्टीमार्फत संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षा-२०१७
या प्रशिक्षणा अंतर्गत विविध योजनांचा लाभ घेतलेल्या अनुसूचित जातीच्या
३६ उमेदवारांची व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेसाठी निवड..
हार्दिक अभिनंदन...
शंभरकर शुभम अतुलराव
परमेश्वर विवेक मोहनलाल
खडसे अनिल लक्ष्मणराव
उंदिरवाडे अमित चंद्रभान
नगराळे शुभम प्रकाश
रामटेके समीर ताराचंद
चव्हाण अविनाश सुंदरदास
तेंडोलकर दयानंद रमाकांत
विश्वजित गजानन चिमणकर
इंगोले गौरव साहेबराव
निखील दुबे
नवनाथ भागवत पारखे
स्वप्नील उत्तमराव खिलारे
अशोक भिवा बारसागडे
गायकवाड स्वाती दशरथ
अशीत नामदेव कांबळे
शेवाळे रुपेश जगनराव
रोहीतकुमार सुशील भैसारे
श्वेता शंकरराव निवडंगे
तुरेराव प्रीतमकुमार
विजय दशरथ गायकवाड
अजित रॉय तोगरे
प्रमोद प्रकाश मंडले
आशिष येरेकर
सुप्रिया घायतडक
दगडे जीवन मोहन
चव्हाण त्रिरत्न श्यामराव
बुक्तारे विश्वजित प्रकाश
वानखेडे अर्चना पंढरीनाथ
प्रिती गाडे
हर्षराज वाठोरे
जयपाल माणिक देठे
राहुल सुरेश जावीर
अविनाश संजीवन शिंदे
वैभव दासू वाघमारे
करूण गरड
आपल्या उज्ज्वल यशासाठी हार्दिक शुभेच्छा...
श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
श्री. राजकुमार बडोले
मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
श्री. दिलीप कांबळे
राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह